# निर्भय

**संकल्पना :** आ. भाई जयंत पाटील
**संपादक/लेखक :** विलास पवार

ओम् पब्लिकेशन
एम् /३, पॅराडाईज टॉवर, नौपाडा, ठाणे (प.)

# निर्भय

**प्रकाशक**
ओम पब्लिकेशन
एम्/३, पॅराडाईज टॉवर, नौपाडा, ठाणे (प.)
दूरध्वनी : ९८२११६१६६२

**लेखनाधिकार**
ओम पब्लिकेशन
एम्/३, पॅराडाईज टॉवर, नौपाडा, ठाणे (प.)
भ्रमणध्वनी : ९८२११६१६६२


**मुद्रक**
राजमुद्रा प्रिंटर्स
खोपट, ठाणे (प.)

**अक्षरजुळणी**
अक्षयस्नेह एंटरप्रायजेस
२२, समर्थ निवास, जगन्नाथ भातनकर मार्ग, परळ,
मुंबई - ४०० ०१२. दूरध्वनी : २४१५५३८२.

**मुखपृष्ठ छायाचित्र**
राजू काकडे

**मुखपृष्ठ सजावट**
हेमदत्त सावंत

**स्वागत मूल्य :** १५० रुपये



# निर्भय



# संकल्पनेचा हेतू

महाराष्ट्रात अनेक संघटना, अनेक पक्ष स्वतंत्र विचार, स्वतंत्र मुद्दा घेऊन आपली राजकीय प्रणाली जनतेसमोर मांडतात. प्रत्येकाने आपला मुद्दा ठरवून घेतला आहे. हा मुद्दा (अजेंडा) प्रत्येक वेळी समोर येतोच, तो कोणीही छुप्या पद्धतीने करत नाही. ओबीसी संघटन हे असेच आहे. ज्यात राजकीय पक्षांतले लोक फक्त ओबीसी कल्याणासाठी एकत्र येत आहेत. महाराष्ट्रातल्या राजकारणात ओबीसींचा मुद्दा घेऊन कोणीही वेगळी राजकीय चूल मांडली नाही; परंतु ओबीसी कल्याणाचा विचार मात्र अनेकांनी अनेक वेळा मांडला आहे. या ओबीसी कल्याणाच्या मुद्यावर राजकीय पक्ष नसायला हवा; परंतु एखादं संघटन असायला काय हरकत आहे. प्रत्येक वेळी प्रस्थापित पक्षांनी प्रादेशिक स्तरावरील पक्षांना याबाबत नेहमीच आश्वासनं दिली आहेत. पण स्थानिक जनतेच्या पाठिंब्यावर जे प्रादेशिक पक्ष किंवा जे पक्ष एखादा स्वतंत्र मुद्दा घेऊन लढतात त्यांच्या नेहमीच आश्वासन-भंगाचं माप पदरात पडलं आहे. या सर्वांचा विचार करूनच एक स्वतंत्र संघटन जर बनवलं तर वेगवेगळ्या राजकीय पक्षांत असणारे परंतु समतेचा विचार मानणारे, ओबीसींचं कल्याण मागणारे सर्व या संघटनेच्या माध्यमातून जवळ येऊन महाराष्ट्रातल्या सर्वाधिक असलेल्या ओबीसी जनतेला एकत्र आणू शकतील. याचीच सुरुवात म्हणून आज अनेकजण ही संघटना एकत्र बांधत आहेत. या संघटनेला तसंच एखादं अमोघ नेतृत्व हवं आहे असं नेतृत्व, जे



सक्षम, वैचारिक पाया भक्कम असलेलं आणि लढवय्या वृत्तीचं असू शकेल, असं नेतृत्व महाराष्ट्रात छगन भुजबळ देऊ शकतात यात कोणाचं दुमत होणार नाही. या वाढदिवसाचं निमित्त साधून हे संघटन मजबूत करण्याच्या इराद्याने आम्ही एकत्र येण्याचं ठरवलं आहे. छगनराव भुजबळांचं राजकीय कर्तृत्व, त्यांच्याबद्दलचे विचार प्रातिनिधिक स्वरूपात समोर यावेत म्हणून 'निर्भय' या पुस्तकाची संकल्पना मी मांडली आहे. या पुस्तकाचे संपादन-लेखनाचे काम पत्रकार विलास पवार यांच्यावर सोपवले आहे. सह्याद्री वाहिनीवर तीनशे-साडेतीनशे कार्यक्रम करणाऱ्या विलास पवारांनी माझीसुद्धा मुलाखत सह्याद्रीवर घेतली होती. त्यांची मुलाखत घेण्याची हातोटी व सहजता पाहून मी हे काम त्यांना करण्यास सांगितले आहे. ही जबाबदारी त्यांनी उत्कृष्ट प्रकारे सांभाळली आहे.

'निर्भय' हे पुस्तक समतेचा पुरस्कार करणाऱ्या व ओबीसी कल्याण इच्छिणाऱ्या छगन भुजबळांची विचारधारा समाजवर्गाकडे थोड्या प्रमाणात का होईना आणू शकेल व ओबीसींचे संघटन खऱ्या अर्थाने प्रबळ व प्रगल्भ होईल तसेच महाराष्ट्रातल्या एका राजकीय, वैचारिक पर्वाची नांदी ठरू शकेल असा मला विश्वास वाटतो.

**- आमदार भाई जयंत पाटील**



## संपादकीय

# समतेचा सच्चा सेनानी

महाराष्ट्राचा राजकीय व सामाजिक इतिहास जर सर्व पातळ्यांवर तपासला गेला तर आपल्या लक्षात येईल की फार पूर्वीपासूनच इतर मागासवर्गीय समाजाचा, मग त्यात एके काळचे बलुतेदार असलेले जनसामान्यांचा त्या त्या वेळेच्या राज्यकर्त्यांनी मोठ्या खुबीने आपल्या स्वार्थासाठी वापर केला आहे. रोजीरोटीसारखा मूलभूत प्रश्न घेऊन गरीब मागासवर्गीयांची नेहमीच परवड होत आली आहे. राज्यकर्त्यांच्या प्रलोभनांना गरीब मागासवर्गीय नेहमीच बळी पडत आला आहे. त्यांच्या या परिस्थितीचा त्या त्या काळातल्या श्रेष्ठांनी, सत्ताधाऱ्यांनी पुरेपूर लाभ घेतला आहे.

पूर्व काळापासून सत्ता नेहमीच ब्राह्मणांकडे होती. मग पुढे बदलत्या काळानुरूप ती मराठ्यांकडे आली. मराठे जरी सत्ताधारी झाले तरी खऱ्या अर्थाने सत्ता मराठ्यांकडे कधीही नव्हती. इतर मागासवर्गीयांच्या बाबतीत विचार करायचा झाला तर प्रथम असे ठरवावे लागेल की, इतर मागासवर्गीय म्हणजे नेमके कोण ? इतर मागासवर्गीयांत मग नेमक्या कुणाला समाविष्ट करण्यात आले आहे ? याबाबत मतभिन्नता आहे व वेगवेगळे विचारप्रवाहही आहेत. काहींच्या मते, समाजातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेला वर्ग म्हणजे मागासवर्गीय, तर दुसरा विचारप्रवाह म्हणतो की वर्षानुवर्षे जातीव्यवस्थेवर आधारित असलेला, परंतु सवलतीपासून लांब राहिलेला वर्ग म्हणजे मागासवर्गीय. अनेक विचारमंथनातून लोकसंख्येच्या ५० टक्के खऱ्या अर्थाने जास्त असलेला जो शेतकरी, कामकरी, मजूर, श्रमिक वर्ग. असो.

सामाजिक शोषण व कमकुवत अर्थव्यवस्थेने पीडित ज्यांना आपले स्वतःचे असे मजबूत संघटन नाही. त्यांचे संघटन करण्याचे काम कुठल्याही राजकीय पक्षांनी केले नाही. त्यांचे मजबूत संघटन कदाचित अनेक वर्षांपूर्वी त्यांना मिळालेही असते; परंतु ज्या समाजधुरिणांनी याकरिता प्रयत्न केले त्यांच्या प्रयत्नांना पुढे नेण्याचे काम त्यांच्या सामाजिक आणि राजकीय वारसांनी केले नाही. सामाजिक दृष्टिकोन बदलून पुढे त्या प्रयत्नांना राजकीय स्वरूप देण्यावर संबंधितांचा भर राहिला. असे प्रयत्न फक्त घडीभराच्या मंत्रीपद इ. गोष्टींवर सीमित राहिले. परंतु राजकारणातल्या उच्चतम पदांवर आरूढ होऊनसुद्धा इतर मागासवर्गीयांचे संघटन करण्याचे काम छगन भुजबळ यांनी समता परिषदेच्या माध्यमातून केले आहे. हे संघटन राज्यपातळीवर न ठेवता राष्ट्रीय स्तरावर नेण्याचे काम छगन भुजबळांनी केले आहे. इतर मागासवर्गीयांमधील राजकीय नेत्यांनीही त्यांचे नेतेपद मान्य केले आहे.



भुजबळांनी या इतर मागासवर्गीयांचे नेतृत्व करायचे ही आता काळाची गरज झालेली आहे. राजकीय पक्षांचे वेगवेगळे अस्तित्व असूनसुद्धा राजकारणातल्या वेगवेगळ्या पक्षांच्या नेत्यांनी काळाची गरज ओळखून भुजबळांचे नेतेपद स्वीकारले आहे. भुजबळांनाही त्यांच्या सार्थ क्षमतेची जाणीव आहे, म्हणूनच भुजबळांनी महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शाहू या तिन्ही मान्यवर समाजपुरुषांच्या विचारधारेवर समता परिषदेची मांडणी केली आहे. हा समतेचा विचार पद्धतशीरपणे ते समाजमनात दूरवर पसरवत आहेत. त्यांना प्रतिसादही मोठ्या प्रमाणावर मिळतो आहे. इतका की, देशाच्या राजधानीत, देशाच्या दक्षिणेत हैदराबादमध्ये, देशाच्या उत्तरेकडे बिहारमध्ये या सर्व ठिकाणी त्यांचा समतेचा विचार समर्थपणे रुजला जात आहे आणि त्याचबरोबर त्यांचे नेतृत्वही या समता मानणाऱ्या समाजमनावर ठसा उमटवत चालले आहे. एका योद्ध्यासारखी संयमी, विचारी वाटचाल ते निर्भयपणे करीत चालले आहेत. त्यांच्या या वाटचालीसाठी अनेकांनी आपले शुभेच्छा विचार मांडले आहेत. या विचारांत कोणी त्यांना सामाजिक नेता म्हटले, कोणी योद्धा म्हटले. अनेकांनी त्यांच्या समता विचारांचा गौरवच केला आहे. त्यांच्या सक्षमतेवर विश्वास प्रकट केला आहे.

त्या विचारांचा संग्रह 'निर्भय' या पुस्तकाच्या रूपाने आपल्या समोर मांडला आहे. मान्यवरांच्या लेखाबरोबरच येथे त्यांच्या सामाजिक व राजकीय कारकीर्दीचा संक्षिप्त आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. या पुस्तकाचे शीर्षक काय असावे यासाठी ज्येष्ठ पत्रकार कुमार केतकर, भारतकुमार राऊत, राधाकृष्ण नार्वेकर या सर्वांशी विचारविमर्श करून 'निर्भय' हे नाव दिले गेले आहे. या पुस्तकाची संकल्पना भाई जयंत पाटील यांची आहे. त्यांनी या पुस्तकाचे लेखन, संपादन करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य मला दिले, माझ्यावर पूर्ण विश्वास टाकला आहे. त्यांचा मी मनस्वी ऋणी आहे.

संपादक या नात्याने या लेखांच्या मानकऱ्यांचे आभार मानणे मला आवश्यक आहे. या पुस्तकासाठी मी अनेक संदर्भ तपासले. त्यापैकी लोकसत्ता, महाराष्ट्र टाइम्स, मार्मिक, आपला वार्ताहर, महाराष्ट्र विधी मंडळातल्या भाषणांचे संकलन इत्यादी साहित्य मी संदर्भासाठी वापरले आहे. त्या सर्वांचे आभार! डॉ. संजय गव्हाणे यांचे संशोधनात्मक लेखन सुद्धा मी संदर्भ म्हणून वापरले आहे. त्यांचे आभार! फारच थोड्या अवधीत पुस्तकाच्या टाईपसेटिंगचे व संपूर्ण सजावटीचे काम करणाऱ्या शिवाजी ह. धुरी व त्यांचे सहकारी या सर्वांचे आभार मानणे मी माझे कर्तव्य समजतो. पुन्हा एकदा भाई आ. जयंत पाटील यांनी संकल्पना मांडलेल्या या पुस्तकातले विचार इतर मागासवर्गीय संघटनाचा इतिहास घडविण्यासाठी सुरुवात करणारे ठरोत व राज्यात समतेचा विचार सर्वदूर पसरो, एवढीच इच्छा व्यक्त करून मनोगत येथे संपवतो.

**- विलास पवार**

# राजकीय जीवनालेख

छगन भुजबळांच्या
राजकीय जीवनाबद्दल,
त्यांच्या कारकीर्दीबद्दल एकत्रित
माहिती अजून कुठेही प्रकाशित
झालेली नाही. हे लेखन अनेक संदर्भ
वाचून, काहीजणांशी बोलून केलेले
आहे. या लेखनात उलगडलेली त्यांची
कारकीर्द, राजकीय इतिहास संक्षिप्त
स्वरूपात आहे; परंतु त्यांच्या
व्यक्तिमत्त्वाची ओळख
पटवणारा निश्चित आहे.

# असे घडले, असे लढले छगन भुजबळ

विलास पवार
संपादक /लेखक



समाजकारण, राजकारण, कार्यकर्ता, नेता अशा सर्व बाजूंनी स्वकष्टाने, हिमतीने मार्गक्रमण करणारे छगन भुजबळ कोणत्याही पद्धतीचा राजकीय वारसा बरोबर घेऊन आले नाहीत. राजकारणात सहजपणे पाहिले, व्यक्तींची नावे घेतली किंवा पदावर आरूढ झालेली मोठी नावे पाहिली तर त्यात जवळजवळ ९०% टक्क्यांपर्यंत व्यक्तींना कोणत्या ना कोणत्या नात्याकडून राजकीय वारसा मिळालेला आहे.

'छगन भुजबळ' हे राजकारणातले एक सक्षम, समर्थ नेतृत्व. त्यांना राजकारणाची कोणत्याही प्रकारे परंपरा, वारसा मिळाला नाही. अतिशय गरीब घरात जन्म. अवघ्या दीड वर्षांचे असताना आई चंद्रभागाचा मृत्यू तर १२ वर्षाचा असताना वडील चंद्रकांतराव यांचे छत्र हरपले. तसे वयाच्या दीड वर्षापासून छगन भुजबळ आपल्या मावसआजी जानकीबाई यांच्या घरी माझगावला वाढले. जानकीबाई यांचे पती नथूजी भडके यांनी अगदी आपणहून आनंदाने छगनरावांची जबाबदारी स्वीकारली होती. त्या वेळी नथूजी भडके हे पोलीस खात्यात होते. माझगाव येथील अंजीरवाडी येथे राहत होते. एका लहान खोलीत मोठे भाऊ मगन, बहीण बेबी व छगनराव ही तीन भावंडे, मावसआजी व त्यांचे पती यांच्यासह राहत होती. दरम्यान नथूजी भडकेंचा मृत्यू झाला व पुन्हा हे सगळे कुटुंब आर्थिक संकटात सापडले. छगनरावांच्या वडिलांचा एक गाळा भाजीमार्केटमध्ये होता.

*'मी सत्तेवर आहे तोपर्यंत माझ्यासोबत किती आहेत व नंतर किती असतील याची पर्वा मी करीत नाही; परंतु महात्मा फुले यांच्या विचारांचे चार समता सैनिक जर प्रबोधन शिबिरातून निर्माण झाले तरी मी अत्यंत समाधानी असेन.'*

निर्भय



तेवढाच त्यांना आधार होता. तो गाळा भाड्याने देऊन त्याबदल्यात जानकीबाईंच्या वाट्याला दररोज ३ रुपये व ५ किलो भाजी  येत असे. त्या चाळीत असलेल्या वाण्याच्या किराणा दुकानाबाहेर पडलेले धान्य वेचून व गाळ्याच्या भाड्याच्या बदल्यात मिळालेल्या व ५ किलो भाजी विकून मिळालेल्या पैशात तेल, मीठ व इतर गरजा भागवल्या जात. अशा परिस्थितीत जानकीबाईंनी मुलांना सांभाळले. मुलांना कामाला न पाठवता शाळेत पाठवले. चाळीत अभ्यासाचे वातावरण नव्हते. आजूबाजूला असलेला कामगारवर्ग, शिक्षणाचे महत्त्व सांगणारा कोणी नाही, चाळीत वीज नाही अशा परिस्थितीत शिक्षण कसे घ्यायचे? शिकायचे कशाला तर, पोट भरायला. उत्तम जीवन जगण्यासाठी शिक्षण आवश्यक आहे व उत्तम शिक्षणाद्वारे उत्तम नोकरी वा व्यवसाय करता येतो  असे मानणारा समाजवर्ग सभोवताली नव्हता. शिक्षणापेक्षा नोकरी, मग ती कसलीही असो तिची पोट भरण्याला अधिक गरज आहे असे मानणारा वर्ग मोठ्या प्रमाणावर होता. अशी एकुण मानसिकता त्या परिसरात होती. अशा या वातावरणात छगनरावांनी शिक्षण घेतले. शालेय जीवनातच त्यांनी वक्तृत्वकला अवगत केली. सातवीपर्यंत शिक्षण घेतल्यानंतर एलफिन्स्टन टेक्निकल हायस्कूलमध्ये प्रवेश मिळाला. त्या शाळेतसुद्धा विविधांगी नैपुण्य सिद्ध करून चांगला विद्यार्थी म्हणून नाव मिळवले. मग हे नैपुण्य आंतरशालेय नाट्यस्पर्धेतले होते. बेस्ट कॅडेट म्हणून मिळालेला सन्मान होता. टेक्निकल बोर्डाच्या परीक्षेत छगनरावांचा  पहिल्या पाचात नंबर होता आणि याच गुणाच्या आधारावर त्यांना मेकॅनिकल इंजिनीयरिंगला प्रवेश मिळाला.

'बालपणाचा काळ सुखाचा' अशी कविता म्हणायच्या काळात दुःखाचा, जबाबदारीचा बोजा घेऊन छगनरावांनी जी शैक्षणिक प्रगती केली ती खरे तर 'परिस्थितीमुळे शिकू शकलो नाही' असे सांगणाऱ्यांना शिकवण देणारी आहे. यशासाठी लागणारी धडपड, सातत्य, हिंमत, कष्ट या सर्व गुणांचा समन्वय छगनरावांच्या व्यक्तिमत्त्वात झालेला दिसेल. शालेय जीवनात वर्गात मॉनिटर असणाऱ्या छगनरावांमध्ये त्या काळात नेतृत्वाचे गुण निश्चितच दिसले असतील. वक्तृत्व स्पर्धेच्या दरम्यान विषयाची निवड, आवाजातले चढ-उतार, विषयानुरूप मांडणी, वाचन इ. बाबतची तयारी त्यांनी स्वतः शिक्षकांच्या मदतीने केली. एखाद्या व्यक्तीचा कोणत्याही अंगाने विचार करताना, अभ्यास करताना त्याच्या



व्यक्तिमत्त्वाची बीजे त्याच्या बालपणाच्या काळात रुजलेली असतात. एखाद्या गोष्टीचा परिणाम पुन्हा सगळ्याच घटकांवर सारखाच होतो असे म्हणणे खरे तर चुकीचे ठरेल; परंतु परिस्थितीला सामोरे जाऊन, परिणामाला तोंड देऊन, दुःखाचा वारंवार अनुभव घेऊन व समाजाकडून त्यावेळी मिळालेली वागणूक एखाद्या ताठ कण्याच्या माणसाला आडवा करेल, एखाद्याला जीवनाबाबत पूर्णतः उदासीन बनवेल नाहीतर नकारात्मक गुन्हेगारी मार्गावर ती टाकेल; परंतु छगनराव हे व्यक्तिमत्त्व घडले ते केवळ जीवनात पुढे जाण्याचा दृढनिश्‍चिय, शिक्षणाची कास, स्वावलंबीपणा यातूनच.

आज जे छगनराव भुजबळ आक्रमक, गंभीर, अभ्यासू, सामाजिक समरस दिसतात यामागे त्यांचा बालपणाच्या काळापासून परिस्थितीशी केलेला संघर्ष आहे. खरे तर परिस्थितीशी संघर्ष करून, दोन हात करून जिंकण्याच्या युयुत्सू वृत्तीची त्यांना सवय लागलेली आहे. त्यामुळे संकटांना बेधडक सामोरे जाण्याचा त्यांचा स्वभाव, संकटात संयम न घालवता सहज संकटाकडे प्रवास करण्याची त्यांची वृत्ती ही त्यांच्या बालपणानेच रुजवलेली दिसते.

## राजकारणाकडे वाटचाल

शालेय शिक्षणानंतर यश संपादन करून स्वबळावर 'व्हीजेटीआय'सारख्या इंजिनीयरिंग कॉलेजमध्ये प्रवेश घेऊन मनाजोगत्या विद्याशाखेत म्हणजे मेकॅनिकल इंजिनीयरिंगला प्रवेश मिळवला आणि तेथून काही प्रमाणात नेतृत्वाला सुरुवात झाली. व्हीजेटीआयच्या स्टुडंट युनियनचा सेक्रेटरी म्हणून ते प्रथम निवडून आले. या युवा नेतृत्वातून, विद्यार्थीदशेच्या नेतृत्वगुणातून, त्यांच्यातला नेता घडला होता. त्यानंतरच्या काळात सामाजिक काम सुरू झाले. त्याचा श्रीगणेशा येथील गणेशोत्सवातून सुरू झालेला दिसतो. 'अंजीरवाडी सार्वजनिक गणेशोत्सवा'च्या माध्यमातून हे सामाजिक काम सुरू झाले. आजमितीपर्यंत ते या गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष म्हणून काम पाहत आहेत. इंजिनीयरिंगची परीक्षा पास झाल्यानंतर नोकरी केली. पहाटे तीन वाजता गाळ्यावर उभे राहून भाजी विकण्याचे कामसुद्धा पार पाडणाऱ्या छगनरावांवर, त्यांच्या नेतृत्वगुणांवर भाजीमार्केटमधल्या विक्रेत्यांचा, गाळेधारकांचा विश्‍वास बसला व ते भाजीमार्केटचे



अध्यक्ष झाले. ह्या नेतृत्त्वगुणामुळे ते पुढे राजकारणाकडे पूर्णपणे आकर्षित झाले. त्यावेळची राजकीय परिस्थितीसुद्धा विशिष्ट प्रकारची होती. ज्या परिस्थितीत राजकारणात अनेक व्यक्तिमत्त्वे उजळून निघाली. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र निर्माण झाला होता. व्यापार, उद्योग, कारखानदारी, गिरण्या या सर्वांची सूत्रे अमराठी हातात होती. सरकारी, सार्वजनिक क्षेत्रांतसुद्धा अमराठी लोक मोठ्या पदांवर होते. त्यामुळे मराठी तरुणांची मनगटे कामाविना असंतोषानेच रगडली जात होती. त्यावेळी छगन भुजबळसुद्धा त्यात एक होते. ज्या प्रश्नावर शिवसेनेची स्थापना झाली त्या पहिल्या सभेला छगन भुजबळ होते आणि मराठी तरुणाला नोकरी देणाऱ्या संघटनेच्या विचाराला भुजबळांनी वाहून घेतले. ते बाळासाहेबांकडे गेले व त्यांच्यावर शाखाप्रमुख म्हणून जबाबदारी आली. १९६६ मध्ये शिवसेना स्थापन झाली आणि १९६८ मध्ये ती फोफावली. अनेक निष्ठावंत कार्यकर्ते भुजबळांनी भगव्याखाली आणले. डोंगरी, चिंचपोकळीसारख्या भागाची सूत्रे शाखाप्रमुख म्हणून भुजबळ सांभाळत होते. केवळ सामाजिक संघटना म्हणून संघटित झालेल्या शिवसेनेने १९६७ साली ठाणे-मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत भाग घेतला व राजकारणात सहभागी झाली व यानंतर भुजबळांची राजकीय कारकिर्द सुरू झाली.

## शिवसेना, राजकारण व कार्यकर्तृत्व

मराठी माणसाच्या हितसंबंधांची जपणूक करणारी शिवसेना स्थापन झाली. त्या संघटनेचा राजकारणाकडे प्रवाससुद्धा सुरू झाला; परंतु सुरुवातीच्या पहिल्या सभेपासून शिवसेनेबरोबर असलेल्या भुजबळांना येथेसुद्धा नशिबाने हुलकावणी दिली. त्या हुलकावणीने त्यांना शिवसेनेच्या राजकीय वाटचालीत परिणाम भोगावा लागला. त्यांनीच दिलेल्या एका मुलाखतीत त्याबद्दल छापून आले आहे. १९६८च्या मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीला मी उभा राहिलो, पण दुर्दैवाने पराभव पदरी आला. १९६६ ते ६८ मी शिवसेनेत होतो तेव्हा मनोहर जोशी, सुधीर जोशी शिवसेनेत नव्हते. वामनराव महाडिकही नव्हते. शिवसेनेत फक्त बाळासाहेब ठाकरे आणि नाव घेण्यासारखे दत्ताजी साळवी होते. बाकीची मंडळी निवडणुकीच्या काळात आली. ते निवडून आले व मी पडलो. त्यांना सेनेची तिकिटे मी दिली



होती. १९७३ च्या निवडणुकीत मात्र निवडून आलो तोवर हे सर्व मला 'सीनियर' झाले होते. या त्यांनी दिलेल्या मुलाखतीतून त्यांना झालेला क्लेश स्पष्ट दिसतो. त्याबद्दल खंत त्यांच्या जिव्हारी होती.

शिवसेनेत असताना भुजबळांनी मराठी माणसाला, मराठी भाषेला न्याय मिळावा यासाठी सतत प्रयत्न केले. हिंदुत्ववादी भूमिका जेव्हा शिवसेनेने स्वीकारली तेव्हा त्यांनी आक्रमकपणे काम केले. बेळगाव महाराष्ट्राला मिळावा यासाठी आग्रह धरला. १९६९ साली महाराष्ट्र-कर्नाटक सीमा आंदोलन छेडल्यानंतर भुजबळ त्या आंदोलनात सहभागी होण्यामागचे कारण एवढेच होते की मराठी भाषा, महाराष्ट्र यावरचे त्यांचे अतोनात प्रेम. या विषयावर राजकारण करावे असे त्यांच्या मनात कधीच नव्हते. आजही नाही. हे आंदोलन अनेक वर्षे ते लढतच राहिले. या आंदोलनाचा भाग म्हणून जून १९८६ मध्ये ते वेषांतर करून बेळगावला गेले. उत्तर प्रदेशातील एक पत्रकार इक्बाल शेख हे नाव धारण करून ते गोवा मार्गे तेथे पोहोचले होते. बेळगावात इच्छित स्थळी पोहोचणे दुरापास्त होते. या आंदोलनात झालेल्या गोळीबारात सातजण मरण पावले होते. याही परिस्थितीत इच्छित स्थळी झेंडा लावला भुजबळांनी व परिणामस्वरूप अटक झाली व धारवाड जिल्ह्यामध्ये दीड महिना सजा भोगावी लागली. या आंदोलनात सहभागी होताना त्यांनी कशाचीही पर्वा केली नाही. तन, मन व त्याबरोबर आपले अभिनयकौशल्यही (वेषांतर करून) पणाला लावले होते. त्यामुळे शिवसेनेत असताना राजकारण नाही तर आंदोलन अशी एक निश्चित भूमिका घेऊन भुजबळ लढत होते. मराठी माणसाच्या न्याय्य हक्कांसाठी बेफामपणे लढणारे भुजबळ अनेकांनी पाहिले आहेत. मग प्रश्न मराठी माणसावरच्या कोणत्याही अन्यायाचा असेल नाहीतर मुंबईतील बंद कापड गिरण्यांच्या कामगारांचा असेल; परंतु त्यांनी प्रश्न मांडताना केंद्रस्थानी मराठी माणसालाच ठेवले. महाराष्ट्राच्या बेरोजगार तरुणांच्या प्रश्नाला त्यांनी विधानसभेत अनेकवेळा वाचा फोडली आहे.

मराठी चित्रपटसृष्टीत भरडल्या जाणाऱ्या व्यावसायिकांमध्ये मराठी माणसाची बाजू भुजबळांनी सभागृहात लावून धरलेली आहे. त्यांनी मांडलेल्या अनेक मुद्द्यांचा विचार आता मराठी चित्रपटाच्या अनुदान व कराच्या बाबतीत केला जातोय. त्या वेळी सभागृहात मांडलेले विचार आता मार्गदर्शक तत्त्वे म्हणून आचरणात आणले जात आहेत. मराठी भाषेच्या अन्यायाबाबतही अनेक वेळा आक्रमक



भाषा वापरून भुजबळांनी आपले व पक्षाचे विचार मांडले आहेत. मराठी भाषेच्या कार्यालयीन वापराबाबतच्या अनास्थेवर त्यांनी जहाल टीका केली आहे. आज जो काही मराठीचा वापर कार्यालयीन स्तरावर होत आहे त्याचे थोडेफार श्रेय हे भुजबळांच्या विचार-मांडणीला द्यायला हवेत. शिवसेनेसारख्या संघटनेने जेव्हा राजकीय पक्षाचे रूप धारण केले तेव्हाही भुजबळांनी राजकारणी म्हणून अजिबात वर्तन ठेवले नाही. आपले विचार, मते मांडताना त्यांनी मतांचा विचार केला नाही. मग पक्षाशी सुसंगत भूमिका पहिल्यांदा त्यांनी पटवून घेतली नंतर त्यांनी ती समर्थपणे मांडली. मग ती भूमिका रिडल्सवादाबाबत असेल, रस्त्यावरच्या नमाजाबाबत असेल नाहीतर रेशनिंगवरील धान्याबाबत असेल. पण ही भूमिका मांडताना ती निव्वळ न्यायासाठीच मांडलेली आहे; केवळ राजकारणासाठी नाही. जनहिताचा, जनकल्याणाचा प्रश्न त्यात होता आणि तो त्यांनी हिरिरीने मांडला. काही वेळेला प्रश्न मांडताना काही प्रश्नसुद्धा निर्माण केले जातात. वाहणारा वारा मंद असतो तेव्हा सुखावतो, वेगात असतो तेव्हा ऊर्जा निर्मितीसाठी कारण ठरतो; परंतु वादळात रूपांतर झाल्यावर तो काहीसा अनाकलनीय काम करतो. भुजबळांनीही या आवेशात केलेली कामे आहेत. रिडल्सवादाबाबत दलित-सवर्ण असा संघर्ष पेटला असताना मोर्चा काढला जात होता. दलितांनी मोर्चा काढला म्हणून सरकारने रिडल्समधला वगळलेला मजकूर समाविष्ट केला व म्हणून त्याहीपेक्षा मोठा मोर्चा काढण्याचा निर्धार भुजबळांनी केला. यासाठी भुजबळांनी जिवाचे रान करून मोठा मोर्चा काढला. या मोर्चाला प्रत्युत्तर म्हणून दलितांनीही एक भव्य मोर्चा काढला. सेनेच्या ताकदीपेक्षा आमची ताकद जास्त आहे हे दाखवणारा मोर्चा हुतात्मा चौकात येऊन हिंसक झाला आणि १९८५ मध्ये भुजबळ महापौर असताना उभारलेल्या या हुतात्मा स्मारकाची नासधूस केली गेली. हुतात्म्यांचा अवमान सहन केला जाणार नाही अशी प्रतिक्रिया बाळासाहेब ठाकरेंनी दिली होती.

कोणत्याही क्षणी काहीही होऊन दंगे घडण्याचा प्रसंग असताना भुजबळांच्या आवेशपूर्ण कृतीने तणाव शिगेला पोहोचला. भुजबळांनी हुतात्मा स्मारकाचे शुद्धीकरण धार्मिक विधी करून केले. परंतु त्याचा काही विपरीत परिणाम होण्याअगोदर दलित नेत्यांनी हुतात्मा चौकाला पुष्पचक्र अर्पण करून हा वाद मिटवला. या संदर्भात प्रतिक्रिया देताना भुजबळ म्हणाले की, 'आपण हे शुद्धीकरण स्पृश्य-अस्पृश्यतेच्या भावनेतून केले नाही. आम्ही सुशोभीकरण केले म्हणून

त्याच हुतात्मा स्मारकांची विटंबना करायची गरज नाही. माझ्यावर राग असेल तर माझ्यावर हल्ला करा, पण हुतात्मा स्मारकाची विटंबना कशाला करता?'



या प्रकरणात सामाजिक जातीभेदाची भावना त्यांच्या मनात निश्चितच नसावी. कारण तशी ती असती तर त्यांच्या राजकीय वाटचालीतून, त्यांच्या वर्तनातून पुन्हा कधीतरी दिसली असती. खऱ्या अर्थाने सामाजिक पिंड असलेल्या भुजबळांनी केलेले वर्तन खरे तर सामाजिकपणाची खात्री देते. हुतात्मा स्मारकच्या प्रेमापोटी त्यांनी कार्य केले व त्यावर पडदाही टाकला. ते प्रकरण तापत ठेवले जाणार नाही याची त्यांनी काळजीही घेतली.

समतेचा पुरस्कार करणारे व सर्वांना समान न्याय हक्क मिळण्याच्या दृष्टीनेच खरंतर त्यांनी प्रसंगी शिवसेनेची साथसंगत सोडण्याची तयारी दाखवली. मंडल आयोगाच्या शिफारशीची अंमलबजावणी करण्याची घोषणा केंद्र सरकारने १९९० मध्ये केली व शिवसेना, सेनाप्रमुख यांनी त्याला विरोध केला. हा विरोध समतेचा पुरस्कार करणाऱ्या भुजबळांना आवडला नाही. ओबीसींना सवलती मिळण्यास झालेला विरोध भुजबळ सहन करू शकले नाहीत. त्यासाठी त्यांनी शिवसेनेलाच 'जय महाराष्ट्र' म्हटले. त्यामागे अजूनही अनेक छोटी-मोठी कारणे होती. त्यांपैकी सेनेत डावलले जाणे इ. कारणेही होती. मंडल आयोगावरून भुजबळांनी सेना सोडली हे मानण्यास बाळासाहेब तयार नव्हते. त्यांनी स्पष्ट केले की, ते कधीही समतावादी नव्हते. त्यांनी हुतात्मा स्मारक गोमूत्राने स्वच्छ केले होते.

अर्थात हे कृत्य केले होते त्या वेळी ते शिवसेनेत होते. त्या वेळी मात्र सेनाप्रमुखांनी या संदर्भात काही प्रतिक्रिया दिली नव्हती; परंतु आवेशात केलेले हे कृत्य ही आपली विचारसरणी नाही हे भुजबळांनी मंडल आयोगाची पाठराखण करून दाखवून दिले आहे. त्यासाठी पुढच्या राजकीय जीवनाची वाटचाल म्हणून ओ.बी.सी. कल्याण आणि समतेचा मंत्र जोपासायला सुरुवात केली आहे. 'आपला वार्ताहर' या दैनिकास २००२ सालात दिलेल्या मुलाखतीत ते म्हणतात की, मी महापौर असताना व्ही.पी.सिंग यांनी मंडल आयोगाची घोषणा केली. मी या घोषणेचे स्वागत करून महापौर म्हणून पाठिंबा जाहीर केला. ठाकरेंनी मला बोलावले. माझी आणि त्यांची अतिशय गरमागरम चर्चा झाली. त्यांनी मला सांगितले, पाठिंबा द्यायचा नाही. मी म्हणालो, 'ज्या पाठिंब्याच्या जिवावर बहुजन समाजातील शिवसेनेचे १४ आमदार निवडून आले त्यांना तुम्ही धोका देऊ नका.' वादाला सुरुवात झाली. मग माझ्याविरुद्ध 'सामना'तसुद्धा वेगवेगळ्या प्रकारे टीका करण्यात



आली. सुमारे वर्षभर माझी प्रचंड घुसमट होऊ लागली. त्याची परिणती अशी झाली की मी शिवसेना सोडण्याच्या निर्णयापर्यंत आलो. १९९१ च्या डिसेंबरला शिवसेना सोडून मी काँग्रेसमध्ये आलो. अशाच प्रकारचे मत 'टाइम्स ऑफ इंडिया'च्या अंकात मांडले आहे. या मुलाखतीत त्यांनी म्हटले आहे की, 'शिवसेनेचा मुख्य पाया ओ.बी.सी. असताना मला डावलले गेले. मनोहर जोशी, गजानन कीर्तीकर, सुधीर जोशी व मधुकर सरपोतदार या चौकडीने बाळासाहेब ठाकरे यांचा संपूर्ण विश्वास मिळवला. बाळासाहेबांचे कान भरले. त्याचा परिणाम होऊन शिवसेनेतील इतर नेत्यांची अडचण झाली. स्वअस्तित्व विसरून शिवसेनेत राहणे किंवा अस्तित्वासाठी शिवसेना सोडणे एवढे दोनच पर्याय माझ्यापुढे होते. मी शिवसेना सोडण्याचा पर्याय निवडला.

छगनराव भुजबळांचे शिवसेनेतले कार्य वरवर आलिशान, पंचतारांकित उद्योगपतींशी चर्चा करणारे नव्हते तर तळागाळातल्या सर्वसामान्यांशी संपर्क साधण्यात गेलेले आहे. काही टीकाकार कदाचित त्यांच्यावर महत्त्वाकांक्षेमुळे शिवसेना सोडली असा आरोप करतही असतील; परंतु ओबीसी आरक्षणाचा मुद्दा त्यांनी मांडला होता. किंबहुना ओबीसी आरक्षणाला जाहीर समर्थन दिले ही वस्तुस्थिती कोणीही टाळू शकणार नाही. शिवसेनेसारख्या संघटनेत/पक्षात अशा प्रकारचे विचार व मत मांडण्याचा अधिकार कोणालाही नाही हे सर्व मान्य करतात; परंतु ज्या वेळी ओबीसी कल्याणाचा मुद्दा मांडून सेनाप्रमुखांची खप्पा मर्जी झाली आहे हे माहीत असूनसुद्धा त्यावर ठाम राहण्याची भूमिका घेणे आणि तब्बल दोन तपांहून अधिक काळ ज्या पक्षाच्या/संघटनेच्या संघटनेसाठी आयुष्य वेचलेल्या भुजबळांना खरेच अगदी सहज शक्य झाले असेल का ? त्यांना या परिस्थितीमुळे वेदना, क्लेश निश्चितच् झाले असतील.

आपल्या सर्व सहकाऱ्यांना, आदर्श मानलेल्या पक्षनेतृत्वाला सोडून जाणे या सगळ्या गोष्टी ज्यांनी भोगल्या आहेत. तेच अशावेळी होणारा क्लेश समजू शकतात. परंतु समतेच्या विचाराला प्राधान्य देणाऱ्या भुजबळांना याचा पश्चाताप मात्र निश्चितच वाटत नसेल. कारण हा विचार करण्याचे बळ त्यांनी आपल्या भुजांत कधीच निर्माण केले आहे. परिस्थितीशी झगडण्याचे बाळकडू त्यांनी बालपणीच घेतले आहे. अनेक लढे अंगावर घेऊन आंदोलन करून भुजबळांनी सत्तेच्या पदापासून दूर राहिलेल्या ओबीसींच्या मनात आत्मविश्वास निर्माण केला आणि

त्या ओबीसींना आपलाच पक्ष जेव्हा डावलतो आहे जे लक्षात आले त्यावेळी त्यांनी पक्ष सोडण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय ओबीसींच्या एकत्र येण्याबाबत ओबीसींची एकत्रित व्होटबँक तयार करण्याच्या दृष्टीने धाडसाचा ठरलेला आहे. याचे दूरगामी परिणाम राजकारणात आता आतासे दिसू लागले आहेत. येणाऱ्या काळात भुजबळांनी घेतलेल्या या निर्णयाचे परिणाम राजकारणात निश्चितच दिसतील व त्यांच्या निर्विवाद नेतृत्व सर्व थरांवर स्वीकारले जाईल.



एका संघटनेकडून संघटनाकौशल्य पणाला लावून त्या संघटनेचा पक्ष बनवल्यावर एक मोठी कामगिरी खेळून छगनराव भुजबळ आज व्यापक राजकारणावर आपली मोहर उमटवत आहेत आणि समाजातील उपेक्षित गटांकडून, त्यांना पुरेपूर प्रतिसाद मिळतो आहे. या प्रतिसादाकडे व जनसमूहाकडे पाहिल्यानंतर या जननेत्याचे कार्यकर्तृत्व अजून उजळून निघते आहे.

आज देशपातळीवर समतेचा पुरस्कार करणारे पक्ष निव्वळ राजकारण समोर ठेवून आपला अजेंडा मांडतात. परंतु जाणीवपूर्वक समतेचा पुरस्कार खऱ्या अर्थाने समाजातल्या तळागाळात पोहचवणाऱ्या भुजबळांनी समतेच्या विचारासाठी स्वतःशी, स्वकियांशी, प्रस्थापितांशी लढा दिला आहे आणि तो लढा अजून संपलेला नाही.

## राजकीय कारकीर्द

राजकारणात अनेक पदांवर काम करून भुजबळांनी त्या पदाला न्याय दिला आहे. कार्यकर्ता म्हणून सुरू झालेला प्रवास हा अजूनही अविरतपणे चालू आहे आणि भविष्यात तो राजकीय कार्यक्षेत्रात उत्तुंगता गाठणार आहे.

भुजबळांची राजकीय कारकीर्द नगरसेवक म्हणून सुरू झाली आहे. १ एप्रिल १९७३ ते ३१ मार्च १९८४ व अशी १९ वर्षे ते मुंबई महानगरपालिकेचे नगरसेवक राहिले आहेत. १० जून १९८५ ते २४ फेब्रुवारी १९९२ पर्यंत ते नगरसेवक राहिले आहेत. याच काळात १९८५-८६, १९९०-९१ या दोन काळात ते मुंबई महानगरपालिकेचे महापौर होते.

नगरसेवक असताना १९७७-७८, १९८३-८४, १९८७-८८ या काळात महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे सभासद होते.

१९७३-७४ ते १९७७-७८ या काळात ते मनपा स्थायी समितीचे सभासद



होते. या नगरसेवक पदाच्या काळात समित्यांवरील त्यांनी केलेले काम अजूनही लोकांच्या लक्षात आहे. नागरी प्रश्नांची जाण व नगरपालिकेच्या मर्यादा या विषयावर खऱ्या अर्थाने काम केलेला त्यांच्यासारखा नेता महाराष्ट्राच्या राजकारणात अपवादानेच असेल. कारण जवळपास दोन दशकांचा कालावधी नागरी प्रश्नांचा मूलभूत स्तरावर विचार करून नागरी व्यवस्था पाहणाऱ्या महानगरपालिकेतला अनुभव निश्चितच नोंद घेण्यासारखा आहे.

विधानसभा सभासद म्हणून ८ मार्च १९८५ ते ३ मार्च १९९० तसेच ३ मार्च १९९० ते १४ मार्च १९९५ या काळात भुजबळ महाराष्ट्र विधानसभेचे निर्वाचित सभासद होते. या काळात ते शिवसेनेत होते.

डिसेंबर १९९१ नंतर त्यांनी शिवसेनेचा त्याग केला व ते काँग्रेसमध्ये आले.

## मंत्रीपदाची कारकीर्द

त्यांनी डिसेंबर १९९१ ते मार्च १९९३ या काळात ते महसूल मंत्री होते. मार्च १९९३ ते मार्च १९९५ या कालावधीत ते गृहनिर्माणमंत्री होते.

१९९६ ते एप्रिल २००२ व एप्रिल २००२ ते ऑक्टोबर २००४ पर्यंत विधान परिषदेचे सभासद होते.

जुलै १९९६ ते ऑक्टोबर १९९९ या काळात ते काँग्रेसमध्ये असताना महाराष्ट्र विधान परिषदेत विरोधी पक्षनेते होते.

ऑक्टोबर १९९९ ते डिसेंबर २००३ या कालावधीत त्यांनी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री, गृहमंत्री व पर्यटनमंत्री म्हणून जबाबदारी सांभाळली.

सप्टेंबर २००४ मध्ये विधानसभा निवडणुकीनंतर पुन्हा मताधिक्याने ते निवडून आले. व नोव्हेंबर २००४ पासून महाराष्ट्र राज्य शासनात सार्वजनिक बांधकाममंत्री म्हणून कार्यरत आहेत.

राजकीय पदांवर छगनराव भुजबळांचा प्रवेश व कारकीर्द जरी पाहिली तरी प्रत्येक ठिकाणी त्यांनी संघर्ष केलेला आहे. हा संघर्ष कधी राजकीय होता, कधी वैचारिक होता, कधी विरोधकांच्या टीकेला तोंड देण्यासाठी होता; परंतु उपरोल्लिखित ज्या ज्या पदांवर त्यांनी काम केले त्या त्या ठिकाणी त्यांनी त्यांच्या विशिष्ट कार्याचा ठसा मात्र त्यांनी निश्चित उठवलेला आहे. किंबहुना, आपल्या कारकीर्दीत त्यांनी अनेक वैशिष्ट्यपूर्ण निर्णय घेतले व त्यामुळे त्यांची राजकीय कारकीर्द खऱ्या अर्थाने मार्गदर्शक ठरणारी आहे.

## महापौर : एक देदीप्यमान कारकीर्द



छगनराव भुजबळांच्या राजकारणातली ही एक ठसा उमटवणारी, राजकारण्यांना नोंद घ्यायला लावणारी कारकीर्द आहे. मुंबईचे आर्थिक स्तरावरील, राजकीय स्तरावरील महत्त्व सर्वांनाच माहीत आहे. अशा या मुंबई महानगरपालिकेत ते नगरसेवक म्हणून एप्रिल १९७३च्या निवडणुकीत विजयी झाले. नंतर १९८५ मध्ये मुंबईचे ५५ महापौर म्हणून त्यांनी कारकीर्द सुरू केली. येथेसुद्धा भुजबळांनी अनेक रेकॉर्ड केलेले आहेत. भुजबळ हे आमदार असतानाच महापौर झाले. हे दोन्ही मान एकत्रित भूषविणारे ते पहिलेच मानकरी ठरले. स्वातंत्र्योत्तर काळात जन्मलेले ते पहिलेच महापौर ठरले होते, ते निवडून आले तेव्हा ते मुंबई मनपाच्या इतिहासात कमी वयाचे महापौर म्हणून त्यांचा गौरवही करण्यात आला व त्याच दरम्यान झालेल्या आंतरराष्ट्रीय महापौर परिषदेच्या अध्यक्षपदी ते नियुक्त झाल्याने त्यांचा देशभर बऱ्यांपैकी नावलौकिक झाला.

त्यांनी महापौर म्हणून केलेल्या कार्याचा ठोकताळा काही संपूर्णपणे मांडता येणे शक्य नाही. परंतु त्यांनी घेतलेले धोरणात्मक निर्णय, त्यांनी हाताळलेले विषय यांबाबत चर्चा करणे क्रमप्राप्त आहे. कारण तो एका देदीप्यमान कारकीर्दीचा इतिहास आहे. दोनदा महापौर म्हणून निवडून आलेल्या भुजबळांनी मुंबईचे अनेक नागरी प्रश्न सोडविले आहेत.

राज्याची राजधानी सुंदर असावी व मराठीजनांची असावी म्हणून 'सुंदर मुंबई, मराठी मुंबई' अशी घोषणा दिली व त्यावर पुढाकार घेऊन कामही सुरू केले. आज जे रस्ते ट्रॅफिक आयलँडने सुशोभित झालेले दिसतात ती कल्पना भुजबळांनी आपल्या महापौरपदाच्या काळात अमलात आणलेली आहे. सुंदर मुंबई बनविताना आर्थिक मदतीचे आवाहन करताना त्यांनी जो इशारा दिला तो त्यांच्याच शब्दात वाचणे महत्त्वाचे ठरेल. ते म्हणतात, ''देशाच्या आर्थिक नाड्या मुंबईतील उत्पादनावर अवलंबून असल्याने मुंबई वाचवणे म्हणजे देशाला मदत करण्यासारखे आहे. शहरातील सुखसोयी आपल्या सर्वांना वापरावयाच्या असतील तर सर्वांनी कर भरला पाहिजे. फक्त पन्नास टक्के लोकांनी कर भरावयाचा आणि नागरी सुविधांचा लाभ मात्र १०० टक्के लोकांनी घ्यावयाचा हे आता नाही. याप्रकारे इशारा देऊनच नाही तर आपल्या ओळखीचे दुकानदार, कंपन्या, उद्योजक यांना रस्त्याचा दुभाजकाचे महत्त्व पटवून, त्यांच्याकडून ते बांधून घेतले यातून



त्यांनी मुंबईच्या सौंदर्यात भर टाकण्याचा प्रयत्न केला. योग्य प्रकारे वृक्षारोपणाचे कार्यक्रम राबवून वृक्षसंवर्धनाकडे त्यांनी लक्ष दिले.

आपल्या घोषणेप्रमाणे सुंदर मुंबई करत असतानाच 'मराठी' मुंबई असावी म्हणून मुंबईचे प्रवेशद्वार गेट वे ऑफ इंडियावरील बॉम्बेचे मुंबई केले. रस्त्यांवरील, चौकांच्या, पाट्या महानगरपालिकेतर्फे पूर्वी इंग्रजीत लावल्या जात त्या मराठीत लावण्याची पद्धत सुरू केली. आज देशभर मुंबईत उभे राहिलेले हुतात्मा चौक प्रसिद्ध आहे. मुंबईतली ती एक महत्त्वपूर्ण वास्तू ठरली आहे. या हुतात्मा चौकाची सौंदर्यपूर्ण उभारणी ते महापौर असताना त्यांनी केली होती. अंधेरी येथे आर्ट गॅलरी तयार करून मुंबईतील कलाप्रेमींना त्यांनी एक चांगली भेट दिली.

भुजबळ हे स्वतः खेळ व व्यायाम याची आवड ठेवून आहेत. महापौर असताना त्यांनी सांघिक भावना वाढीला लावणाऱ्या क्रीडाप्रकारांना प्रोत्साहन दिले. महापौर चषक कबड्डी स्पर्धा, महापौर चषक कुस्ती स्पर्धा, अतिभव्य अशा मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करून बक्षिसाची सोयीची तरतूद महानगरपालिकेतर्फे केली. नेहमीच खेळांना प्रोत्साहन देण्याची भूमिका त्यांनी घेतली होती.

शिक्षणविषयक कार्य त्यांनी महापौर असताना पार पाडले आहे. स्वतः अपुऱ्या जागेत अभ्यास केलेल्या भुजबळांनी विभागवार अभ्यासिका उघडल्या. महापालिका शिक्षकांबद्दल अनेक वेळा गौरवोद्गार काढून त्यांना वेळोवेळी प्रोत्साहन दिले आहे. फक्त घोषणा करून राजकीय प्रसिद्धी मिळवणे हा भुजबळांचा स्वभाव नाही आणि हा स्वभाव त्यांचा महानगरपालिकेत घडला. महापौर हे शोभेचे पद नाही तर कार्य करण्याचे पद आहे हे त्यांनी कृतीतून दाखवून दिले आहे. महापौरांना काम करण्यासाठी कार्यकारी अधिकार द्यावेत या मागणीसाठीसुद्धा त्यांच्यापासूनच सुरुवात झाली. त्याचे कारण हेच आहे की, त्यांना काम करताना कार्यकारी अधिकार नसल्यामुळे अडचणी निर्माण होत होत्या.

डिसेंबर १९८५ मध्ये नवी दिल्ली येथे 'शहरीकरणात कुटुंबव्यवस्थेची अवस्था' या विषयावर विचार करण्यासाठी परिषद झाली होती. या परिषदेत भुजबळांनी शोधनिबंध वाचला होता, त्यात त्यांचे शहरीकरणामुळे निर्माण झालेले प्रश्न तांत्रिकतेने सोडवता येणार नाहीत तर त्याकडे मानवी प्रश्न म्हणून पाहावे लागेल असे विचार मांडले आहेत. या शोधनिबंधात मांडलेले उपाय सर्वांनीच वाचायला हवेत असे आहेत.

१) प्रथम शहरातील घराचा प्रश्न सोडवला पाहिजे.
२) शहरातील आरोग्याचा प्रश्न सोडवण्यासाठी खास कार्यक्रमाचे आयोजन आवश्यक आहे.
३) शहरातली वाहतूक व्यवस्था कार्यक्षम करावी.
४) कमी खर्चाची ऊर्जा, शक्यतो मानवी शक्ती वापरली जावी. सौर ऊर्जेस प्राधान्य दिले जावे. शक्यतो प्रदूषणमुक्त तंत्रज्ञानास प्राधान्य दिले जावे.
५) शहरीकरणामुळे यंत्रांचा वापर वाढतो पण त्याचबरोबर प्रदूषण वाढणार नाही अशाच पद्धतीचे तंत्रज्ञान असावे.
६) रोजगार निर्माण करण्याच्या शिक्षणाला प्राधान्य देणारे शिक्षण दिले जावे.
७) माहिती बँका तयार केल्या जाव्यात. या बँका प्रश्न सोडविण्यास उपयुक्त ठरतात.



या शोधनिबंधात यांचे अनेक विचार समोर आले आहेत. एक निश्चित विचार, एक योग्य आराखडा आखून, अभ्यास करून एखादा कृती-कार्यक्रम राबवून अंमलबजावणी करण्याचा सवयीमुळे मुंबईचा महापौर कसा असावा याबाबत एक मॉड्युल तयार केले आहे. त्यामुळे त्यांची महापौर कारकीर्द अनेकांच्या लक्षात राहिली आहे.

## काँग्रेस प्रवेश / राष्ट्रवादी काँग्रेस प्रवेश

महाराष्ट्रात ५२ टक्के ओबीसी आहेत. त्यांच्या कल्याणासाठी मी काम करणार आहे व ते शिवसेनेत राहून शक्य नाही. म्हणून मी शिवसेना सोडत आहे, असे म्हणत 'मला आता मोकळा श्वास घेतल्याचे समाधान काँग्रेसमध्ये आल्यापासून वाटते' अशी प्रतिक्रिया त्यांनी शिवसेना सोडताना दिली.

१७ डिसेंबर १९९१ रोजी त्यांनी काँग्रेस पक्षात रीतसर प्रवेश केला व २१ डिसेंबर १९९१ ला त्यांना महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात घेण्यात आले. काँग्रेसमध्ये आल्यावर मात्र त्यांनी शरद पवार हे माझे नेते आहेत हे जाहीर करून त्यांनी मनापासून काँग्रेसवाला होण्याचे ठरविले. महसूलमंत्री म्हणून निवेदन करता त्यांनी ही कबुली दिली की, 'मला समजायला थोडा वेळ लागेल, परंतु समजेल अशा भाषेत मी बोलेन.' आतापर्यंत विरोधी पक्षातला आमदार म्हणून भूमिका बजावताना मंत्रीपद मिळाल्यावर भुजबळ प्रांजळ कबुली देतात. त्याचबरोबर मला काँग्रेस



संस्कृती शिकायची आहे, काँग्रेसवादी व्हावयाचे आहे अशी भूमिकाही स्पष्ट मांडतात. आपल्यातल्या कमतरता, त्रुटी मान्य करून भुजबळांनी अगदी सहज आकलन करून घेतले व सत्तारूढ पक्षाची भूमिका, मंत्रीपदाला आवश्यक असलेला गंभीरपणा त्यांनी पदाचा स्वीकार केल्यानंतर लगेचच लोकांना दाखवून दिला. काँग्रेसमध्ये आल्यावर वस्तुनिष्ठता व वास्तविकतेला प्राधान्य देऊन भावनांना आवर घातला व फक्त पक्ष बदलून नावापुरता बदल न घडविता त्यांनी शिवसेनेतील त्यांची असलेली मानसिकता बदलून काँग्रेस संस्कृती जलद गतीने आत्मसात केली. शिवसेनेत असताना मराठी माणूस त्यांच्या भाषणात केंद्रस्थानी असायचे; परंतु मंत्री झाल्यावर त्यांनी महाराष्ट्राची भूमिका घेतली. नागरी प्रश्नावर ते त्या वेळीही बोलत होते. मंत्री म्हणून निर्णय घेत होते. परंतु त्यामुळे त्यांची भूमिका सर्वसमावेशक व सर्वांना न्याय देणारी होती. शासनाच्या योजनेचे, कृतीचे समर्थन त्यांनी अभ्यासपूर्वक केलेले आहे. शिवसेनेत असताना संयमी भूमिका भुजबळांनी कधीच घेतली नाही. परंतु काँग्रेसमध्ये आल्यावर मात्र संयमी भूमिका घेत लोकशाही पद्धतीने विचार करत वेळ पडल्यास धर्मनिरपेक्षवादी भूमिका त्यांनी घेतली. काही वेळेला शिवसेनेच्या परस्पर विरोधी भूमिका त्यांनी घेतली. हिंदुत्वाला विरोध केला. परंतु सामाजिक न्यायासाठी समाजातील दीनदुबळे दलित या प्रश्नांपासून मात्र ते दूर गेले नाहीत.

छगन भुजबळांनी शिवसेना सोडताना काँग्रेसमध्ये प्रवेश केला. परंतु त्या पक्षांकडून त्यांचा प्रवास राष्ट्रवादी काँग्रेसकडे झाला आहे. सोनिया गांधींच्या पंतप्रधानपदाच्या उमेदवार होण्याच्या भूमिकेला भारतीय नागरिक नसताना मतदार यादीत नाव नोंदवले गेले. शरद पवारांनी त्याला विरोध केला व ही भूमिका स्पष्ट जाहीर केली म्हणून शरद पवारांना काँग्रेस वर्किंग कमिटीने पक्षातून काढण्याचा निर्णय २० मे १९९९ रोजी घेतला. या निर्णयावर शरद पवारांना मनापासून नेता मानणाऱ्या भुजबळांनी त्यांच्याबरोबर जाण्याचा निर्णय घेतला. 'आमचा कॅप्टनच जर काँग्रेसमध्ये राहणार नाही तर आम्ही काँग्रेसमध्ये कसे काय राहू' असा सवाल छगन भुजबळ यांनी केला. महाराष्ट्रातील ६० आमदार शरद पवारांबरोबर आहेत व त्यांच्याबरोबर आपण राहणार ही भूमिका त्यांनी घेतली.

'इंडियन एक्सप्रेस'मध्ये २१ मे १९९९ रोजी त्यांनी दिलेल्या मुलाखतीत



म्हटले आहे की, पवारांना पक्षातून काढण्याचा निर्णय आत्मघातकी आहे. पवार यांनी राष्ट्रीय भावनेतून केला आहे असे विचार मांडले. शरद पवारांच्या विचारांचे व भूमिकेचे उघड समर्थन केले आहे. भुजबळांच्या मानसिकतेचा जर विचार केला तर लक्षात येईल की, त्यांनी नेहमी स्थानिक मराठी माणसाला डावलले जाता कामा नये ही भूमिका घेतली. हीच भूमिका त्यांनी महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नाबाबत घेतली व त्याच प्रकारची भूमिका त्यांनी सर्वोच्च पदावर भारतीय माणसाचे स्थान असावे ही भूमिका शरद पवारांनी मांडली त्यामुळे त्याचे समर्थन भुजबळ करतील हे ओघानेच येते. या भूमिकेमुळे त्यांना काँग्रेसमधून काढले.

छगन भुजबळ यांना काँग्रेस पक्षातून काढल्यानंतर शरद पवार यांनी नियोजित पक्ष स्थापन करण्यासाठी बोलाविलेल्या अधिवेशनाचा स्वागताध्यक्ष केले होते.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या संस्थापक सभासदांपैकी ते एक आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसच्या पहिल्या अधिवेशनाची सर्व व्यवस्था पाहण्याची जबाबदारी पवार यांनी त्यांच्यावरच सोपवली व त्यांनी ती पार पाडली होती. या कामाची पावती म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसचे पहिले प्रदेशाध्यक्ष म्हणून भुजबळांची नियुक्ती पवारांनी केली. जर राज्यात सत्ता आली तर ते सरकारचे नेतृत्व करतील असे एका जाहीर कार्यक्रमात सांगितले. शरद पवारांच्या या विश्‍वासाने भुजबळांमधला कार्यकर्ता जोमाने कामाला लागला; परंतु पक्षातल्या काहीजणांचा विरोधसुद्धा उफाळून वर आला. अशा प्रकारचा विरोध त्यांनी शिवसेनेतसुद्धा झेलला होता. नंतर काँग्रेसमध्येसुद्धा झेलला. त्यामुळे राष्ट्रवादीत या विरोधाची सवयसुद्धा झाली. प्रदेशाध्यक्षपदी कोण असावे यासाठी नेमलेल्या समितीच्या सर्वच्या सर्व म्हणजे २१ सदस्यांनी एकमताने भुजबळांचे नाव सुचवले होते आणि या निर्णयाने शिवसेना, भाजप व काँग्रेस यांना अडचणीत आणले. कारण त्या वेळी येणाऱ्या निवडणुकीत भुजबळ हे राष्ट्रवादीचे अमोघ शस्त्र ठरणारे होते व त्याचा इष्ट परिणाम पुढे दिसून आला.

राष्ट्रवादी काँग्रेसमधला प्रवेश व शरद पवारांचा विश्‍वास त्यांची धडाडी वाढवत होता. या दरम्यान काळाचा महिमासुद्धा दिसून येत होता, तो म्हणजे अगदी १९८८ मध्ये त्यांनी शदर पवारांवर टोकाची टीका केली. त्याच शरद पवारांना त्यांनी नेता मानत शरद पवारांवर टीका करणाऱ्यांचा समाचार घेतला. त्यांची



लोकप्रियता वाढत चालली होती. त्यांच्याच सहकाऱ्यांचा हेवा वाढत जाऊन त्यांना एकाकी पाडण्याचा प्रयत्न झाला व इतक्या संघटितपणे हा प्रयत्न झाला की भुजबळांना भरारी घेणाऱ्या पंखांना थोडा काळ मिटून घेण्याशिवाय पर्याय नव्हता. त्यावर एक उपाय म्हणून त्यांनी थोडाकाळ शांत बसण्याचे ठरवले. पुन्हा ते नव्या जोमाने कामाला लागले.

धडाकेबाज वक्तव्य बिनधास्तपणे करण्याची वृत्ती, धाडसी वृत्ती, दुसऱ्याला लगेच आपलेसे करण्याची तयारी, दुसऱ्यावर विश्वास टाकण्याची वृत्ती ही त्यांच्या स्वभावाची काही वैशिष्ट्ये आहेत आणि यामुळेच त्यांना डावललेले, त्यांच्याकडे दुर्लक्ष केलेले त्यांना आवडत नाही; परंतु राजकारणातल्या अनेक खड्ड्यांतून वर येत अनेक शिखरे पादाक्रांत केलेल्या भुजबळांनी आक्रमक परंतु संयमी, धडाकेबाज पण विचारपूर्वक तात्काळ निर्णय परंतु दूरदर्शीपणाने अशा प्रकारची वृत्ती अंगीकारली आहे आणि त्यामुळेच काँग्रेस व आता राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या विचारधारेत ते शिवसेनेत दोन तपांपेक्षा जास्त काळ राहूनसुद्धा एकरूप झाले आहेत. त्यांची निष्ठा, श्रद्धा, त्यांचा विश्वास, त्यांची धडाडी यासहीत अनेक गुणांनी त्यांना राजकारणातल्या अपरिहार्य अशा उच्च स्थानावर त्यांच्या विरोधकांसहीत समर्थकांनी केव्हाच नेऊन ठेवले आहे. एका पक्षात नेता म्हणून नावलौकिक मिळवताना सामाजिक समरसतेशी एकरूप होत समता परिषदेची घोडदौड त्यांनी चालू ठेवली आहे.

भुजबळांना आज त्यांच्या राजकीय कारकीर्दीबद्दल विचारले तर ते सांगतात की, 'विरोधी पक्षनेता' असताना केलेल्या कामात मी जरा जास्त समाधानी आहे.

जुलै १९९६ ते ऑक्टोबर १९९९ या काळात भुजबळ काँग्रेसचे विरोधी पक्षनेते होते. आक्रमक शैलीच्या वापराबरोबर भुजबळांनी मार्मिक टिपण्यासुध्दा वापरल्या आहेत. त्याचे उदाहरण द्यायचे तर, मार्च १९९८ मधील अधिवेशनात राज्यपालांच्या अभिभाषणावर नंतर त्यांनी केलेल्या भाषणाचे देता येईल. राज्यपालांनी आपल्या भाषणात संस्कृत विद्यापीठ सुरू करण्यात येणार आहे असे सांगितले. तो धागा पकडून ते म्हणाले होते, 'राज्यपालांनी आपल्या भाषणात संस्कृत विद्यापीठ सुरू करण्यात येणार आहे असा उल्लेख केला आहे, याबद्दल मला खरोखरच आनंद होत आहे. संस्कृत विद्यापीठामुळे काही मोठ्या लोकांमध्ये



सुसंस्कृतपणा निर्माण होईल. त्यानंतर श्रीमती पुष्पा भावे यांना कोणी शिवी देणार नाही. संस्कृतपणा आल्यामुळे श्रीमती मृणाल गोरे यांनाही कोणी शिवी देणार नाही. न्यायाधीश, पु.ल. देशपांडे तसेच महात्मा गांधींबाबत कोणी बोलणार नाही अशी मार्मिक, अभ्यासपूर्ण टीका ऐकवून त्यांनी आपल्या भाषणात आक्रमकता ठेवली नसली तरी बोचरी टीका केली.

आजही भुजबळांचे राजकीय विरोधक हे मान्य करतात की भुजबळांनी विरोधी पक्षनेता म्हणून सत्तारूढांवर खरेच अंकुश लावलेला होता. कायदा-सुव्यवस्थेवरील चर्चेच्या वेळी फक्त आरोप नाही तर गुन्ह्यांची आकडेवारी दिली. रमेश किणी यांचा झालेला मृत्यू, अर्थसंकल्पात मांडलेली मते, मुंबई करमणूक शुल्क सुधारणा विधेयकावर केलेले भाषण ही त्यांच्या अभ्यासपूर्ण विषय मांडण्याच्या गुणांची ओळख करून देणारी ठरली. २३ मार्च १९९८ रोजी अंदाजपत्रक सादर होण्यापूर्वीच त्यातील एका विभागाच्या कार्यक्रम अंदाजपत्रकाच्या प्रती वितरित झाल्या. यावर त्यांनी अतिशय विश्लेषणात्मक भाषण करून अंदाजपत्रक (बजेट) सभागृहात मांडण्यापूर्वीच फुटले याबाबत सर्व सदस्यांचे लक्ष वेधून घेऊन त्यांनी सभापतींकडे याबाबत वेगळ्या रूलिंगची मागणी केली.

कायदा-सुव्यवस्थेची ढासळत असलेली परिस्थिती या विषयावर बोलताना भुजबळांनी थेट सत्तारूढ असलेल्या मंत्र्यांना सांगितले की, 'दंगे करणारे मंत्री झाले तर मग दंगे कसे होणार?' या विधानाने सत्तारूढपक्षसुद्धा अवाक् झाला होता.

भुजबळांनी सत्तारूढ पक्षावर लोकशाही पद्धतीने हल्ला केला की त्यांच्या विरोधाला कसे शमवायचे याचे भान विरोधी पक्षाला राहिले नाही आणि त्यातूनच १२ जुलैला शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी हल्ला केला. त्यांच्या बंगल्यातील सामानाची तोडफोड केली गेली. नशीब बलवत्तर म्हणून ते या हल्ल्यातून बचावले. या हल्ल्याचाही भुजबळांनी निषेध करत विरोधी पक्षनेत्यावर हल्ला होत असेल तर हे शासन बरखास्त व्हायला पाहिजे अशी मागणी त्यांनी केली.

विरोधी पक्षनेता म्हणून त्यांनी अनेक प्रश्नांना वाचा फोडली. प्रसंगी कोणावरही आरोप करण्यास ते कचरले नाहीत. शिवसेनाप्रमुखांवर सत्ताबाह्य केंद्र म्हणून थेट आरोप करण्याची हिंमत त्यांनी दाखविली. मायकल जॅक्सन कार्यक्रमाबाबतसुद्धा करोडो रुपयांचा घोटाळा झाल्याचे त्यांनी सभागृहात मांडले.



भ्रष्टाचाराच्या मुद्यावर व्यक्तींवर थेट आरोप करण्याऐवजी एकंदरीत भ्रष्टाचारी बाबींवर त्यांनी आरोप केलेले आढळतात मग तो भ्रष्टाचार रेशनिंगवरील अन्नधान्यांचा असेल नाहीतर खंडणी मागण्याच्या संदर्भात असेल.

एक विरोधी पक्षनेता म्हणून प्रभावी भूमिका भुजबळांनी बजावलेली आहे. या भूमिकेला न्याय देताना त्यांनी आपली आक्रमक शैली, अभ्यासपूर्ण बोलणे, संयमी परंतु आग्रही अशा अनेक गुणांचा मिलाप आपल्याला आहे हे दाखवून दिले. रमेश किणी प्रकरणात, श्रीकृष्ण अहवालाबाबत त्यांनी शासनाला कोंडीत पकडले. शासनाने केलेल्या तांत्रिक त्रुटी, प्रशासकीय चुकीचे निर्णय, एन्रॉन प्रकरण इत्यादी प्रकारांना त्यांनी शासनाला बऱ्यापैकी उत्तरे देण्यास भाग पाडले. राज्यातली कायदा-सुव्यवस्था कशी ढासळली आहे हे दाखवताना विरोध करत ते सप्रमाण सिद्ध केले. त्यांचा विरोधी पक्षनेता म्हणून प्रभाव इतका दांडगा होता की, सत्तारूढ पक्ष कोणताही निर्णय घेताना आता भुजबळ या निर्णयावर कोणता आक्षेप घेणार याचा विचार अगोदर करायचे.

एका अर्थाने संसदीय लोकशाहीत विरोधी पक्ष, विरोधी पक्षनेत्याचं काम याबाबत जे अव्वल गुण हवेत, जी स्पष्ट भूमिका हवी ती भुजबळांनी घेतली होती. त्यामुळे राज्यात खऱ्या अर्थाने विरोधी पक्षनेता म्हणून न्याय देणारी व्यक्ती म्हणून त्यांचे महत्त्व राजकीय विरोधकही स्पष्टपणे मान्य करतात. ज्या काही भूमिका त्यांनी आतापर्यंत पार पाडल्या त्या सर्व त्यांनी यशस्वीपणे पार पाडल्या. त्या भूमिकेस प्रामाणिक राहून भुजबळांनी आपण भूषविलेल्या प्रत्येक पदाची मान उंचावली आहे. त्यांनी भुषविलेल्या विरोधी पक्षनेत्याची भूमिकासुद्धा अशीच लक्षणीय आणि लक्षात राहण्यासारखी आहे.

## शैक्षणिक कार्य

छगनराव भुजबळ जसे कुशल राजकारणी तसेच त्यांनी केलेले शैक्षणिक कार्यसुद्धा अगदी उच्चतम प्रकारातले आहे. १० जुलै १९८९ ला मुंबई एज्युकेशन ट्रस्ट (MET) ची स्थापना त्यांनी केली. या संस्थेची स्थापना करताना शैक्षणिक व्यवस्थापन, व्यावसायिक पद्धतीने शिक्षण, शिस्त व ज्ञानसंवर्धनाच्या दृष्टीने देणे हा उद्देश होता. याचबरोबर व्यावसायिक शिक्षण गरीब, मध्यमवर्गाला परवडावे



ही संकल्पना त्यामागे होती. त्यांची ही शैक्षणिक संस्था म्हणजे शैक्षणिक गुणवत्तेचा एक आदर्श नमुना आहे. मेट या संस्थेतर्फेच अनेक शैक्षणिक पोटशाखा चालवल्या जात आहेत ज्यात आधुनिक विद्याशाखांचा अंतर्भाव करून अभ्यासक्रमाची मांडणी केली आहे. हे सर्व अभ्यासक्रम आंतरराष्ट्रीय गरजेचे हवेत असा भुजबळांचा वैयक्तिक आग्रह आजसुद्धा असतो.

आज मेट ही संस्था दक्षिण आशियातील सर्व उत्कृष्ट संस्थांमध्ये गुणवत्तेत १३वी संस्था आहे. या संस्थेला 'बेस्ट एमबीए स्कूल ऑफ एशिया' हा दर्जा मिळालेला आहे. संस्थेने चालविलेल्या शाळा-महाविद्यालय, तांत्रिक संस्था या आदर्श नमुना ठराव्यात अशाच आहेत. अशाच प्रकारे नाशिकला त्यांनी उभारलेले 'भुजबळ नॉलेज सीटी' हे शैक्षणिक केंद्र आधुनिक शिक्षण व्यवस्थेचे एक मूर्तिमंत उदाहरण आहे.

त्यांच्या शैक्षणिक संस्था या निव्वळ शिक्षण प्रसारासाठीच आहेत. त्यामुळे अट्टहास करून कोणताही राजकीय फायदा न घेता स्वतःच्या सहकाऱ्यांचे योग्य सहकार्य घेत भुजबळांनी ही संस्था उभारली आहे. ही संस्था पाहिल्यानंतर संस्थेचे नीटनेटकेपण व भव्य वास्तू डोळ्यात भरते. ही संस्था कोणत्याही राजकीय विचाराला बांधलेली नाही. संस्थेचे स्वरूप शुद्ध व्यावसायिक अशाच प्रकारे ठेवले गेले आहे. स्वतः भुजबळदेखील संस्थेच्या नावाखाली काही राजकीय फायदा मिळावा म्हणून कोणताही उपक्रम राबवीत नाहीत.

या त्यांच्या शैक्षणिक कार्यकर्तृत्वाकडे पाहिले तर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा एक वेगळाच पैलू डोळ्यासमोर येतो. संस्था उभारणीचे त्यांचे कौशल्य व शैक्षणिक क्षेत्रातील कार्य हे अतिभव्य नसले तरी 'दिव्य' मात्र निश्चित आहे.

## सांस्कृतिक

शैक्षणिक कार्याबरोबरच भुजबळांचे सांस्कृतिक कार्य नोंद घेण्यासारखे आहे. शालेय व महाविद्यालयीन जीवनात नाटकात भाग घेणे, वाद-विवाद-वक्तृत्व स्पर्धेतील सहभाग या सर्वांमुळे ते सांस्कृतिक क्षेत्रात काहीतरी करतील याची जाणीव त्यांच्यासकट सर्वांना वाटणे शक्य आहे. या त्यांच्या सांस्कृतिक प्रेमाच्या विचारांना आकार देऊन त्यांनी १९८५ मध्ये 'दैवत' हा मराठी चित्रपट काढला.



या चित्रपटात भुजबळांनी स्वतः डॉक्टरची भूमिका केली आहे. १९९० मध्ये 'नवराबायको' हा दुसरा चित्रपट त्यांनी काढला. दोन्ही चित्रपटांत त्यांनी आशय सामाजिक ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. सांस्कृतिक क्षेत्रात काम केल्याच्या अनुभवाने त्यांना रंगभूमीच्या प्रश्नांची, कलाकारांची, कला कामगारांचे प्रश्नं माहीत होते. म्हणूनच त्यांनी विधिमंडळात हे प्रश्न अनेक वेळा मांडले आहेत. आपल्यातले सांस्कृतिक प्रेम, सांस्कृतिक कार्यातील आवड त्यांनी कधीच शांत बसू दिली नाही. त्या आवडीचा वापर, उपयोग त्यांनी सांस्कृतिक क्षेत्राच्या विकासासाठीच केला आहे. म्हणून सांस्कृतिक क्षेत्रातील अनेकांना ते भावतात ते याचमुळे.

## भुजबळांवरचे आरोप, आक्षेप आणि टीका

'सामर्थ्य आहे चळवळीचे, जो जे करील तयाचे' असं मानणारा वर्ग आपल्याकडे आहे. एका लढाऊ संघटनेत प्रवेश करून त्या संघटनेत सक्रिय चळवळी करत नंतर त्या संघटनेच्या राजकीय प्रवासातदेखील आपलं अनिवार्यपण जोपासणारं व्यक्तिमत्त्व छगन भुजबळांचं आहे. आक्रमक स्वभाव, पटेल ते करणार, योग्य असेल ते बोलणार असा स्वभाव, स्वतःची दखल घ्यावी अशी व्यवहार्य कृती करणार. सतत कोणत्या ना कोणत्या चळवळींशी संबंध, सतत कार्यमग्न, लाखो लोकांचा सततचा राबता, काम घेऊन येणाऱ्यांची गर्दी, ज्यांच्याकडून काम करून घ्यायचं आहे त्यांची गर्दी, काम झालं आहे असं सांगणाऱ्यांची गर्दी, काही जणांनी काम नाही झालं हे सांगण्यासाठी केलेली गर्दी अशा या संमिश्र वातावरणात काही गोष्टी चुकतातच. पण आपल्याकडे एक पद्धत आहे, चांगल्या गोष्टींची चर्चा जास्त होत नाही. एखाद्या वाईट गोष्टीचा मात्र गाजावाजा होतो. भुजबळांच्या कार्यक्रमाची सूत्रबद्ध आखणी, एका दिवसात दीड लाख वृक्षारोपण, वाहतूक बेटे तयार करून रस्त्याचे सुशोभीकरण करणे व मुंबईच्या सौंदर्यात भर घालणे या सर्वांची तुलनेने फार कमी चर्चा व कौतुक झाले, पण त्यांच्यावर टीका, आरोप करताना माध्यमांनी मात्र अजिबात मवाळ भूमिका घेतली नाही. तरीही भुजबळ काम करीत राहिले. आक्षेप, टीका, आरोप तर कधी थोडंफार कौतुक झेलत त्यांनी राजकीय प्रवास चालूच ठेवला.

भुजबळांवर सुरुवातीला आरोप करण्यात आला होता की, ते जातीयवादी



आहेत. कारण मुस्लिमविरोध हा शिवसेनेच्या विचारांचा भाग  आणि त्यासाठी हिंदुत्वाचं कडाडून समर्थन भुजबळांकडून वेळोवेळी होत असायचं. हे समर्थन प्रक्षोभक आहे, अशा प्रकारची टीका माध्यमांनी आणि विरोधकांनीही केली. या आरोपाचं खंडन भुजबळांनी कधीच केलं नाही. याउलट, 'हिंदूंच्या हितसंबंधांचं रक्षण करणं म्हणजे जातीयवाद असेल तर होय मी जातीयवादी आहे' असं मत ते मांडत होते. जातीयवादी आहेत या आरोपाला त्यांनी कधीच जुमानलं नाही. अशाच प्रकारचा आरोप त्यांच्यावर होत होता तो म्हणजे भुजबळ हे संकुचित विचारांचे राजकारणी आहेत म्हणून. बिगर मराठी लोकांच्या ते विरोधात आहेत. परंतु प्रत्यक्षात वस्तुस्थिती तशी नव्हती. मराठी माणसाचा सन्मान झाला पाहिजे, त्याला दुय्यम स्थान मिळू नये, या भुजबळांच्या आग्रहाला संकुचित कसं म्हणता येईल? त्या वेळच्या काँग्रेसजनांचासुद्धा अशा भूमिकेला छुपा पाठिंबा होता हे ऐतिहासिक सत्य आहे. कारण त्या वेळेला महाराष्ट्र-प्रेमाबद्दल जाहीर भूमिका काँग्रेसजनांना घेणं शक्य नव्हतं. (थोड्याफार प्रमाणात आजही ते शक्य नाही.) स्वातंत्र्यानंतर राज्यांची पुनर्रचना भाषिक निकषावर झाली. काही राज्यांची निर्मिती तर ठराविक विशिष्ट व्यक्तिसमूहाला न्याय देण्यासाठी झाली. त्यातूनच झारखंड व छत्तीसगड अशी राज्यं निर्माण झाली. वेगळी राज्यनिर्मिती करणारा हा विचार जर संकुचित ठरत नाही तर भुजबळांच्या वाटेला संकुचित अशी टीका का यावी? मुंबईचे महापौर असताना त्यांच्यावर आरोप झाले. रस्त्याच्या मधल्या मोकळ्या जागेचा योग्य वापर करून मुंबईतल्या बड्या उद्योगपतींना त्याच्या सुशोभीकरणाचा खर्च करायला लावला. मुंबईची शोभा वाढविण्याचा प्रयत्न केल्यायामुळे भुजबळ टीकेचे लक्ष्य ठरले. त्यांच्यावर टीका केली गेली की, भुजबळांनी मुंबईचे रस्ते, मोकळ्या जागा विकायला काढल्या. आज रस्त्यामधले हिरवेगार ताटवे किंवा एखादं सुंदर शिल्प, सभोवताली हिरवळ असलेले वाहतूक बेट पाहिलं की भुजबळांच्या दूरदृष्टीची खात्री पटते. त्या वेळी त्यांच्यावर या विषयावर टीका करणाऱ्या टीकाकारांना भुजबळांनी 'आता तुमचं काय मत आहे?' असं विचारायला हवं आहे.

अनेक राज्यांची व शहरांची नावं बदलली गेली. कलकत्त्याचं कोलकोता, मद्रासचं चेन्नई परंतु बॉम्बचे मुंबई झालं याचा विरोध भुजबळांना बऱ्यापैकी झाला.



मुंबईत रस्त्यांच्या पाट्या इंग्रजीत होत्या त्या मराठीत केल्या यात भुजबळांचा काय गुन्हा? राज्याची ओळख आबाधित राहावी, भाषेचं अस्तित्व ठळकपणे दिसावं यासाठी प्रयत्न करणारा राजकारणी संकुचित कसा काय ठरणार? 'संकुचित' या आक्षेपावर भुजबळांनी काही प्रतिक्रिया दिली नाही. आपलं काम करण्यातच ते मग्न राहिले.

राजकीय आरोपांपैकी त्यांनी केलेलं पक्षांतर केवळ सत्तेसाठी होतं असं मानणारा एक टीकाकारांचा गट आहे. या आरोपाच्या मुळाशी एक परिस्थिती अशी होती, ती म्हणजे - शिवसेनेत गटातटाचे राजकारण सुरू झाले. एका गटाने त्यांना लक्ष्य करून त्यांना डावलण्याची संधी शोधायला सुरुवात केली. त्यात मंडल आयोगाबाबत त्यांचे शिवसेनाप्रमुखांशी झालेले मतभेद, अशा अवस्थेत शिवसेनेतून बाहेर पडण्यासाठी तत्कालीन कारण ठरले ते म्हणजे, त्यांना विरोधी पक्षनेतेपद न देता डावलले गेले. येथेच त्यांच्या स्वाभिमानाला ठेच लागून शिवसेनेतून ते बाहेर पडले. परंतु एका गोष्टीचा विचार करायला हरकत नाही की, आंदोलने करून अनेक आरोप अंगावर घेत, गावागावात शिवसेना पोहोचविणाऱ्या भुजबळांची कृती ही खरंच फक्त सत्तेच्या हव्यासापोटी असेल का? या संदर्भात ७ डिसेंबर १९९१ च्या 'टाइम्स ऑफ इंडिया'मधील भुजबळांची मुलाखत बोलकी ठरेल. त्या मुलाखतीत ते म्हणतात, ''शिवसेनेचा पाया ओबीसी असताना मला डावलले गेले. मनोहर जोशी, गजानन कीर्तीकर, सुधीर जोशी, मधकुर सरपोतदार या चौकडीने बाळासाहेब ठाकरे यांच्यावर नियंत्रण बसविले. त्याचा परिणाम होऊन शिवसेनेतील इतर नेत्यांची अडचण झाली. स्वअस्तित्व विसरून शिवसेनेत राहणे किंवा अस्तित्वासाठी शिवसेना सोडणे एवढेच पर्याय माझ्यापुढे होते, या पर्यायांपैकी मी शिवसेना सोडण्याचा पर्याय निवडला.''

दुसरा एक विचार भुजबळांच्या पक्षांतराबाबत मांडता येणं शक्य आहे तो म्हणजे की, राजकारण करायचं नाही असं म्हणणारी शिवसेना काही महिन्यांतच अचानक महानगरपालिकेची निवडणूक लढविते आणि या संघटनेत पहिल्यापासून असणाऱ्या भुजबळांनवर सत्तेसाठी पक्षांतर केले असा आरोप करते हे कसं काय? कारण राजकारण हे सत्ताप्राप्तीसाठीच केले जाते. त्यासाठीच संघटना बांधल्या जातात आजही हे कटू असले तरी ऐतिहासिक सत्य आहे. भुजबळांनी



शिवसेनेत राहूनच शिवसेनेची सत्ता घालवली असती व दुसऱ्या पक्षाला सत्ता मिळविण्यास मदत केली असती तर ते कदाचित द्रोही ठरले असते, परंतु हे असं झालं नाही. तसे तर पक्षांतर त्यांनी शरद पवारांबरोबरही केले. काँग्रेससारख्या बलाढ्य राष्ट्रीय पक्षाबरोबर असतानादेखील केवळ विचार व तत्त्व यासाठी त्यांनी पक्षत्याग केला व नव्या पक्षाच्या पण ते मानत असलेल्या नेत्यांबरोबर- शरद पवारांबरोबर बाहेर पडले. जर ते काँग्रेसमध्ये राहिले असते तर त्यांची राजकीय कारकीर्द अजून काही वेगळी असती. परंतु नेहमीच स्वत्व भुजबळांनी पणाला लावले आहे.

शिवसेना सोडण्याच्या अनेक कारणांपैकी महत्त्वाचे कारण म्हणजे शिवसेनेचा मंडल आयोगाला विरोध हाच होता असं भुजबळ सांगतात. म्हणूनच शिवसेना सोडल्यानंतर ओबीसींना संघटित करण्याची तयारी भुजबळांनी केली व त्याचाच भाग म्हणून त्यांनी 'महात्मा फुले समता परिषदे'ची स्थापना केली. या संदर्भातसुद्धा त्यांच्यावर ही परिषद भुजबळांनी स्वतःचं राजकीय वजन वाढविण्यासाठी स्थापन केली आहे असा आरोप झाला. प्रत्यक्षात या परिषदेच्या विचारमंथन शिबिरात भुजबळांनी 'राजकीय फायदे उपटण्यासाठी महात्मा फुले समता परिषद नाही' असे स्पष्ट मत मांडले व त्याचबरोबर 'निवडणुका जिंकणे, मंत्रीपदे मिळविणे हे साधन आहे, फुले-आंबेडकर विचारांचा महाराष्ट्र घडविणे हे साध्य आहे व त्या दिशेने समता परिषदेच्या कार्यकर्त्यांनी कामास लागावे' अशा प्रकारचे आवाहन त्यांनी केले. त्यामुळे सत्ता काबीज करण्यासाठी समता परिषद हे सूत्र आतापर्यंत तरी लागू झालेलं नाही.

भुजबळांवर झालेले राजकीय आरोप त्यांनी कधी जिव्हारी लावून घेतले नाही; परंतु त्यांच्या राजकीय वाटचालीत मुद्रांक बनावट घोटाळा प्रकरणी त्यांच्यावर झालेले आरोप मात्र त्यांच्या जिव्हारी लागले आहेत. तेलगी प्रकरणाने विरोधकांनी केलेले आरोप, टीका यांने मात्र भुजबळांच्या विरोधकांचा हेतू साध्य झाला तो म्हणजे त्यांच्या चळवळींना विराम देण्याचा, त्यांना शांत बसविण्याचा!

तेलगी मुद्रांक घोटाळा चर्चिला जातो त्या वेळेला फक्त भुजबळांचं नाव घेतलं जातं याचं, एकमेव कारण आहे की, विरोधकांनी, माध्यमांनी तसेच चित्र रेखाटले म्हणून. भुजबळ हे उपमुख्यमंत्री होते, गृहखातं त्यांच्याकडे होतं. म्हणून त्यांना



यासाठी जबाबदार धरून प्रशासन व शासन भुजबळच चालवितात असा ग्रह करून आरोप केले गेले. मुळातच तेलगी प्रकरण हे अनेक पोलीस अधिकारी, केंद्रीय अर्थमंत्रालय, चलन व निधी विभाग त्याचबरोबर अनेक सरकारी खाती, विभाग यांच्याशी जोडले गेले आणि मुद्रांक घोटाळ्याची व्याप्ती वाढतच गेली. तेलगी प्रकरण हे युतीच्या शासनातच फोफावले म्हणून मुद्दा मांडला जात होता व युती शासनाच्या मंत्र्यांची नावेही जोडली जात होती. बडे बडे पोलीस अधिकारी कर्नाटकसारख्या बाजूच्या राज्यांतले मंत्री, आमदार, पोलीस अधिकारी इत्यादी बड्यांचाही संबंध जोडला गेला. मुंबईच्या तत्कालीन पोलीस आयुक्तांनी तर तेलगीच्या डायरीत १९ मंत्री व इतर राजकीय नेते असल्याचा आरोप केला. जेठमलानींसारख्या ज्येष्ठ विधीज्ञांनी तर थेट पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयींवर या घोटाळ्याबाबत आरोप केला. तेलगी प्रकरणाने अनेक बड्या राजकीय नेत्यांची, शासकीय अधिकाऱ्यांची नावे चर्चेला आली. ते सगळेच यात दोषी आहेत किंवा त्यांचा सहभाग आहे हे सिद्ध झालं नाही, तसंच भुजबळांच्याही बाबतीत ते सिद्ध झाले नाही. परंतु भुजबळांवरच त्या संदर्भात आरोप अगदी मोठ्या प्रमाणात करण्यात आले. एसआयटीने प्रत्यक्षात भुजबळांचे सर्व व्यवहार तपासले. अगदी ते चालवीत असलेल्या मुंबई एज्युकेशन ट्रस्टचे हिशोबही त्यांनी पाहिले, परंतु आरोपात काही तथ्य आढळलं नाही. ते जर आढळलं असतं तर भुजबळांवरही कारवाई झाली असती. त्यांच्या विरोधकांनी ही संधी कदापि सोडली नसती. भुजबळांनीही या आरोपाबाबत स्पष्ट भूमिका घेतली. त्या वेळी ते म्हणाले होते की, ''तेलगी प्रकरणात माझ्यावर खोटेनाटे आरोप केले जात असून या प्रकरणात दोषी आढळल्यास आपण फाशी जाण्यास तयार आहोत.'' असे ठामपणे सांगणाऱ्या भुजबळांनी भूमिका मात्र ताठर घेतली, पण त्यांच्या राजकीय विरोधकांनी त्यांना काही काळ तरी शांत बसविण्यासाठी या आरोपाचा पुरता आधार घेतला. विरोधकांनी भुजबळांना राजकीय पातळीवर अगदी त्यांच्या जवळच्या नातेसंबंधातल्या लोकांनाही सोडलं नाही. काही काळ या आरोपांनी भुजबळ विदीर्ण झाले; परंतु नव्याने आपल्या भुजा सावरून सर्व बळांनी राजकारण, समाजकारणावर त्यांनी मांड ठोकली आहे. टीका, आरोप, आक्षेप यांना सामोरे जात पुढच्या दिशेने भुजबळांची घोडदौड सुरूच आहे.

## महात्मा फुले समता परिषद



छगन भुजबळांचा राजकीय प्रवास हा खरं तर लढाऊ संघटनेकडून सामाजिक संघटनेकडे जातो. स्थानिक मराठी माणसावरील अन्यायाचे परिमार्जन शिवसेनासारखी संघटना करू शकते हे पाहून त्यांनी संघटना विचारांसकट गावागावांत पोहोचवली. ज्या वेळेला समाजातील इतर मागासवर्गीयांना सवलतींपासून बाजूला ठेवलं जात आहे व ती भूमिका घेणाऱ्या पक्षात वर्षानुवर्षं राजकीय प्रवास झालेला असताना सुद्धा त्या पक्षातून ते बाहेर पडले आणि मग त्यांनी 'महात्मा फुले समता परिषदे'ची स्थापना १ नोव्हेंबर १९९२ रोजी मुंबई येथे केली. छगन भुजबळ यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या या परिषदेचा उद्देश व्यक्त करण्यात आला होता की, 'देशभरातील सर्व फुले अनुयायांना संघटित करून महात्मा फुले यांच्या सामाजिक क्रांतिकारक विचारांचा प्रचार, प्रसार, प्रबोधन करणे तसेच महात्मा फुले समता परिषदेचा प्रचार व प्रसार करणे, 'गाव तिथे समता परिषद शाखा झालीच पाहिजे' हा नारा सार्थ करणे, हे समता परिषदेचे उद्देश आहेत. सामाजिक समता हे एकमेव उद्दिष्ट्य डोळ्यासमोर ठेवून समता परिषदेची वाटचाल चालू झाली. ही वाटचाल ज्या वेगात चालू झाली तो वेग लक्षात घ्यायला हवा. महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने जालना येथे ६ जून १९९३ रोजी भव्य क्रांती-मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याचे अध्यक्ष छगन भुजबळ होते. या मेळाव्यात पुण्यातील महात्मा फुले यांचा वाडा हे राष्ट्रीय स्मारक करण्यात यावे अशी मागणी करण्यात आली होती. या मागणीचा पाठपुरावा करत एका महिन्यात पुण्यातील गंजपेठेतील महात्मा फुल्यांच्या वास्तव्याने प्रेरणादायी ठरणाऱ्या वाड्याचे रूपांतर राष्ट्रीय स्मारकात करण्यात आले. १० डिसेंबर १९९३ रोजी हे स्मारक राष्ट्राला अर्पण करण्याचा सोहळा भारताचे राष्ट्रपती डॉ. शंकरदयाळ शर्मा ह्यांच्या हस्ते पार पडला. या कार्यक्रमाला हजर असलेले राज्यपाल पी.सी. अलेक्झांडर यांनी उद्‌गार काढले, 'धिस इज ग्रेटेस्ट गॅदरिंग ऑफ पीपल आय हॅव एव्हरसीन इन माय लाईफ' (एवढा मोठा लोकांचा समुदाय एकत्र जमलेला मी माझ्या आयुष्यात केव्हाच पाहीला नाही.) या कार्यक्रमादरम्यान झालेल्या समता मेळाव्यात छगन भुजबळांनी केलेल्या भाषणात ते म्हणाले की, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विरोध म्हणजे



महात्मा फुले यांनाही विरोधच. नामांतरासाठी समता परिषदेचा संपूर्ण पाठिंबा आहे.' या त्यांच्या विधानाने दलित व ओबीसी या दोन गटांत समतेचे वातावरण तयार केले. समता परिषदेच्या रूपाने एका सामाजिक जागरणाचे पर्व सुरू झाले होते. त्याचाच परिणाम म्हणून मराठवाडा विद्यापीठास डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ हे नाव देण्याची घोषणा समता परिषदेच्या मंचावरून झाली व अंमलबजावणीची वेळही याच मंचावर निश्चित करण्यात आली. परिषदेचा हा नोंद घ्यावा असा सामाजिक विजय आहे.

महात्मा फुले समता परिषद प्रत्येक वर्षी मेळाव्याचे आयोजन करून ओबीसींमधील अनेक छोट्या जातींना एकत्र आणून त्यांना फुले-आंबेडकर-शाहू यांचे विचार सांगून सामाजिक समरसता वाढवून समतेच्या मार्गावर नेत होती. चिंतन शिबिरातून समतेचा विचार सांगणारा, समाजप्रबोधन करणारा कार्यकर्ता तयार केला जात होता. या चिंतन शिबिराचा उद्देश स्पष्ट करताना भुजबळांनी मांडलेले मत वाचणे महत्त्वपूर्ण ठरेल. ते म्हणाले होते की, 'कार्यकर्ता प्रशिक्षण महाशिबिरात तज्ज्ञांकडून मिळणाऱ्या अनमोल विचारधनाचा उपयोग आपल्या स्वत:साठी, समाजासाठी गावात व गावातून राज्यासाठी करावयाचा आहे. सध्याच्या जागतिकीकरणाच्या स्पर्धेत उतरण्यासाठी आपल्याला फुले-शाहू-आंबेडकरांच्या विचारांनी त्या स्पर्धेवर मात करावयाची आहे. गावस्वच्छता, जलसंधारणाप्रमाणेच देशात आणि राज्यात पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांचे प्रमाण कमी झाले आहे. यावर सैनिकांनी गांभीर्याने विचार करणे गरजेचे आहे. समता परिषदेत आलो म्हणजे भुजबळांकडून काम मिळेल असे वाटत असणाऱ्या कार्यकर्त्यांनी समता परिषदेत नाही आले तरी चालेल असे ठणकावून सांगणारे भुजबळ समता परिषद म्हणजे सामाजिक न्यायासाठीच आहे, याची साक्ष देतात.

महात्मा फुले समता परिषद छगन भुजबळांनी स्थापन केली यामागचा हेतू स्पष्ट शब्दांत मांडलेला आहे. तो हेतू त्यांनी एका आवाहन पत्रात मांडलेला आहे, तो पुढीलप्रमाणे आहे -

'महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच छत्रपती शाहू महाराज यांच्या सामाजिक कार्यासंबंधी जनसामान्यांत असलेली माहिती त्रोटक असते. त्यांचे सामाजिक विचारदेखील फारच थोड्या लोकांना परिचित असतात. या तीन

महापुरुषांचे सामाजिक कार्य आणि विचार हे समता परिषदेच्या कार्यकर्त्यांमार्फत सामान्य जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी कार्यकर्त्यांनाच प्रथम त्यासंबंधी ज्ञान उपलब्ध करून देणे हे या शिबिराचे प्रयोजन आहे.'



समता परिषदेचा अनुयायी असलेला समता सैनिक हा विचारांनी-आचारांनी कडवा आणि कट्टर फुले-आंबेडकरवादी व्हावा, समता सैनिकांचे प्रबोधन व्हावे हे देखील या शिबिराचे उद्दिष्ट्य आहे. शिबीर आपण यशस्वी कराल आणि भविष्यात देखील शिबिराचा हेतू सफल कराल अशी खात्री बाळगतो.

समता परिषदेने केलेली वाटचाल व जे यश संपादन केले आहे त्यामध्ये छगन भुजबळांच्या सामाजिक विचारांनी दिलेली दिशा दिसून येते व परिषदेने त्यांच्या विचारांची केलेली पूर्तता एक सामाजिक समतेचा सच्चा सेनानी म्हणून छगन भुजबळ यांच्या सामाजिक विचारांचा विजयच आहे.

सामाजिक समतेच्या विचारांवर एकवटल्या जाणाऱ्या समूहाचा विचार करून त्यांनी नांदेड येथील शिबिरात व्यक्त केलेले मत त्यांच्याच शब्दांत येथे देतो. ते म्हणतात, 'मी सत्तेवर आहे तोपर्यंत माझ्यासोबत किती आहेत व नंतर किती असतील याची पर्वा मी करीत नाही; परंतु महात्मा फुले यांच्या विचारांचे चार समता सैनिक जर प्रबोधन शिबिरातून निर्माण झाले तरी मी अत्यंत समाधानी असेन.'

आज समता परिषदेच्या व्यापक रूपाने राज्य पातळीवर न राहता राष्ट्रीय पातळीवर जोर पकडला आहे. इतर मागासवर्गीयांचे एकवटणारे जनसमुदाय आज भुजबळांकडे एक सक्षम नेतृत्व म्हणून पाहत आहेत. राज्याच्या आाणि राष्ट्रीय राजकारणातला आज छोट्या-मोठ्या राजकीय पक्षांना त्यांच्या सामाजिक समतेची भूमिका पटते आहे. त्याचं नेतृत्व मान्य केलं जात आहे. या जवळ येणाऱ्या सामाजिक विचार पक्षांची ताकद राजकीय क्षेत्रात एक पुरोगामी क्रांतिकारी बदल आणू शकेल आणि हा बदल घडविण्याची क्षमता, धमक छगन भुजबळ यांच्यात निश्चित आहे. त्यांचे ठाम आणि निर्भय विचार आता समाजमनावर उमटले जात आहेत. हे उमटलेले विचार एक नवीन दृष्टिकोन, एक नवा बदल जन्माला घालणार आहेत. नवं जग निर्माण करणार आहेत. आणि या निर्मिकाचं नाव 'निर्भय' आहे. छगन भुजबळ आहे.

❑●❑

## मान्यवरांचे लेख

अनेक मान्यवरांचे लेख येथे संकल्पित केले आहेत. हे संकलन/संपादन या मान्यवरांच्या वेळेचे गणित सांभाळून केले आहे. या लेखनासाठीअनेक वेळा आठवण करून देण्यासाठी त्यांच्या कामात मी व्यत्यय आणलेला आहे; परंतु 'निर्भय'मध्ये ज्या मान्यवरांनी लिहिले आहे ते छगन भुजबळांना ओळखणारे, मानणारे, जवळचे असणारे आहेत. मान्यवरांच्या या लेखात द्विरूक्ती होण्याची शक्यता आहे; परंतु प्रत्येकाने 'छगन भुजबळ' आपल्याला कसे वाटतात याबाबत मनमोकळेपणाने लिहिले आहे.

# बहुजनांचा नेता

## गोपीनाथ मुंडे
राष्ट्रीय सरचिटणीस,भाजपा



छगनरावांचा व माझा परिचय हा कालचा नाही तर माझ्या आठवणीप्रमाणे जवळपास दोन दशके तरी मी त्यांना ओळखतो. एक आक्रमक आणि बहुजनांचा नेता ही माझ्या मनातील त्यांची प्रतिमा सुरुवातीला झाली ती आजतागायत कायम आहे. आमच्या मैत्रीला आणखी एक धागा होता तो म्हणजे आमच्या दोघांत बहुजन समाजाच्या प्रगतीसाठी असलेली आस्था. छगन भुजबळ म्हणजे काय, असा प्रश्न विचारला की उत्तर येते, भुजबळ म्हणजे दिलदार मित्र, भुजबळ म्हणजे आक्रमकता आणि भुजबळ म्हणजे बहुजनांचा नेता.

माझी व त्यांची पहिली ओळख ही १९८४-८५ दरम्यानची असेल. मी विधानसभेत आणि छगनराव त्या वेळी विधान परिषदेत होते. त्या वेळी सरकार काँग्रेसचे होते आणि सरकारच्या निर्णयावर आम्ही हल्ला चढवीत असू. तेव्हापासून छगनराव भुजबळांचे वेगळेपण लक्षात आले. दोन्ही सभागृहांत त्यांनी विषय मांडण्यासंबंधी आमच्या संयुक्त बैठका व्हायच्या, त्या वेळी भुजबळांच्या मांडणीतून त्यांचे वेगळेपण जाणवायचे. सरकारवर इतक्या तीव्रपणे ते हल्ला चढवीत की सरकार हतबल होत असे. त्यांचा आक्रमक हल्ला झाला की सरकार कोंडीत सापडे आणि भुजबळांची दखल घ्यावीच लागे. विधिमंडळाच्या प्रत्येक नियमाची सखोल माहिती असलेले भुजबळ वेगवेगळी आयुधे इतक्या प्रभावीपणे वापरत, त्याचाच परिणाम म्हणजे विरोधकांची संख्या मर्यादित असूनही आमचा आवाज प्रभावी असे आणि सरकारलाही आपल्या निर्णयाचा फेरविचार करावा लागे.

*लोकोपयोगी कामासाठी त्यांना विनंती करा, ती त्यांनी कधीही नाकारले नाही. तसेच विधायक सूचनांचे ते स्वागत करीत असत. आक्रमक आणि लढाऊ वृत्तीबरोबरच मैत्रीतील ओलावा जपण्याचा त्यांचा गुणधर्म फार मोठा आहे.*



भुजबळांबरोबर तेव्हा झालेली मैत्री आजतागायत कायम आहे. मध्यंतरीच्या काळात त्यांच्या कारकीर्दीत बरीच स्थित्यंतरे झाली. आमच्या भूमिका बदलल्या. शिवसेनेतून ते काँग्रेस आणि राष्ट्रवादीत गेले पण या सर्व कालावधीतही त्यांच्याशी असलेली मैत्री कायम राहिली. ते शिवसेनेत असताना माझे सहकारी होते. त्यानंतर ते सरकारमध्ये सामील झाले त्या वेळी मी विरोधी पक्षात होतो. त्यानंतर मी उपमुख्यमंत्री झालो आणि ते विरोधी पक्षनेते. १९९९ नंतर पुन्हा ते सरकारमध्ये गेले तर आम्ही विरोधी पक्षात. या सगळ्या प्रवासात त्यांच्या धोरणावर मी अनेक वेळा सडकून टीका केली. ते सरकारमध्ये आणि मी विरोधी पक्षात असल्याने स्वाभाविकपणे सरकारच्या जनहितविरोधी धोरणावर जोरदार हल्ला केला. पण भुजबळांनी हे कधी व्यक्तिशः घेतले नाही. कारण मी सरकारच्या धोरणावर हल्ला करतोय आणि जनहिताची माझी तळमळ त्यांना पूर्ण माहीत असल्यामुळेच त्यांच्याशी मैत्री कायम राहिली. लोकोपयोगी कामासाठी त्यांना कधीही विनंती करा, त्यांनी कधीही ते काम नाकारले नाही. तसेच विधायक सूचनांचे ते स्वागत करीत असत. आक्रमक आणि लढाऊ वृत्तीबरोबरच मैत्रीतील ओलावा जपण्याचा त्यांचा गुणधर्म फार मोठा आहे.

भुजबळांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी कधीही अन्याय सहन केला नाही. पक्ष कोणताही असला तरी बहुजनांवर होणाऱ्या अन्यायाविरोधात ते कधीही शांत बसले नाहीत. शिवसेनेत असताना अथवा त्यानंतरही आपली भूमिका भुजबळांनी कधी लपविली नाही. म्हणून मंडल आयोगाची अंमलबजावणी झाली पाहिजे हा त्यांचा आग्रह कायम राहिला. कोणताही निर्णय घेतला की तो पूर्ण ताकदीने राबवायचा हा त्यांचा खाक्या आहे. शिवसेनेतून बाहेर पडण्याचा निर्णय हा सोपा नव्हता, पण भुजबळांनी ते करून दाखविले.

बहुजन समाजाप्रती असलेली त्यांची आस्था ही त्यांना नेहमीच पक्षविरहित सन्मान देत राहिली. समता परिषदेच्या माध्यमातून त्यांनी बहुजनांसाठी केलेले कार्य हे त्यांचे बहुजनांबद्दल असलेल्या प्रेमाचे प्रतीक आहे. इतर पक्षांतील लोकांनाही त्यांच्या याच भूमिकेमुळे एक नाते जडत असे. यातूनच आज महाराष्ट्रात एक बहुजन नेतृत्व म्हणून पुढे आले आहे. या समाजाला केवळ नोकऱ्या मिळून प्रगती होणार नाही तर राजकीयदृष्ट्या सजग करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. आज

देशात बहुजन समाजाची संख्या खूप मोठी आहे. भुजबळ बहुजन समाजाचे राष्ट्रीय स्तरावर नेतृत्व प्रभावीपणे करू शकतील. महाराष्ट्राबाहेर मेळावे घेऊन भुजबळांनी तशी सुरुवातही केली आहे. अशा आमच्या दिलदार मित्राबद्दल लिहावे तेवढे थोडे आहे. कारण गेल्या २० वर्षांचा आमचा स्नेह आहे. त्यांच्या आयुष्यातील अनेक चांगल्या-वाईट प्रसंगांचा मी साक्षीदार आहे. त्यामुळे अनेक आठवणी आहेत, पण शेवटी लेखनमर्यादा ठेवावीच लागेल. त्यांच्या पुढील वाटचालीसाठी माझ्या शुभेच्छा!



❑●❑



# छगन भुजबळांचे अभीष्टचिंतन


रामदास आठवले

खासदार

राष्ट्रीय अध्यक्ष, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया


*देशातल्या सामाजिक प्रश्नांबाबतही छगन भुजबळ बांधिलकी ठेवून आहेत. देशभरात ओबीसींच्या प्रश्नांवर जे संघटन उभे होत आहे. देशभरातील ओबीसी जागृतीचे नेतृत्व करण्याची संधी त्यांच्यासमोर आहे.*

आमदार छगन भुजबळ यांचे त्यांच्या वाढदिवसानिमित्त मी हार्दिक अभिनंदन करतो. ज्यांच्याकडून सातत्याने जनतेच्या अपेक्षा वाढत जातात अशा नेत्यांपैकी भुजबळ एक महत्त्वाचे नेते आहेत. भुजबळांचा स्वभाव आणि कार्यशैली अत्यंत आक्रमक आहे. किंबहुना त्याचमुळे ते अधिक लोकप्रिय आहेत. पण राजकारणातली धोरणे ते अतिशय संयमपूर्व हाताळतात यात वाद नाही. सामाजिक प्रश्नांवर राजकारण करीत असताना जबाबदारीचे आणि संयत वर्तनाचे भान ठेवणे हे अत्यंत आवश्यक असते. कारण सामाजिक पिळवणुकीविरुद्ध कठोर भूमिका घेऊनही समाजात द्वेष पसरता कामा नये याची काळजी घ्यावी लागते. छगन भुजबळांसारख्या आक्रमक प्रवृत्तीच्या नेत्याला या जबाबदारीचे अचूक भान आहे, हे आवर्जून नोंदवावे लागते.

छगन भुजबळांच्या राजकारणाची सुरुवात शिवसेनेतून झाली हे सर्वांनाच माहीत आहे. शिवसेनेत असतानादेखील आपल्या आक्रमक स्वभावाने आणि बेडर वृत्तीने त्यांनी शिवसेना वाढवण्याला मोठा हातभार लावला. सीमा-प्रश्नावर आंदोलन करताना त्यांनी मुसंडी मारून सीमा-भागात प्रवेश केला होता. शिवसेनेने एखादी भूमिका घेतली की छगन भुजबळ आक्रमक कृत्ती करून साऱ्या देशाचे लक्ष शिवसेनेकडे आकर्षित करीत. विरोधाचे विलक्षण टोक गाठायची त्यांची जबर हातोटी होती.



छगन भुजबळांच्या रूपानेच शिवसेनेने विधानसभेतला सत्तेचा दरवाजा ठोठावला. भुजबळ हे शिवसेनेतले पहिले आणि एकमेव आमदार होते. शिवसेनेला विधानसभेमध्ये भरघोस जागा मिळण्याचा काळ आणि देशभरात मंडल आयोगामुळे वातावरण ढवळून निघण्याचा काळ हा सारखाच होता. मंडल आयोगामुळे देशभरातल्या बहुजन समाजात जागृतीची लाट आली. सत्ता, शिक्षण आणि नोकऱ्या यांमध्ये बहुजन समाजाला संख्येच्या प्रमाणात वाटा देण्याची भूमिका मंडल आयोगाने घेतली. या जागृतीचा संभाव्य परिणाम ओळखून याला परंपरावादी विचारांच्या लोकांनी विरोध सुरू केला. त्याचसाठी राममंदिराचा मुद्दा राजकारणात आणण्यात आला. महाराष्ट्रात शिवसेनेने बहुजनांच्या आरक्षणाला जोरदार विरोध केला. छगन भुजबळ हे त्या वेळी शिवसेनेचे आमदार आणि मुंबईचे महापौर होते. बहुजन समाजाच्या विकासाची बांधीलकी असणाऱ्या भुजबळांना सेनेची भूमिका मानवणारी नव्हती. प्रचंड घुसमट सहन करून शेवटी त्यांनी शिवसेनेच्या भूमिकेला विरोध केला. याचा परिणाम म्हणून अखेर त्यांना शिवसेना सोडावी लागली.

सुधाकरराव नाईकांच्या मंत्रिमंडळात आम्ही दोघे एकत्र होतो. राज्याचे गृहनिर्माणमंत्री म्हणून त्यांना काम करताना जवळून पाहता आले. दलितांचे अनेक प्रश्न सोडवताना छगन भुजबळ यांचे चांगले सहकार्य मला मिळाले. मी जरी मंत्री होतो तरी मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराचा प्रश्न अजून सोडवायचा बाकी होता. नामांतर आंदोलनाला विरोध झाल्यामुळे गावागावांतील दलित आणि दलितेतर यांची मनं पांगली होती. ही दरी बुजवण्याचे आव्हान मंत्री या नात्याने माझ्यासमोर होते. मी गावागावांत फिरून लोकांची मनं सांधण्याचा प्रयत्न करीत होतो. मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर करण्यासाठी अनुकूल वातावरण तयार करण्याचा प्रयत्न करीत होतो. छगन भुजबळ यांचे आजच्या सारखेच खूप चांगले संबंध होते. छगन भुजबळांनी माझ्या भूमिकेला पाठिंबा देत शरद पवारांकडे नामांतरासाठी आग्रह धरला ही वस्तुस्थिती आहे. म्हणजेच, एका परीने छगन भुजबळांनीही नामांतराच्या यशस्वीतेसाठी योगदान दिले आहे.

छगन भुजबळ हे राष्ट्रवादी काँग्रेसचे मोठे नेते आहेत. ते राज्याच्या सत्तेतही महत्त्वाची भूमिका पार पाडत आहेत. पण तरीही देशातल्या सामाजिक प्रश्नांबाबतही भुजबळ बांधिलकी ठेवून आहेत. देशभरात ओबीसींच्या प्रश्नावर जे संघटन उभे



होत आहे त्यात भुजबळांचाही मोठा वाटा आहे. त्यांनी अलीकडेच हैदराबाद, पाटणा आणि दिल्ली येथे समता परिषदेच्या माध्यमातून ओबीसींचे मेळावे संघटित केले होते. त्या मेळाव्यांना मिळालेला प्रतिसाद पाहता देशाच्या विविध भागांत ओबीसी राजकारणाची जागृती जाणवते आणि त्याचबरोबर या जागृतीचे कुणीतरी सर्व सामर्थ्यानिशी नेतृत्व करावे हेही जाणवते. या दृष्टीने मा. छगन भुजबळ यांच्यासमोर एक आव्हान उभे आहे. देशभरातील ओबीसी जागृतीचे नेतृत्व करण्याची संधी त्यांच्यासमोर आहे.

भारत स्वतंत्र झाला तेव्हा लोकशाहीची संकल्पना स्वीकारून आपण नवा देश निर्माण करायच्या कामाला सुरुवात केली. लोकशाही ही केवळ एक राजकीय व्यवस्था नाहीये. तर लोकशाही हे जीवनमूल्य आहे. एका बाजूला जातिव्यवस्थेमध्ये पूर्णपणे विभागलेली समाजव्यवस्था आणि दुसऱ्या बाजूला लोकशाहीच्या माध्यमातून सर्व पातळ्यांवर समता प्रस्थापित करण्याचे आव्हान अशी विसंगत परिस्थिती आपल्यासमोर होती. याचाच दुसरा अर्थ असा की, जातीअंताचा संघर्ष सुरू करण्याची सर्वात प्रथम निकड आपल्यासमोर होती. भारतातील जातव्यवस्था ही जशी सामाजिक पतप्रतिष्ठेशी निगडित होती, त्याचप्रमाणे आर्थिक उत्पन्नाच्या साधनांशीही निगडित होती. त्यामुळे जातीअंताचा संघर्ष सुरू करताना उपेक्षित जातींना विकासाची संधी उपलब्ध करून देणे हेही आवश्यक होते. सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठा व ज्ञानाची साधने यामध्ये सर्व उपेक्षित जातींना संधी मिळणे आवश्यक होते. तसे झाले नसते तर लोकशाही म्हणजे केवळ बहुमत असलेल्यांची अल्पमतात असलेल्यांवर शिरजोरी एवढाच त्याचा अर्थ झाला असता. बहुमतात असलेल्यांनी अल्पमतात असलेल्यांचा वाटा सहजगत्या हडपला असता. कारण ज्या समाजव्यवस्थेत आपण वावरतोय त्या समाजव्यवस्थेत निखळ राजकीय बहुमत किंवा अल्पमत होणे शक्यच नव्हते. जातीची लोकसंख्या हीच बहुमत किंवा अल्पमत ठरवत होती आणि उपेक्षित जाती या संघटित व जागृत नसल्यामुळे अल्पमतातच होत्या. त्यांना सक्षम करण्यासाठी व सर्वांच्या बरोबरीने आणण्यासाठी झुकते माप देण्याची नितांत गरज होती. नव्हे, तो त्यांचा अधिकार होता. पण ज्या ज्या वेळी उपेक्षित जातीतील नव्या पिढीने ही अधिकाराची भाषा वापरली त्या त्या वेळी धर्माचा आधार घेऊन त्यांना गाफील तरी ठेवण्यात आले किंवा



दहशतीचा वापर करून दंगली तरी घडविण्यात आल्या. मंडल आयोगामुळे समाज जातीजातींत विभागला गेला असा कांगावा काही विद्वान लोक करीत जरी असले; तरी मंडल आयोगामुळे देशभरातल्या बहुजन समूहात हक्काची जागृती निर्माण झाली हीदेखील एक वस्तुस्थिती आहे.

नेमक्या याच सुमारास छगन भुजबळांच्या राजकीय कारकीर्दीला एक अनपेक्षित अशी कलाटणी मिळाली. तोपर्यंत छगन भुजबळ हे शिवसेनेत होते आणि एक आक्रमक नेता म्हणून त्यांची प्रतिमा उभी राहात होती. शिवसेनेची भूमिका जनमानसात लोकप्रिय करण्यात छगन भुजबळांचा मोठा वाट होता यात शंका नाही. पण मंडल आयोगाला शिवसेनेने विरोध सुरू केला त्या वेळी शिवसेनेतून बाहेर पडण्याशिवाय भुजबळांना गत्यंतर नव्हते. तिथूनच, बहुजनांच्या राजकारणाचे त्यांनी नेतृत्व करावे या त्यांच्याविषयी अपेक्षा रुजू लागल्या.

उत्तर प्रदेश, बिहार यांसारख्या उत्तर भारतातल्या मोठ्या राज्यांतून ब्राह्मणी नेतृत्वाचा पगडा होता. याच परिसरातून रामनोहर लोहियांच्या जातीअंताच्या राजकारणाची सुरुवात झाली. बहुजन जातीसमूह हा त्या लढ्याचा आधार होता. नव्या पिढीतले तरुण बहुजन नेते याच आंदोलनातून पुढे आले. राजकीय पक्षांचा भाग जरी वेगळा काढला तरी आज या सबंध पट्ट्यात ओबीसींच्या राजकारणाचा प्रभाव आहे हे नाकारता येत नाही. छगन भुजबळ यांनी उत्तर भारतात घेतलेल्या मेळाव्यांना जो जोरदार प्रतिसाद मिळाला तोदेखील या बहुजन जागृतीचेच घोतक आहे. दक्षिण भारतातही राष्ट्रीय पक्षांना नाकारून जे राज्यस्तरीय पक्ष सत्तेवर येतात त्यांचा कणाही बहुजन समूहच आहेत. देशभरात या समूहांची जागृती वाढत आहे. तिला वैचारिक नेतृत्व देऊन सत्ता, संपत्ती आणि पतप्रतिष्ठेतला वाटा मिळवण्याइतपत सक्षम करणे हीच आताची गरज आहे.

महाराष्ट्राला या सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीची परंपरा आहे. राजर्षी शाहू महाराज, क्रांतिशूर जोतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या मातीत परिवर्तनाचा विचार रुजवला. आज त्यांच्या विचारांचा प्रसार झालेला आहे. ज्या उपेक्षित समूहांसाठी या नेत्यांनी काम केले त्या समूहातही जागृती आहे. या विचारांना विरोध करणारेही कार्यरत आहेतच. त्यांचा विरोध मोडून काढण्यात परिवर्तनवादी विचारांची शक्ती कामी येते. अशा वेळी सर्व



साधनसामुग्रीनिशी जर या विचारांना बळ दिले तर परिवर्तनाच्या मार्गात मोठे काम होईल याचा विश्वास वाटतो. आज लहान लहान समूह संघटित होत आहेत. पण सर्व समूहांची एकत्र ताकद उभी राहात नाही. त्याचे महत्त्वाचे कारण मला असे दिसते की, विशिष्ट सामाजिक हेतूने राजकीय भूमिका घेण्याचा उपेक्षित समूहातही अभाव आहे. केवळ सत्तेच्या जवळ जाण्याचा अनेकांचा प्रयत्न दिसतो. सत्ता हस्तगत करण्यामागचा उद्देश जर सामाजिक समतेच्या प्रेरणा असतील तर सर्व उपेक्षित समूह एकत्र यायला फारसा अडसर उरणार नाही.

या सर्व पातळीवर छगन भुजबळ यांच्याविषयी अपेक्षा तयार झालेल्या आहेत. त्यांची राजकारणाची शैली निश्चितच आक्रमक स्वरूपाची आहे. त्यांचा कार्यकाल जसा वादळी आहे तसाच आज जे राजकीय वातावरण उभे राहू पाहातेय त्यांचे आव्हानही ना. छगन भुजबळांसारख्या नेत्यांसमोर आहे. हे आव्हान पेलण्याचे बळ त्यांना प्राप्त होवो याच अपेक्षा व्यक्त करतो.

# बहुजनांचे नेतृत्व

नितीन गडकरी
अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश भाजपा



महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासातील अनेक संघर्षाचे एक प्रमुख प्रत्यक्षदर्शी, अनेक आंदोलनांना वाचा फोडून जनसामान्यांना न्याय मिळवून देण्याची तळमळ असणारा एक प्रामाणिक कार्यकर्ता आणि महाराष्ट्रातील बहुजनांचे नेतृत्व करण्याचे गुण अंगी असणारा एक ज्येष्ठ-श्रेष्ठ नेता आणि माझे अगदी जवळचे मित्र.

एका झंझावाताप्रमाणे श्री. छगन भुजबळ आपले राजकीय आयुष्य जगत आले आहेत. गेल्या २५-३० वर्षांच्या राजकारणामध्ये मी त्यांना अत्यंत जवळून अनुभवले आहे. त्यांच्या राजकीय कौशल्याची, सामान्यांना न्याय मिळवून देण्याच्या धडपडीची आणि सतत काहीतरी करीत राहण्याच्या चळवळी स्वभावाची अनेक उदाहरणे आज माझ्या नेत्रपटलावरून सरकत आहेत. विरोधी पक्षात असो, सत्तेत असो; त्यांनी कधी विरोधासाठी विरोध केला नाही आणि विरोध करणाऱ्यांबद्दल कधी मनात तेढ ठेवला नाही. या महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये त्यांनी आपल्या कार्यकर्तृत्वाने बहुजनांमध्येच नव्हे तर महाराष्ट्रातील तमाम जनतेसमोर स्वतःची एक वेगळी छाप सोडली आहे. एक दिलेर व्यक्तिमत्त्व आणि सर्वांना सोबत घेऊन चालणारा नेता अशी प्रतिमा आहे.

*बहुजन समाजामध्ये, सर्वसामान्य जनतेमध्ये, सतत कार्यरत राहून जनमानसावर आपल्या कार्याने आणि कर्तृत्वाने छाप पाडणारा हा महाराष्ट्राचा 'जननेताच' आहे असे म्हटले तर ती अतिशयोक्ती होणार नाही.*

श्री. भुजबळ यांनी शिवसेनेमधून आपल्या राजकीय कार्याला सुरुवात केली. शिवसेनेमध्ये अनेक महत्त्वाच्या पदांवर काम करण्याची त्यांना संधी मिळाली आणि त्या प्रत्येक संधीचे त्यांनी निष्ठेने सोने करण्याचा प्रयत्न केला. शिवसेनेनंतर



काँग्रेस आणि त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस असा त्यांचा राजकीय प्रवास झाला आहे. मला आठवतेय, छगन भुजबळ जेव्हा विरोधी पक्षात शिवसेनेसोबत होते तेव्हा शिवसेनेचे बोटावर मोजण्याएवढे सदस्यच विधानसभेवर निवडून आले होते. पण त्याही काळात त्यांनी सरकारला पूर्णपणे नामोहरम करून सोडले. ज्या वेळी भाजपा-सेना युतीचे सरकार राज्यात सत्तेवर आले त्या वेळी श्री. भुजबळ विधान परिषदेत विरोधी पक्षाचे नेते झाले. युतीच्या सरकारलाही वेळोवेळी भंडावणारे प्रश्‍न विचारून आणि त्यांच्या कामगिरीवर अंकुश ठेवण्याचे काम प्रभावी विरोधी पक्षनेते म्हणून त्यांनी केले. एक प्रभावी विरोधी पक्षनेता म्हणून त्यांची कामगिरी संसदीय इतिहासात लिहिली जाईल, इतके अभ्यासू आणि मुद्देसूद ते बोलत असत. सरकारी मंत्र्यांना नामोहरण करणे हे विरोधी पक्षाचे जरी काम असले तरी त्यांनी केवळ विरोधासाठी विरोध कधी केला नाही तर ते विषयाला धरून विरोध करीत असत. मंत्रीपदापेक्षा विरोधी पक्षनेते म्हणूनच ते अधिक राजकीय क्षेत्रात भावले गेले.

युतीची सत्ता गेल्यानंतर राज्यात काँगेस-राष्ट्रवादी काँग्रेसचे सरकार आले आणि छगन भुजबळ महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री झाले. मंत्रीपदी असताना अनेक वाद आणि विवाद त्यांच्यामागे सावलीसारखे राहिले. आम्ही विरोधी पक्ष म्हणून त्यांना कोंडीत पकडण्याचा आणि नामोहरण करण्याचा नेहमीच प्रयत्न केला. आणि आम्हाला त्यात बऱ्यापैकी यशही आले. पण याही परिस्थितीमध्ये अतिशय हिमतीने त्यांनी महाराष्ट्रात काम केले. राजकारणामध्ये व्यक्ती जशी जशी मोठी होत जाते तसे तसे त्याच्यामागे वादही वाढत जातात. उपमुख्यमंत्री-गृहमंत्री असताना श्री. भुजबळांच्या मागे असेच वाद आणि विवाद चिकटून राहिले होते. पण त्याही परिस्थितीत त्यांनी आपला तोल ढळू न देता शक्यतोवर चांगले काम करण्याचा प्रयत्न केला.

महाराष्ट्रातील तळागाळातल्या ओबीसी बांधवांचा विकास व्हावा, त्यांची प्रगती व्हावी याकरिता आता छगन भुजबळ मोठ्या प्रमाणात कार्यरत आहेत. महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशभरातील ओबीसींना संघटित करण्याचे महत्‌कार्य सध्या ते करीत आहेत. तळागाळातील माणसांना सुविधा पुरविण्याबरोबरच त्यांचा विकास करण्यासाठी ते सध्या कटिबद्धपणे काम करीत आहेत.राज्यात

बांधकाममंत्री म्हणून सध्या ते कार्यरत आहेत आणि आजही तळागाळातील माणसांपर्यंत महाराष्ट्राची संस्कृती पोहोचावी यासाठी ते अहोरात्र काम करत आहेत. बहुजन समाजामध्ये, सर्वसामान्य जनतेमध्ये, लोकमानसामध्ये सतत कार्यरत राहून जनमानसावर आपल्या कार्याने आणि कर्तृत्वाने छाप पाडणारा हा महाराष्ट्राचा 'जननेताच' आहे असे म्हटले तर ती अतिशयोक्ती होणार नाही.



श्री. छगन भुजबळ यांची महाराष्ट्राच्याच नव्हे तर देशाच्या राजकारणात अशीच उत्तरोत्तर प्रगती होत राहो, त्यांच्या राजकीय कार्यकर्तृत्वाने महाराष्ट्रातील सर्वसामान्य माणसाचा विकास होवो आणि त्यांच्या हातून उत्तरोत्तर समाजाची अधिकाधिक चांगली सेवा घडो.

❑●❑



# या गुणांचं चीज कधीतरी होणारच.

कुमार केतकर
संपादक, दै. लोकसत्ता

*ज्या प्रकारचं नेतृत्व भुजबळ महाराष्ट्राला देऊ शकतात तसं नेतृत्व कोणीही देऊ शकणार नाही. छगन भुजबळांकडनं महाराष्ट्र फार मोठ्या अपेक्षा करतो आहे.*

छगन भुजबळांची काही वैशिष्ट्ये बहुतेक महाराष्ट्राने अजून नीट लक्षात घेतलेली नाहीत असं मला वाटतं. ते ओबीसी चळवळ चालवितात, समता परिषद चालवितात त्यानंतर ते एक माळी समाजातून आलेलं नवीन नेतृत्व, वगैरे ही चर्चा होते; परंतु माझ्या मते तेवढंच महत्त्वाचं नाही आहे. महाराष्ट्रावरती मुख्यत: जातीवाचक भाषेत बोलायचं झालं तर दोन जातींचा पगडा होता. सुरुवातीच्या काळात राजकारण व समाजकारणावरती पगडा होता ब्राह्मण जातीचा आणि नंतर सत्ताकारण आणि अर्थकारण याच्यावरचा पगडा आहे किंवा होता मराठा जातीचा. या दोन्ही वेळेला म्हणजे ज्या वेळेला ब्राह्मणांचा पगडा होता त्या वेळेला पहिला किंवा नंतर मराठा जातीचा पगडा आला त्या वेळेला, साधारणपणे समाजातले जे उपेक्षित थर किंवा उपेक्षित विभाग म्हणता येतील, त्यांच्यामध्ये ओबीसी होते. त्यांच्यात माळीपण होते, धनगरपण होते. पण तो मुद्दा आपण बाजूला ठेवू. या पार्श्वभूमीवरती महाराष्ट्राचं राजकारण दुर्दैवानं अशा प्रकारच्या जातीवाचक घटनांशी निगडित झालं आणि ते निगडित झाल्यानंतर ज्या वेळेला एका विशिष्ट राजकीय परिस्थितीमध्ये या सर्व समाजातल्या घटकांना काही प्राधान्य दिलं जाईल अशी स्थिती निर्माण झाली तेव्हा स्वाभाविकच छगन भुजबळ राजकारणात अगोदरच आलेले होते. ते राजकारणात आले होते ते शिवसेनेतून. शिवसेना हा पक्ष त्या दृष्टिकोनातनं एक अतिशय महत्त्वाचा पक्ष मानायला हवा.



त्याचं कारण असं की, एका बाजूला काँग्रेस नावाची परंपरा होती, दुसऱ्या बाजूला जनसंघाची परंपरा होती आणि तिसऱ्या बाजूला समाजवादी आणि कम्युनिस्ट अशी एक परंपरा होती. या तिन्ही परंपरांना समांतर अशी शिवसेना ही एक परंपरा होती. आणि शिवसेनेमध्ये प्रामुख्याने समाजातले ते घटक किंवा राजकारणातले ते घटक सामील झाले, ज्यांना या तिन्ही प्रवाहांमध्ये अपेक्षेप्रमाणे सामील होता आलं नव्हतं. स्वाभाविकच शिवसेनेमध्ये आपल्याला सुरुवातीच्या काळामध्ये लक्षात येईल - शहरामधले जे उपेक्षित विभाग आहेत, कनिष्ठ मध्यमवर्गातले आहेत मग ते ब्राह्मणही असतील कनिष्ठ मध्यमवर्गातले मग ते जात वरिष्ठ असेल, पण मध्यमवर्ग, कनिष्ठ असे लोक होते आणि ग्रामीण भागातनं जे शहरात आले ते किंवा ग्रामीण भागातले मुख्यतः ओबीसी हे शिवसेनेकडे ओढले गेले. कारण त्यांना मघाशी म्हटल्याप्रमाणे तीन प्रवाहांमध्ये तेव्हा स्थान नव्हतं. आता एकदा शिवसेनेत आल्यानंतर आणि शिवसेनेची शैली या तिन्ही प्रवाहांच्या बाहेर असल्यामुळे स्वाभाविकच शिवसैनिकांचा जो एक ओढा होता तो ओढा लढाऊपणाकडे होता. म्हणजे प्रत्यक्ष रस्त्यावर प्रश्न सोडवण्याकडे होता. त्याचं कारण ते पारंपरिक राजकारणातनं आलेच नव्हते. आता त्या शिवसेनेच्या शैलीमध्ये कधीतरी राडे झाले, गुंडगिरी झाली, मवालीगिरी झाली, सुरेबाजी झाली, बंदूकबाजीपण झाली; परंतु प्रत्येक शिवसैनिक काही तसा होता असं म्हणता येणार नाही. शिवसेनेची ऊर्मी ही मुख्यतः मराठी माणसाशी आणि या विविध उपेक्षित विभागांशी जोडलेली होती. आणि त्यामुळे शिवसेनेची ताकद वाढायला लागली. शिवसेनेची जी ताकद वाढायला लागली त्याबरोबर भुजबळांचीही ताकद वाढायला लागली. आता भुजबळांची जी ताकद वाढली, म्हणजे एका बाजूला शिवसेनेच्या स्वाभाविक वैशिष्ट्यांमुळे आणि दुसऱ्या बाजूला आपल्या समाजातल्या परिस्थितीचं वर्णन मी केलं त्यामुळे. याच्यातनं भुजबळ नावाचं एक व्यक्तिमत्त्व किंवा एक रसायन आपल्याला तयार झाल्यासारखं दिसतं. त्यांच्यामध्ये शिवसेनेतली धडाडी आहे; परंतु आता शिवसेना सोडल्यानंतर आपण निश्चितपणाने म्हणू शकतो की, शिवसेनेमधला उतावीळपणा त्यांच्यात नाही. शिवसेनेची धडाडी टिकूनही उतावीळपणा त्यांच्यात नाही. शिवसेनेमध्ये असलेली जी मराठी माणसाची तडफ आहे ती टिकूनही ते मराठी माणसाच्या राजकारणाच्या



चौकटीत किंवा सापळ्यामध्ये सापडलेले नाहीत. आणि चौथी गोष्ट, त्यातली तशाच प्रकारची महत्त्वाची म्हणजे, जरी ते काँग्रेसमध्ये आले आणि नंतर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये गेले तरी काँग्रेसचं एक प्रस्थापित पद्धतीचं राजकारण चालू असता ते प्रस्थापित राजकारणाच्या चौकटीत काही सापडले नाहीत. थोड्याफार अंशाने असं म्हणता येईल की, राष्ट्रवादी काँग्रेसची चौकटही थोडीशी प्रस्थापित काँग्रेस पद्धतीची आहे आणि त्याच्यात ते अडकलेले आहेत असं मी म्हटलं तरी भुजबळांचं व्यक्तिमत्त्व, भुजबळांचा स्वभाव हा मात्र असा आहे की, ते फारसा काळ त्या चौकटीमध्ये असे बांधून राहू शकणार नाहीत. इतकी वर्षे शिवसेना बांधू शकली नाही, शिवसेना त्यांना करकचून ठेवू शकली नाही तिथे राष्ट्रवादी काँग्रेस त्यांना करकचून ठेवेल अशा भ्रमामध्ये आपण राहायचं कारण नाही. म्हणजे ते पक्ष सोडतील की नाही हे मला माहिती नाही किंवा त्यांच्या मनात काय आहे हेही मला माहिती नाही आणि मला ते जाणून घेण्याचं कर्तव्य नाही. मला एवढंच सांगायचं की, भुजबळ जो निर्णय घेतील तो धडाडीने घेतील, पूर्ण विचारपूर्वक घेतील, तो उतावीळपणाने घेणार नाहीत. जसं सुरुवातीला ते तारुण्यसुलभ प्रवृत्तीने, लढाऊ प्रवृत्तीने शिवसेनेमध्ये सामील झाले. ज्या वेळेला म्हणजे आता लोकांना लक्षात येत नाही, पण सोळा वर्षांपूर्वी शिवसेना सोडणं आणि आता शिवसेना सोडण्यात खूप फरक आहे. सोळा वर्षांपूर्वी शिवसेना जर त्यांनी सोडली नसती तर कदाचित अशी शक्यता आहे की, १९९५ साली म्हणजे चारच वर्षांत ते ज्या वेळेला शिवसेना-भाजपाकडे सत्ता आली तेव्हा भुजबळच कदाचित मुख्यमंत्री होऊ शकले असते. मला तर खात्रीच आहे, जर ९५ साली कोण मुख्यमंत्री, असा प्रश्न बाळासाहेबांना विचारला असता आणि भुजबळ शिवसेनेत असते तर त्यांनी भुजबळांचंच नाव घेतलं असतं याचा मला निश्चित असा विश्वास आहे. याचं कारण असं, बाळासाहेबांनासुद्धा ते समाजाच्या गतीचं भान त्या वेळेला आलं होतं. आता भुजबळ नाहीत म्हटल्यानंतर मुख्यमंत्रीपदासाठी इतर लोकांचा विचार सुरू झाला असं मला वाटतं. तिथं अजून एका घटनेचा किंवा एका बाबीचा विचार आपण केला पाहिजे तो हा की, ते कदाचित माहीत असूनही भुजबळांनी शिवसेना सोडायचा निर्णय केला आणि काँग्रेसमध्ये आले. याच्यामध्ये नक्कीच त्यांचा ज्याला एकप्रकारे आपण कन्व्हिक्शन म्हणतो, विचार

म्हणतात तो विचार त्यांनी घेतला आणि त्या विचारामुळे ते काँग्रेसकडे आले. याचा अर्थ लगेच सगळी काँग्रेसची धोरणं अभ्यास करून, गृहपाठ करून पाठ केली असं नव्हे. परंतु त्यांना काँग्रेसच्या धोरणाचा, त्या धोरणातली मॅच्युरिटी; काँग्रेसमध्ये जरी प्रस्थापितित्व असलं तरी काँग्रेसकडे मॅच्युरिटी आहे. कदाचित मी असं म्हणू शकतो, जवळजवळ १०० वर्षांपेक्षा अधिक काळ चळवळीमुळे आली आहे, जवळजवळ ५० वर्षांपेक्षा अधिक एका सत्तेत राहिल्यामुळे आलेली आहे; परंतु ती मॅच्युरिटी ही डायरेक्ट भुजबळांकडे आली आहे. ती प्रगल्भता भुजबळांना मिळाली. आणि आता त्यामुळे शिवसेनेतली तडफ आणि काँग्रेसची मॅच्युरिटी असा एक वेगळ्या प्रकारचा संगम आपल्याला भुजबळांकडे झालेला दिसतो; जो अन्य पुढाऱ्यांकडे, काँग्रेसच्या पुढाऱ्यांकडे दिसणार नाही. कारण काँग्रेसच्या पुढाऱ्यांकडे शिवसेनेची तडफ नाही. आणि शिवसेनेच्या पुढाऱ्यांकडे दिसणार नाही. कारण त्यांच्याकडे काँग्रेसची प्रस्थापितातनं आलेली मॅच्युरिटी नाही. भुजबळांकडे हे वैशिष्ट्यपूर्ण गुण आलेले आहेत. आता मघाशी जसं वर्णन केलं तसंच वर्णन कदाचित मी परत करू शकेन पण जर-तरच्या भाषेमध्ये, की जर १९९९ साली त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाण्याचा निर्णय घेतला नसता तर कोणी सांगावं, कदाचित १९९९ च्या ऑक्टोबरमध्ये ते काँग्रेसचे मुख्यमंत्री झालेही असते. परंतु नेमकं त्या सहा महिन्यांअगोदर पक्ष फुटला आणि ते राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सामील झाले. सोनिया गांधींनी प्रत्यक्ष सक्रिय राजकारणात भाग घेण्याच्या अगोदरपासून ते काँग्रेसमध्ये होते. त्या राजकारणात आल्यानंतरसुद्धा ते वर्षभर जवळजवळ होते. तेव्हा सोनिया गांधींनी मला असं वाटतं की भुजबळांना मुख्यमंत्री करण्याचा निर्णय ९९ साली कदाचित केला असता. या पार्श्वभूमीवर जर विचार केला तर जर-तरच्या भाषेमध्ये, योगायोगाच्या भाषेमध्ये तर असं म्हणता येईल की, भुजबळांचं मुख्यमंत्रीपद दोनदा आतापर्यंत हुकलेलं आहे. आता कदाचित ते तिसऱ्यांदा हुकणार नाही. या वेळेला तो येईलही कदाचित; परंतु माझ्या मते ते मुख्यमंत्री होतात की नाही हा प्रश्न तेवढा महत्त्वाचा मी आता मानत नाही. परंतु ज्या प्रकारचं नेतृत्व ते महाराष्ट्राला देऊ शकतात किंवा ते आता देत आहेत तसं नेतृत्व भुजबळांखेरीज दुसरं कोणीही देऊ शकणार नाही. तो केवळ ओबीसींचा किंवा केवळ शिवसेनेतून आलेल्या तडफेचा किंवा काँग्रेसमधून





आलेल्या मॅच्युरिटीचा प्रश्न नसून त्यांना एकूण राजकारणाचं जे भान आलेलं आपल्याला दिसतं ते भान फार महत्त्वाचं आहे. असं भान फार कमी लोकांकडे आहे आणि म्हणून मला असं वाटतं की, जरी छगन भुजबळ आता एकदम फ्रंट पेजेसवरती झळकत नसले, टेलिव्हिजनच्या वाहिन्यांवर अपफ्रंट दिसत नसले तरीसुद्धा या गृहस्थाकडे अजून उमेदीची वर्षं खूप आहेत आणि कोणतं पद त्यांना मिळतंय यापेक्षा ते महाराष्ट्राचं काय करू शकतात याचा विचार केला तर महाराष्ट्रात ते ज्या क्षेत्रात काम करतील ते क्षेत्र ते नक्की उजळून काढू शकतील हा मला आत्मविश्वास आहे. इतकंच नव्हे तर त्यांच्यावरती एवढी आरोपांची बालटं आल्यानंतरसुद्धा त्यांनी धडाडीने त्याला तोंड दिलं आणि त्याच्यातनं ते बाहेर आले. मला असं वाटतं की, या गुणांचं चीज कधीतरी होणारच. त्यांची तपश्चर्या चालू आहे. काँग्रेसला तर फारच तपश्चर्या लागते. शिवसेनेमध्ये तर कमी तपश्चर्येने भराभरा वरची पदे मिळू शकतात. यात दोन्हीही गुण-दुर्गुण आहेत; परंतु मला असं वाटतंय की त्यांच्याकडे आता दोन्ही गुणांचा संगम झालेला असल्यामुळे छगन भुजबळांकडनं महाराष्ट्र फार मोठ्या अपेक्षा करतो आहे. मला खात्री आहे की, या वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांनी तशी शपथ घ्यावी की, त्यांच्या अंगात जी क्षमता आहे ती क्षमता ते महाराष्ट्राला अर्पण करतील.

❒●❑

# उरात धमक, मनगटात ताकद!


भारतकुमार राऊत

संपादक, दै. महाराष्ट्र टाइम्स्




महाराष्ट्र विधानसभेचे 'ते' नागपूर अधिवेशन अनेकांच्या बराच काळ स्मरणात राहील. त्या अधिवेशनात मुख्यमंत्री बदलले नाहीत किंवा अविश्वासाच्या ठरावावर सरकारही कोसळले नाही किंवा एखाद्या मंत्र्याचे कोणते प्रकरणही चव्हाट्यावर आले नाही, तरीही हे अधिवेशन गाजले; याचे कारण छगन भुजबळ नावाचे शिवसेनेचे आमदार २८८ सदस्यांच्या विधानसभेत ते शिवसेनेचे एकमेव आमदार होते. पण तरीही केवळ त्यांच्या अस्तित्वाने केवळ सरकारच नव्हे तर विरोधी पक्षाचे आमदारही पुरते हादरून गेले होते. ज्या काळात हिंदी पडद्यावर 'अँग्री यंग मॅन' अमिताभ बच्चन तरुणांची मने जिंकत होता, पंधरा-वीस सशस्त्र गुंडांशी दोन हात करत होता व कपटी बॉसच्या थोबाडीत मारत होता, त्याच काळात विधानसभेत 'छगन भुजबळ' नावाचे वादळ घोंघावत होते. फर्डे वक्तृत्व आणि कमालीची बेधडक वृत्ती यामुळे भुजबळांनी नागपूर अधिवेशनात सरकारला सळो की पळो करून सोडलेच, शिवाय एकदा असे काही हातवारे केले की, विधानसभा अध्यक्षांना कामकाजातून कोणते शब्द 'वगळावे' हेही समजेना, अशी स्थिती निर्माण केली. कारण 'बोललेले शब्द' कामकाजातून वगळण्याचा रिवाज आहे; हातवाऱ्यांचे काय? भुजबळ यांनी हीच गोम ओळखली आणि संसदीय आयुधांमध्ये आणखी एका अनोख्या अस्त्राची भर घातली. असे भुजबळ.

*महात्मा फुले आणि शाहू महाराज यांचा आदर्श मानणारे भुजबळ ओबीसी समाजाचे 'नेता' बनले, तर ते या समाजासाठी उपकारकच ठरेल. कदाचित त्यांचे हे सामर्थ्य त्यांच्या पक्षालाही अद्याप उमगलेले नसावे.*

पण विधानसभेतील एकहाती युद्ध हीच त्यांची एकमेव ओळख नव्हे. तसे असते तर १९९५ च्या निवडणुकीत त्यांचा माझगाव मतदारसंघातच पराभव



झाला, तेव्हाच भुजबळ संपले असते. पण तसे झाले नाही. ते विधान परिषदेत विरोधी पक्षनेता बनले, नंतर उपमुख्यमंत्री झाले आणि २००४च्या निवडणुकीत नाशिक जिल्ह्यातील यावल मतदारसंघातून पुन्हा विजय संपादन करत त्यांनी आपले अस्तित्व कायम राखले. हे घडले याचे कारण भुजबळ ही आजच्या राजकारणाची गरज आहेत. महाराष्ट्र सामाजिकदृष्ट्या पुरोगामी असला तरी या राज्याचे राजकारण जातींच्या शक्तीवरच खेळले जाते. एका बाजूला सधन व एकगठ्ठा मतांचे सामर्थ्य असलेला मराठा समाज आणि दुसरीकडे अनेक गटांत व नेत्यांत विखुरला गेलेला पण राजकीयदृष्ट्या जागृत असलेला दलित समाज यांच्या कात्रीत महाराष्ट्रातील 'अन्य मागासवर्गीय' (ओबीसी) अडकले आहेत. त्यांची संख्या मोठी, त्यांची क्षमताही मोठी, पण तरीही या समाजाला महाराष्ट्राच्या राजकारणात महत्त्वाची पदे क्वचितच मिळाली, याचे कारण या समाजाला तितक्या ताकदीचे नेतृत्व मिळाले नाही. शिवसेनेचे दुसऱ्या श्रेणीचे नेते याच समाजाचे, पण तरीही मुख्यमंत्रीपद मात्र हाती लागले नाही. काँग्रेसने तर ओबीसींचा विचारच केला नाही. मंडल आयोगाच्या शिफारशीचा प्रश्न ऐरणीवर आला. त्यानंतर देशभरातले ओबीसी एकवटले व चिवटपणाने लढले. महाराष्ट्रात मात्र त्यांचे ऐक्य होऊ शकले नाही. याचे कारण नेतृत्वाचा अभाव.

अशा परिस्थितीत भुजबळांखेरीज अन्य कोणी नेता दृष्टिपथात दिसत नाही. महात्मा फुले आणि शाहू महाराज यांचा आदर्श मानणारे भुजबळ ओबीसी समाजाचे 'नेता' बनले, तर ते या समाजासाठी उपकारकच ठरेल. कदाचित त्यांचे हे सामर्थ्य त्यांच्या पक्षालाही अद्याप उमगलेले नसावे. पण ते वास्तव ओबीसी समाजाने मान्य केलेले दिसते. म्हणूनच तर त्यांनी बोलावलेल्या समता परिषदा असोत वा दिल्लीच्या बोट क्लब मैदानावरील ओबीसींचा विराट मेळावा; त्यांना प्रचंड यश लाभत गेले. ओबीसींचे नेतृत्व हा पक्षांच्या बंधनांच्या बाहेर जाणारा विषय मानला गेला, तर भुजबळांना मोठे सामर्थ्य प्राप्त होऊ शकते. याचे कारण ओबीसींचे प्रश्न राजकारणाच्या परिघाच्या बाहेरचे आहेत.

शिक्षण आणि नोकऱ्यांमधील आरक्षणाचा विषय खरे तर कोणत्याही राजकीय पक्षाच्या अखत्यारीतील असण्याचे कारण नाही. कारण तो मुख्यत्वे सामाजिक व सांस्कृतिक विषय आहे. पण या प्रश्नाला आज केवळ राजकीय कंगोरेच उरले



आहेत, याचे कारण अशा विषयांचा थेट परिणाम मतांवर व त्यामुळे निवडणुकांवर होत असतो. दलितांचा प्रश्न राजकीय बनला, तर त्याचा फायदा दलितांना मिळू शकतो. कारण त्यांची मते एकगठ्ठा ठेवण्यात त्यांचे व सवर्णांचे पुढारी यशस्वी ठरलेले आहेत. ओबीसींचे तसे नाही. त्यांची मते विविध पक्षांत विखुरलेली आहेत. असे घडले याचे कारण ओबीसींना अलीकडच्या काळात प्रभावी नेता न मिळाल्याने त्यांच्यात 'समाज' म्हणून राजकीय इच्छाशक्ती निर्माणच झाली नाही. ओबीसी उमेदवारांना ओबीसी मतदारही जातीच्या निकषावर मतदान करतील, याची शाश्वती नाही. त्यामुळेच मराठा, ब्राह्मण, दलित, मुस्लिम, मारवाडी अशा अठरापगड जातींच्या जोरावर ग्रामपंचायतीपासून लोकसभेपर्यंतच्या निवडणुका लढवल्या जात असताना ओबीसी या प्रचंड आकाराच्या मतदार वर्गाचा मात्र वेगळा विचार होत नाही. या वर्गात बारा बलुतेदारांच्या किमान बारा जाती असल्याने व त्यांच्यात आपसातील हेवेदावे व हितसंबंध असल्याने तेही ठामपणे एकत्र उभे ठाकत नाहीत. त्यांच्यात अधिकृतपणे रोटी-बेटी व्यवहार नाहीत. त्यांच्या एकत्रित शिक्षण संस्था, सहकारी उद्योग वगैरे काहीच नाही. थोडक्यात, या समाजाला सामाजिक व सांस्कृतिकदृष्ट्या एकत्र आणण्याची गरज आहे. केवळ आरक्षणाच्या प्रश्नावर एकत्र येऊन मने जुळण्याची प्रक्रिया होऊ शकत नाही.

हे शिवधनुष्य कोणी तरी उचलायला हवे. भुजबळ यांच्या उरात ती धमक आणि मनगटात ती ताकद आहे. राजकारणातले प्रवास कधी वेगात तर कधी मंद गतीने होतच असतात. त्यात कधी आघाडीला तर कधी पिछाडीला राहावे लागते. पण भुजबळ केवळ राजकीय पुढारी नाही. त्यांच्यात सर्वंकष नेतृत्व देण्याची कुवत आहे व ओबीसी समाजाला समर्थ नेतृत्वाची गरज आहे. या दोहोंचा संगम झाला, तर महाराष्ट्रात मराठा, दलित यांच्या तोडीस तोड अशी ओबीसींची ताकद उभी राहू शकेल. ते काम भुजबळांनी हाती घेतले, तर हे ऐतिहासिक ठरेल.

❏●❏



# भुजबळांना दाबून ठेवता येईल का?

राधाकृष्ण नार्वेकर
सल्लागार संपादक, दै. पुण्य नगरी

*काही प्रमाणात का होईना भुजबळांचा राजकीय वारू दाबून ठेवण्यात हितशत्रूंना यश मिळालेलं आहे; परंतु अशा पद्धतीनं भुजबळांना त्यांच्या राजकीय आशा आकांक्षांपासून कायमचं दाबून ठेवता येईल का?*

'हल्ली छगन भुजबळसाहेबांचं काय चाललं आहे?'

'सध्या भुजबळसाहेब काय करताहेत?'

'हल्ली भुजबळ आहेत तरी कुठे?'

'सध्या भुजबळ गप्प गप्प का?'

'भुजबळांसारखा माणूस स्वस्थ बसून राहतो ही मोठी आश्चर्याचीच गोष्ट नाही का?' असे एक ना अनेक प्रश्न गेल्या दोन-अडीच वर्षांत मला निरनिराळ्या लोकांकडून ऐकले आहेत. एक काळ असा होता की, भुजबळसाहेबांची व माझी खूपच जवळीक होती. सुप्रसिद्ध छायाचित्रकार मंदार काकडे यांच्यामुळे आमची ही दोस्ती झाली होती. त्या काळी भुजबळ नुकतेच महापालिकेत पदार्पण करून नागरी सेवेचे धडे गिरवत होते आणि आम्ही निरनिराळ्या वर्तमानपत्रांत रिपोर्टर म्हणून काम करीत होतो. त्या काळात मंदार काकडे हे आपल्या विलोभनीय छायाचित्रांनी मुंबईतील वृत्तपत्रं गाजवत होते. त्यांच्यामुळे भुजबळांची व आमची ओळख झाली आणि हळूहळू ती खूपच वाढली. आमच्याबरोबर त्या वेळचे 'लोकसत्ता'चे मुख्य वार्ताहर वसंत शिंदे, कुमार कदम, नवीन सोनी असे काही जण होते. आणखीही काही जण होते. मराठीप्रमाणे इंग्रजी, हिंदी, गुजराती अशा विविध भाषांतील वृत्तपत्रांत काम करणाऱ्या पत्रकारांची एक 'गँग'च होती. अर्थात चांगल्या अर्थानं. या सर्वांचं नेतृत्व मंदार काकडे यांच्याकडे होतं आणि मदत म्हणून आम्ही त्यांना आवश्यक ते सहकार्य करीत होतो.



या मदतीचा ओघ सर्वात अधिक होता तो भुजबळांच्या दिशेनं. कारण आम्ही सर्वजण साधारणपणे त्यांच्याच वयाचे होतो. त्यांचं 'दे दणादण आणि विधायक' नेतृत्व आम्हाला भावत होतं. त्या वेळी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्याव्यतिरिक्त शिवसेना गाजवत ठेवलेली होती ती एकट्या छगन भुजबळ यांनीच. शिवसेनेला आक्रमक परंतु विधायक रूप देण्यात त्यांचा मोठा वाटा होता. त्यांच्या डोक्यातून कधी काय कार्यक्रम निघेल याचा काही भरवसा नव्हता. मुंबईतील स्थळं दाखविणारी मराठी नावं, बॉम्बेचं मुंबई, दीड-दोन लाख झाडांची रोपटी एकाच दिवशी लावण्याचा कार्यक्रम, भव्य-दिव्य असं हुतात्मा स्मारक, वेष बदलून बेळगाववर स्वारी असे एक ना दोन, असंख्य कार्यक्रम. अभ्यास-दौऱ्याच्या निमित्तानं अनेक नगरसेवक, आमदार, मंत्री परदेशांच्या वाऱ्या करतात; परंतु परदेशात जे जे चांगलं दिसलं ते ते मुंबईत करणारे भुजबळ हे एकमेव लोकप्रतिनिधी. त्यांचं डोकं म्हणजे अशा कार्यक्रमांचा खजिनाच. त्या खजिन्यातून भराभर कार्यक्रम बाहेर पडायचे आणि ते यशस्वी करण्याची जबाबदारी निरनिराळ्या लोकांवर सोपवली जायची.

भुजबळ पहिल्यांदा महापौर झाले तेव्हा आपणच महापौर झालो असं आमच्यापैकी अनेकांना वाटलं होतं. कारण ते महापौर व्हावेत असं आमच्यापैकी अनेकांना वाटतच होतं. कारण तसं झालं तर मुंबई शहरात विधायक कामांची मोठी साखळी उभी राहील त्या प्रमाणात मराठी माणसाचा ठसा या शहरावर उमटेल असं आम्हाला वाटत होतं. तसं करण्यासाठी आवश्यक असलेली क्षमता भुजबळांत होती. इतर कोणत्याही नगरसेवकापेक्षा त्यांची या दृष्टीनं मोठीच पात्रता होती. एके दिवशी 'नवाकाळ'चे तत्कालीन संपादक श्री. निळूभाऊ खाडिलकर यांनी मला विचारलं, 'काय हो नार्वेकर, या वर्षी महापौर व्हावा असा शिवसेनेत कोण लायक नगरसेवक आहे?'

मी लागलीच म्हणालो - 'छगन भुजबळ!'

'नक्की ना? मला एका शिवसेना नेत्याने याबाबत मत विचारलं आहे म्हणून मी तुम्हाला हे विचारतो आहे.' निळूभाऊंनी सांगून टाकलं.

मी म्हणालो, 'अहो भाऊ, अगदी नक्की! भुजबळांशिवाय महापौर व्हायला शिवसेनेत सध्या दुसरा लायक आहे तरी कोण?'



माझ्या या सांगण्याचा निळूभाऊंवर मोठाच परिणाम झाला आणि त्यांनी 'त्या वरिष्ठ' नेत्याला भुजबळांचं नाव सांगून टाकलं!

पुढं मला कळलं की 'तो वरिष्ठ नेता' म्हणजे दस्तूरखुद्द बाळासाहेब ठाकरे हेच होते. निळूभाऊंनी सांगितल्यानुसार त्या वर्षी शिवसेनेतर्फे महापौर पदासाठीच्या निवडणुकीत भुजबळ यांना उमेदवारी दिली गेली. भुजबळ निवडून आले आणि त्यांनी महापौरपदाची कारकीर्द असंख्य कार्यक्रम करून अक्षरशः गाजवली! अर्थात ती वाजती ठेवण्यात वृत्तपत्रांचाही मोठा वाटा होता. हस्तेपरहस्ते मंदार काकडे व आमचाही त्यात वाटा होता. त्या काळी भुजबळ यांच्या माझगाव येथील घरी आणि पुढे महापौर बंगल्यात आमचं खूप येणं-जाणं होतं. अनेक रात्री आम्ही भुजबळांबरोबर जागून काढल्या होत्या. अनेक विषयांवर व त्यातही राजकारणावर चर्चा झडायच्या.

भुजबळ व आमच्यात निर्माण झालेले हे संबंध अनेकांना माहीत होते; परंतु मधल्या काळात अनेक कारणांमुळे आमचे हे संबंध कमालीचे पातळ झाले. पुढे मंदार काकडे यांचं अकाली निधन झालं. त्यानंतर भुजबळ हे राज्यव्यापी राजकारणात पार गढून गेले आणि आमच्यापैकी अनेकांना पदोन्नती मिळून आम्ही 'कचेरीबंद' झालो! त्यामुळे वारंवार भेटणं वगैरे होऊच शकत नव्हतं. परंतु हे अनेकांना एक तर माहीत नव्हतं आणि आम्ही पूर्वीप्रमाणे भेटत नाही यावर अनेकांचा विश्वासही नव्हता. त्यामुळे आमचे पूर्वीचे संबंध माहिती असलेली मंडळी 'भुजबळांचं सध्या कसं काय चाललं आहे?' असे प्रश्न आम्हाला विचारतच होते. अर्थात यात त्यांचं काही चुकत होतं असं नाही. मधल्या काळात भुजबळांच्या वागणुकीत फरक पडत गेला, ही गोष्ट खरीच होती. त्यांच्यातील कामाचा वेग कमी झाल्यासारखा वाटत होता हेसुद्धा खरे होते. त्यांच्यात पूर्वीसारखा उत्साह दिसत नाही हे तर अगदी उघडपणे दिसतच आहे. पूर्वी उत्स्फूर्तपणे हास्यविनोदात सहभागी होणारे, खळखळून हसणारे, हसवणारे भुजबळ थोडेसे मलूल झालेले आहेत असं अनेकांचं मत बनलेलं आहे.

गेल्या वर्ष-दीड वर्षात भुजबळ यांच्यात हा जो बदल झाला आहे तो कशामुळे आणि त्याचा त्यांच्या भवितव्यावर काही परिणाम होणार काय, अशी चिंता अनेक जण बोलून दाखवतात. त्यांच्या चाहत्यांत विशेषतः त्यांच्याजवळ असलेल्यांना



तर या शंकेनं घेरलेलं आहे. अनेक जण काळजीत आहेत. त्यांच्या संदर्भात आजकाल जे प्रश्न विचारले जातात ते नुसते प्रश्न नसतात तर भुजबळ नावाच्या एका युयुत्सू व लढाऊ नेतृत्वाचं पुढे काय होणार, ही काळजीही असते!

भुजबळांना अगदी जवळून ओळखणाऱ्या काही जणांचं म्हणणं असं आहे की, तेलगी प्रकरणी वृत्तपत्रांनी आणि इलेक्ट्रॉनिक मीडियानं भुजबळ यांना अगदी ठरवून टार्गेट केलं. अर्थात यामागे काही राजकीय हेतू आणि शक्तीही असल्या पाहिजेत ही अगदी उघड गोष्ट आहे. कारण त्याशिवाय भुजबळसारख्या व्यक्तीवर असा अचानक आणि जबरदस्त हल्ला होणं शक्य नाही. राजकीयदृष्ट्या भुजबळ प्रबळ होणं आणि त्यांनी मुख्यमंत्रीपदाच्या दिशेनं वाटचाल करणं हे ज्यांना ज्यांना अडचणीचं होतं असे अनेकजण या हल्ल्यामागे निश्चितच असणार.

या तेलगी प्रकरणातील हल्ल्याला भुजबळ अजिबात घाबरले नाहीत, ते या सर्व हल्ल्याला अगदी पुरून उरले असं सांगितलं जात असलं तरी या प्रकरणानं त्यांचं राजकीयदृष्ट्या कधीही भरून न येणारं असं नुकसान झालं हे मान्यच करावं लागेल. या मर्यादेपर्यंत त्यांचे राजकीय हितशत्रू यशस्वी झाले असंही म्हणता येईल. काही प्रमाणात का होईना भुजबळांचा राजकीय वारू दाबून ठेवण्यात हितशत्रूंना यश मिळालेलं आहे ही गोष्टही खरीच आहे; परंतु अशा पद्धतीनं भुजबळांना त्यांच्या राजकीय आशा-आकांक्षांपासून कायमचं दाबून ठेवता येईल का? त्यांच्या लक्ष्यापासून त्यांना कायमचं दूर ठेवता येईल का?

भुजबळ यांना जे जवळून ओळखतात असे लोक वरील दोन्ही प्रश्नांची उत्तरं नकारात्मकच दिल्याशिवाय राहणार नाही. त्यांना जवळून ओळखणाऱ्यांपैकी अनेकांचं म्हणणं आहे की, भुजबळ यांना राजकीयदृष्ट्या संपवण्याचा विडा उचलणारे त्यांचे हितशत्रू कितीही मोठे असले आणि संख्येनंही चढे असले तरी त्या कामात ते यशस्वी होतील असं नाही. किंबहुना भुजबळ यांना अशा पद्धतीनं कोंडून ठेवणं व संपविणं हे निश्चितच सोपं असं काम नाही.

आपल्या या म्हणण्याच्या पृष्ट्यर्थ हे लोक तीन-चार कारणं देत असतात.

पहिलं कारण असं की, भुजबळ यांना लोकांचा मोठा पाठिंबा आहे. किंबहुना 'लोकनेता' किंवा 'मास लीडर' असं म्हणता येईल असे ते राष्ट्रवादी काँग्रेसमधील, त्या पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्या खालोखालचे, एकमेव नेते आहेत. गृहमंत्रीपदी



असलेले आर.आर. ऊर्फ आबा पाटील हेसुद्धा 'मास लीडर' आहेत; परंतु भुजबळांबरोबर त्यांची तुलना होऊ शकत नाही इतकं भुजबळांना केवळ महाराष्ट्रव्यापीच नव्हे तर देशव्यापीसुद्धा 'अपील' आहे. केवळ महाराष्ट्राचा विचार केला तर भुजबळ ज्या समाजातून आल्याचं मानलं जातं तो माळी समाज नऊ कोटींच्या महाराष्ट्रात, तीन ते साडेतीन कोटींच्या वर आहे! महात्मा फुले यांचं स्मारक, समता परिषदेची स्थापना इत्यादी संदर्भात भुजबळ यांनी जे काही काम केलं आहे त्यामुळे आपल्या समाजाला एक युयुत्सू आणि तरीही विधायक प्रवृत्तीचा नेता लाभल्याची भावना या समाजातील बहुसंख्य लोकांत निर्माण झालेली आहे ही गोष्ट नाकारता येणार नाही. वेळ आल्यास या शक्तीचा भुजबळ उपयोग करू शकतात.

दुसरे कारण म्हणजे ओबीसी आरक्षण मागणीच्या निमित्तानं भुजबळ यांनी दिल्ली, हरियाणा, उत्तर प्रदेश, बिहार, आंध्र, राजस्थान वगैरे राज्यांत जी धडक मारली त्यातून त्यांची एक आश्वासक अशी प्रतिमा निर्माण झालेली आहे. भुजबळांनी मनात आणलं तर ते या चळवळीला आणखी व्यापक आणि घट्ट असं स्वरूप देऊ शकतात. ती चळवळ अधिक मजबूतही करू शकतात. कारण वेगवेगळ्या जाती-धर्मांतील आर्थिकदृष्ट्या मागासलेले असंख्य लोक या चळवळीकडे आशेनं आकृष्ट झालेले आहेत. या चळवळीत केवळ राष्ट्रवादी काँग्रेसचेच लोक नाहीत तर समाजवादी, समतावादी, अगदी भारतीय जनता पक्षाचं काम करणारे कार्यकर्तेही आहेत. अर्थात ही चळवळ बांधणं आणि तिचा शक्ती म्हणून उपयोग करणं हे भुजबळांसमोरील मोठं आव्हान आहे ही गोष्ट खरीच आहे. परंतु या शक्तीचाही उपयोग ते करू शकतात.

मुंबईत मराठी माणसाचा ठसा उमटवला पाहिजे असं तोंडानं सगळेच म्हणत असतात; परंतु ही गोष्ट कर्तृत्वाच्या माध्यमातून सिद्ध करणं अनेकांना जमलेलं नाही. काहींची तर तशी क्षमता आणि कुवतही नाही. ज्यांची क्षमता व कुवत होती त्यांना या दृष्टीनं काही करणं जमलेलं नाही. असंख्यांना तशी मनापासून इच्छाही होत नाही. गेल्या चाळीस-पन्नास वर्षांच्या काळाचा विचार केला तर या दृष्टीनं मुंबईत काम केलेले छगन भुजबळ हे एकमेव मराठी गृहस्थ आहेत. या दृष्टीनं त्यांनी राष्ट्रभाषा हिंदीच्या प्रचारासाठी आणि प्रसारासाठी घेतलेले परिश्रम खरोखरच

स्तुत्य आहेत. या कामातूनच आपण एखादी शैक्षणिक संस्था काढावी आणि ती राष्ट्रीय पातळीवर नावारूपाला आणावी अशी त्यांना इच्छा झाली आणि त्यांनी ती पूर्ण करून दाखवली. बांद्रा रेक्लमेशनमधील एक फ्लॅट महापालिकेकडून विकत घेऊन त्यांनी 'मुंबई एज्युकेशन ट्रस्ट'ची स्थापना केली आणि त्याद्वारे अनेक अत्याधुनिक अभ्यासक्रमांचे डिग्री आणि डिप्लोमाचे कोर्सेस सुरू केले आहेत. ही संस्था केवळ मुंबई-महाराष्ट्रातच नव्हे तर देशपातळीवर नावारूपाला आली आहे. या संस्थेतील अनेक विद्यार्थ्यांना परदेशांतही नोकऱ्या मिळाल्या आहेत. याच धरतीवर भुजबळ नाशिकमध्ये 'भुजबळ नॉलेज सिटी' उभारत असून तिथंही असंख्य आधुनिक अभ्यासक्रमांची व्यवस्था ते करीत आहेत. भुजबळांचं हे काम अद्वितीय असंच आहे. परंतु स्वतःच्या राजकीय कारकीर्दीची सुरुवात भुजबळांनी शिवसेनेपासून केली हे माहीत असलेल्यांनाही सुखद धक्का बसावा असं हे काम आहे. या कामाचा त्यांना राजकीयदृष्ट्या काही फायदा होईल असं वाटत नसलं तरी काम मोठं आहे हे नाकारून चालणार नाही. आपला नेता केवळ भाषणं ठोकत नाही तर शिक्षणासारख्या महत्त्वपूर्ण क्षेत्रात पाय रोवून खंबीरपणे उभा आहे अशा प्रकारचं चित्र ओबीसी कार्यकर्त्यांत आणि त्या समाजातील सर्वसामान्य लोकांत निर्माण झालेलं आहे ही गोष्ट महत्त्वाची आहे. भुजबळांची ही एक प्रकारची अदृश्य असली तरी ताकदच आहे.



भुजबळांना आतापर्यंत जेथे जेथे दाबून ठेवण्याचा प्रयत्न झाला तेथे तेथे ते उफाळून वर आले आणि यशस्वी झाले असा इतिहास आहे. शिवसेनेतील काही वर्षांनंतरचं त्यांचं वास्तव्य हे अशाच प्रकारचं दाबून ठेवणारं असंच होतं. ओबीसी रिझर्वेशनच्या प्रश्नावर तर शिवसेनाप्रमुखांशी त्यांचे खटकेच उडाले होते. त्यामुळे वेळ येताच दहशतीची वा जिवाची पर्वा न करता भुजबळांनी शिवसेना सोडली आणि स्वतःची सुटका करून घेतली. शिवसेनेतून त्यापूर्वी व त्यानंतर जे जे बाहेर पडले त्यांपैकी असंख्यांची नामोनिशाणी राहिली नाही; परंतु भुजबळ आणि नारायण राणे हे त्याला अपवाद ठरले.

या सर्व पार्श्वभूमीवर आताही भुजबळांचा कोंडमारा होत असेल तर ते तो तसाच सहन करत राहतील असं म्हणता येणार नाही. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये आज निरनिराळ्या पातळ्यांवर आणि निरनिराळ्या नेत्यांत असंख्य भांडणं आहेत.



तालुका, जिल्हा, राज्य अशा सर्वच पातळ्यांवर कुरबुरी व भांडणं आहेत. अर्थात सत्तेच्या जवळ व सत्तेत असणाऱ्या पक्षात भांडणं ही असणारच. शिवाय आता विधानसभा निवडणुकीचे वेधही लागलेले आहेत. असंख्य कार्यकर्त्यांना आमदार व्हायचं आहे, त्यातील अनेकांना राज्यमंत्री, मंत्री व्हायचं आहे. काहींना म्हणजे किमान ४/५ जणांना मुख्यमंत्री होण्याची स्वप्नं पडायला लागली आहेत. आणि ते एकमेकांचा पतंग कापण्याच्या उद्योगाला लागले आहेत. अशा वेळी भांडणं होणार नाहीत तर दुसरं काय होणार ? या भांडणांना आवर घालण्यासाठी पक्षाध्यक्ष शरद पवार यांनी सामुदायिक नेतृत्वाची कल्पना मांडली व एक समितीही नेमली आहे. परंतु नेते व कार्यकर्ते यांच्या आशा-आकांक्षांना मोठीच सूज आली आहे. त्यामुळे सध्या प्रत्येक जण दुसऱ्या, तिसऱ्याची कोंडी करतो आहे. अमुक एकानं पक्षात राहू नये यासाठी नानाविध प्रयत्न सुरू आहेत. काहीजण अशा कोंडीतच राहत आहेत. कारण त्यांना पर्याय उपलब्ध नाही; परंतु ज्यांना पर्याय उपलब्ध आहे असे कोणी दबून राहणार नाहीत. ते बाहेर पडणार. कोंडून ठेवलेल्या वाफेसारखे. झाकण उडवून! अशा वातावरणात असलेल्या काहींना काँग्रेसचे वेध लागल्याची चर्चा आहे. यात अर्थमंत्री जयंतराव पाटील, पर्यटनमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील आणि बांधकाममंत्री छगन भुजबळ यांची नावं घेतली जात आहेत. यात कितपत तथ्य आहे हे सांगता येणार नाही; परंतु धुडकावण्यासारखीसुद्धा ही बाब नाही. त्यामुळे असं झालंच तर काय होईल, याबद्दल आपण थोडेसं विश्लेषण करू शकतो. असं घडलंच म्हणजे वरील तिघेही काँग्रेस पक्षात गेलेच तर विजयसिंह मोहिते-पाटील आणि जयंतराव पाटील यांच्या जाण्यानं राष्ट्रवादीचं जेवढं नुकसान होईल त्याच्यापेक्षा कितीतरी पटीनं अधिक नुकसान छगन भुजबळ यांच्या बाहेर पडण्यानं होईल हे निश्चित.

❐●❑

# एक रोखठोक, कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्व




## वसंत डावखरे

उपसभापती, विधान परिषद


**आ**पल्या कर्तृत्वाने स्वतःचा भाग्यलेख लिहिणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते व मंत्री श्री. छगन भुजबळ यांचा उल्लेख करावा लागेल. कर्तृत्ववान माणसांच्या भरारीस सीमा नसते हे त्यांनी आपल्या जीवनपटावरून सिद्ध केले आहे.

भुजबळ यांचा  जीवन प्रवास हा प्रचंड धडपडीचा, चढ-उतारांचा तसेच कष्टाचा झालेला आहे. चक्रव्यूह मग तो दारिद्र्याचा असो वा मानवनिर्मित संकटांचा. त्यात गुरफटून हताश न होता तो चक्रव्यूह भेदून विजय संपादन करून आपले ध्येय साधणाऱ्या मोजक्या कर्तृत्ववान व्यक्तींमध्ये छगन भुजबळ यांचा अगत्याने समावेश होतो.

शिकणे, पदवी/पदविका प्राप्त करणे हे गरिबीने ग्रासलेल्या तरुणांना केवढे जिकिरीचे असते याची मला जाणीव आहे. मी माझ्याशी त्यांची तुलना कधीच करणार नाही. कारण राजकीय, सामाजिक तसेच शैक्षणिक क्षेत्रातील त्यांचे कार्य माझ्यापेक्षा कांकणभर निश्चितच उजवे व श्रेष्ठ आहे. परंतु माझा ज्याप्रमाणे पुणे येथे जन्म झालेला असला तरी माझी कर्मभूमी ठाणे शहर आहे, त्याचप्रमाणे नाशिक हे त्यांचे जन्मस्थळ असले तरी मुंबईतच त्यांचे अवघे आयुष्य घडले आहे. माझ्या कौटुंबिक पार्श्वभूमीप्रमाणेच त्यांनाही गरिबीचे चटके सहन करावे लागले आहेत. आम्हा दोघांच्या मातोश्रींनी भाजीविक्री करून कुटुंबाचे पालनपोषण केलेले आहे. माझी राजकीय कारकीर्द ठाणे महानगरपालिकेमधील नगरसेवक

*'सध्याच्या झोपड्या नियमित करा ; परंतु त्यानंतर मात्र झोपड्या बांधणाऱ्यांना मतांचा अधिकारच ठेवायचा नाही. तरच नवीन झोपड्या उभ्या राहणार नाहीत व राजकीय पक्षही अनधिकृत झोपड्या व बांधकामे यासाठी धावाधाव करणार नाहीत.'*



पदाने सुरू झाली तर छगन भुजबळ यांची राजकीय कारकीर्द मुंबई महानगरपालिकेमधील नगरसेवक पदाने सुरू झाली. महापालिकेतील सर्वोच्च महापौर पद आम्ही दोघांनी भूषविले व नवनवीन योजनांचा शुभारंभ केला.

दोनदा महापौरपदाचा लाभ होऊनदेखील मुंबई शहरासाठी व नागरिकांसाठी त्यांना मनासारखे कार्य करता आले नाही याचे कारण कार्यकारी अधिकार या पदावरील व्यक्तीकडे नसतात. मात्र ही उणीव त्यांनी राज्यातील मंत्री पदावर तसेच उपमुख्यमंत्री पदावर राहून पूर्णपणाने भरून काढली व राज्यभरातील सर्वसामान्य तसेच शोषित जनतेला आधार दिला. कायद्यापुढे सारे समान हे सूत्र राबवून त्यांनी राज्याची व कायद्याची प्रतिष्ठा उंचावली. पोलीस दलाचे मनोधैर्य खचू न देता त्यांच्या अनेक वर्षांच्या आर्थिक व न्याय्य मागण्या सहानुभूतिपूर्वक मंजूर केल्या. गुंडांना दहशत बसवली व राज्य भयमुक्त केले.

एक सामाजिक कार्यकर्ता, आमदार, मंत्री, उपमुख्यमंत्री म्हणून काम करताना मी त्यांना जवळून पाहत आहे. त्यांची राजकीय, सामाजिक जाण परिपक्व आहे. मुख्य म्हणजे ते स्पष्टवक्ते आहेत. मुंबई शहराचा नियोजनबद्ध विकास करावयाचा असेल तर 'सध्याच्या झोपड्या नियमित करावयाच्या परंतु त्यानंतर मात्र झोपड्या बांधणाऱ्यांना मतांचा अधिकारच ठेवायचा नाही. अशा प्रकारचा कायदा झाला तरच नवीन झोपड्या उभ्या राहणार नाहीत व राजकीय पक्षही अनधिकृत झोपड्या व बांधकामे यासाठी धावाधाव करणार नाहीत हाच एक या शहर विकासाचा मार्ग आहे' असे ते स्पष्ट सांगतात.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष व केंद्रीय कृषीमंत्री मा. श्री. शरदचंद्रजी पवार यांच्यावर त्यांची विलक्षण निष्ठा आहे. राज्य मंत्रिमंडळात राहून पक्षवृद्धीसाठी देखील ते अविचलपणाने कार्यरत असतात. छगन भुजबळ यांच्या हातून पक्षाची व राज्याची अशीच सेवा घडावी. मला खात्री आहे की, इथून पुढच्या काळात त्यांच्या हातून पक्ष व सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात यापेक्षाही अधिक मोठी कामगिरी झाल्याशिवाय राहणार नाही. ते चिरतरुणच वाटतात आणि चिरतरुणच आहेत. त्यांचा उत्साहही चिरतरुण आहे. अशा व्यक्तीच नेहमी नवे यश संपादन करीत राहतात. छगन भुजबळ यांच्या पुढील यशस्वी वाटचालीसाठी माझे मन:पूर्वक शुभचिंतन.

❑●❑

# मला भावलेले भुजबळ


## दिलीप वळसे पाटील
मंत्री उर्जा, उच्च तंत्रशिक्षण




राजकारणात अनेक व्यक्तिमत्त्वे उदयाला येतात आणि पाहता पाहता विस्मरणातही जातात. काही व्यक्ती मात्र राजकारणात अथवा ज्या क्षेत्रात जातात त्या क्षेत्रात आपला एक ठसा उमटवून जातात. राज्य विधिमंडळात सदस्य म्हणून प्रवेश करणाच्या आधी मी सभागृहातील कामकाजाचा एक अभ्यासक होतो. त्या काळात विधानसभेत शिवसेनेचे एकच आमदार होते ते म्हणजे छगन भुजबळ. विधिमंडळाच्या एका हिवाळी अधिवेशनाच्या काळात छगन भुजबळ यांनी एकट्याने सारे विधिमंडळ आपल्याभोवती सतत कसे फिरवत ठेवलेले होते ते मी जवळून पाहिलेले आहे. शिवसेनेत असताना त्यांनी शिवसेना एवढी गांभीर्याने घेतलेली होती की कदाचित त्यांच्या वरिष्ठांनीही ती एवढ्या गांभीर्याने घेतलेली नसावी. त्यांच्या बरोबरीच्या नेत्यांनी तर निश्चितच घेतलेली नव्हती. शिवसेनेचा एकमात्र आमदार असलेल्या १९९५ च्या विधानसभेनंतरच्या म्हणजे त्याच्या पुढल्याच निवडणुकीत ४२ पेक्षा अधिक आमदार निवडून आणण्याची किमया ही केवळ छगन भुजबळ यांची होती, असे म्हटले तर ते आता वावगे ठरणार नाही.

राज्याच्या राजकीय सारिपटलावर एक प्रचंड वादळ निर्माण करण्याची क्षमता असलेल्या या राजकीय नेत्याला 'शरद पवार' यांच्या सामाजिक व राजकीय दृष्टेपणाची भुरळ न पडती तरच नवल ठरले असते. मंडल प्रश्नावरून शिवसेनेच्या बाबतीत भ्रमनिरास झालेले भुजबळ या काळातच अस्वस्थ होते. १९९१च्या

*अशा वेळीच नेमकी विधान परिषदेची निवडणूक आली आणि छगन भुजबळ यांना विधान परिषदेवर निवडून देण्याची व्यूहरचना आमच्या नेत्यांनी केली. ती किती यशस्वी ठरली, हे नंतर काळाने सिद्ध केले.*



निवडणुकीत प्रचंड मेहनत केलेल्या या नेत्याला फुले, शाहू, आंबेडकरांच्या विचारांशी प्रतारणा करता आली नाही आणि करताही आली नसती. त्यांच्यासाठी त्यांच्या संघटनेतून जी शेलकी विशेषणे वापरण्यात आली, त्याचा परिणाम अपरिहार्य होता आणि त्यांनी शिवसेनेला कायमचा 'जय महाराष्ट्र' केला. शिवसेनेला सोडचिट्ठी देण्याचे वादळ सुरू असतानाच त्यांनी महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात महसूलमंत्री म्हणून प्रवेश केला.

महाराष्ट्राच्या राजकारणातील त्यांचा काँग्रेसप्रवेश ही एक वादळी घटना होती. राजकारणातील अनेक समीकरणे त्यामुळे बदलणार होती; परंतु ६ डिसेंबर १९९२ रोजी मुंबई शहरात जातीय दंगलीने जो हाहाकार माजविला आणि त्यानंतर १२ मार्च १९९३ रोजी झालेल्या बॉम्बस्फोटांमुळे सामाजिक, राजकीय व आर्थिक क्षेत्रात नवी उलथापालथ झाली आणि सारी अपेक्षित राजकीय गणिते पुन्हा बदलली.

छगन भुजबळ त्यानंतरच्या निवडणुकीत पराभूत झालेच; परंतु काँग्रेसही सर्व बाजूंनी पराभूत झाली. शिवसेना-भाजपा युतीच्या हाती सत्ता सोपविण्याचा निर्णय लोकांनी-मतदारांनी घेतला आणि आमच्या नेत्यांनी तो शिरसावंद्य मानला. काँग्रेसला सत्तेविना राहण्याची तसेच अनेक वर्षे सत्तेत राहिलेल्या कार्यकर्त्यांना लढण्याची सवय राहिलेली नव्हती. हितसंबंधांची वीण घट्ट होती. त्याचाही परिणाम कळत नकळत होतच होता. पराभवाने सारी काँग्रेसच जणू गोंधळून गेलेली होती. सत्तेच्या या नव्या समीकरणाला विरोध कुठून व कसा करावा या संभ्रमात सारे होते. अशा वेळीच नेमकी विधान परिषदेची निवडणूक आली आणि छगन भुजबळ यांना विधान परिषदेवर निवडून देण्याची व्यूहरचना आमच्या नेत्यांनी केली. ती किती यशस्वी ठरली, हे नंतर काळाने सिद्ध केले. त्या काळात शिवसेना या पक्षाच्या अथवा शिवसेनेच्या नेत्यांच्या विरोधात बाहेर जाहीर कार्यक्रमात कोणाचीही 'ब्र' काढण्याची प्राज्ञा नव्हती, अशी परिस्थिती निर्माण करण्यात शिवसेनेने यश मिळविलेले होते. अशा वेळी विधान परिषदेतील मिळणाऱ्या प्रत्येक संधीचा पुरेपूर लाभ स्वतः उठवून आणि आपल्या सहकाऱ्यांना तसे करण्यास उद्युक्त करून विरोधी पक्षनेतेपदाचा पुरेपूर वापर छगन भुजबळ यांनी प्रभावीपणे केला. त्या काळातील त्यांची महाराष्ट्राच्या अंदाजपत्रकावरील अभ्यासपूर्ण भाषणे



आताही अभ्यासनीय आहेत. शिवसेना या पक्षाचा अथवा त्या पक्षाच्या नेत्यांचा उपमर्द न करता, वैयक्तिक टीका करण्याचा मोह टाळून राज्यात शिवसेना-भाजपाच्या विरोधी वातावरण निर्माण करण्याचा त्यांचा पवित्रा तरीही एवढा आक्रमक होता की, नंतर काँग्रेस पक्षात फूट पडूनही शिवसेना-भाजपा युतीला १९९९ सालच्या निवडणुकीत अपेक्षित यश मिळू शकले नाही.

स्वभावाने प्रेमळ असलेले भुजबळ अन्यायाने चवताळून उठतात. आपल्या कार्यकर्त्यांना सातत्यपूर्ण पाठबळ देतात. राजकारणाच्या बाहेरही त्यांना अनेक मित्र आहेत. सिनेमा, नाट्य, संगीत आणि चित्रकला या क्षेत्रांत प्रामाणिक रस असणारे भुजबळ एक चांगले वाचक आहेत.

बहुश्रुत असलेल्या भुजबळ यांनी विश्वभ्रमण केलेले आहे. देशोदेशीच्या सुंदर दुर्मिळ वस्तूंचा संग्रह करण्याचा त्यांचा छंद स्तिमित करणारा आहे. त्यांना सौंदर्याची व उत्तम स्थापत्याची आवड आहे. ती ते लोकांना सांगत नाहीत, तर ती त्यांनी उभ्या केलेल्या संस्थांच्या, सामाजिक कार्याच्या माध्यमातून लोकांच्या समोर येते. मुंबई शहरात त्यांनी उभी केलेली मुंबई एज्युकेशनल ट्रस्टसारखी संस्था राज्याला अभिमानास्पद वाटणारी आणि व्यवस्थापन क्षेत्रातील शिक्षणाची एक उत्तम संधी उपलब्ध करून देणारी नामवंत संस्था आहे.

सर्वसामान्य माणसाबद्दलची त्यांची आस्था आमच्यासारख्या त्यांच्या सहकाऱ्यांना खूप काही शिकवून जाणारी असते.

❏●❏



# इतिहास घडवण्याची ताकद असलेला नेता


सुप्रिया सुळे

खासदार


*राजकारण तर अनेक लोक करतात, पण समाजकारण करणारे आणि त्यात यशस्वी होणारे जे थोडेथोडके आहेत त्यात शरद पवारांप्रमाणेच भुजबळांचे नावही अग्रस्थानी घ्यावे लागेल.*

महाराष्ट्राच्या इतिहासात अनेक महान नेते झाले. त्यात शहरी होते तसेच ग्रामीण होते. गरीब होते, श्रीमंत होते. सुशिक्षित होते तसे अशिक्षित होते. काही नशिबाने मोठे झालेले तर काही कर्तृत्वाने. नाशिकमध्ये जन्मलेले नामदार छगन भुजबळ मात्र कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसतानाही राज्याच्या राजकीय क्षितिजावर मागील तीन दशकांहून जास्त काळ तेजाने चमकत आहेत. त्यांचे वैशिष्ट्य म्हणजे एका मध्यमवर्गीय कुटुंबातून बहुजन समाजातून येऊन त्यांनी समाजकारणात स्वतःला झोकून दिले. वयाच्या २०व्या वर्षी भुजबळांनी कॉलेजकुमारांसारखी मखमली स्वप्ने न पाहता अन्यायाविरुद्धची उद्रेकी भाषा मुखोद्‌गत केली. त्या काळात शिवसेनेचे विचार त्यांना जवळचे वाटले. अनेक वर्षे तेथे त्यांनी काढली. या काळात त्यांनी गावागावांत जाऊन संघटना बांधली. तरुणांना एकत्र केले. रात्रंदिवस दौरे केले. ग्रामीण भागातील तरुणांनाही हा साहसवादी तरुण आवडला. त्यांचे किंचित जहाल विचार आणि धाडसी विधाने राज्यभरातील युवावर्गास प्रभावित करून गेली. शिवसेनेतून त्यांनी नगरसेवक ते मुंबईसारख्या शहराचा महापौर अशी पदे भूषवली. पुढे शिवसेनाप्रमुखांशी त्यांचे मतभेद झाल्यावर शिवसेना सोडण्याची भुजबळांची कृती एक मोठी बातमी ठरली. शिवसेनेत आणि भुजबळांत वैचारिक मतभेद झाले तरी शिवसेनाप्रमुखांबद्दल आजही खाजगीत भुजबळ आदरच व्यक्त करतात. भुजबळांचे विचार शरद



पवारांशी लगेच जुळले. दोघांचाही जनसंपर्क दांडगा, दोघांनाही जनता जनार्दनाचा पाठिंबा आणि प्रचंड कष्टाची सवय. साहजिकच पुढे राष्ट्रवादीची स्थापना झाल्यावर भुजबळ पवारांसोबत राष्ट्रवादीत सामील झाले. राज्याचे उपमुख्यमंत्री म्हणून पवारसाहेबांनी भुजबळांसारख्या लढाऊ व्यक्तीची निवड केली. यामागे भुजबळांचा राज्यावर असलेला प्रभाव, राज्याच्या कानाकोपऱ्यातील खेड्यांत भुजबळांचा असलेला संपर्क, निर्भय कृती ही सारी पार्श्वभूमी होती. भुजबळांनी इतरही मंत्रीपदे सांभाळली होती. प्रत्येक पदावरून त्यांनी आपल्या कामाचा ठसा उमटवला. आपापल्या परिसरात व क्षेत्रात नाव कमावलेले आणि प्रभावी असलेले अनेक नेते राष्ट्रवादीसह सर्वच पक्षांत आहेत, पण भुजबळांनी समता परिषदेच्या माध्यमातून सारा महाराष्ट्र जोडला. बहुजन समाजाला एक केले. आंबेडकर आणि शाहू महाराजांच्या बरोबरीने जोतिबा फुलेंचे नाव घेतले जाऊ लागले. याचे श्रेय निश्चितपणे भुजबळांना जाते. जोतिबा फुले व सावित्रीबाई फुलेंच्या महान कार्याची ओळख महाराष्ट्राला अधिक चांगल्या प्रकारे होण्यात समता परिषदेचा मोठा वाटा आहे. राजकारण तर अनेक लोक करतात, पण समाजकारण करणारे आणि त्यात यशस्वी होणारे जे थोडेथोडके आहेत त्यात शरद पवारांप्रमाणेच भुजबळांचे नावही अग्रस्थानी घ्यावे लागेल. मुंबई, नागपूरचा समता परिषदेचा भव्य मेळावा असो किंवा एखाद्या छोट्या गावी वाचनालयाचे उद्घाटन, भुजबळांना सर्वसामान्य जनतेने प्रचंड प्रतिसाद दिला आहे. भुजबळांबद्दल एक जबरदस्त आकर्षण सर्व समाजात दिसून येते.

भुजबळांनी केवळ महाराष्ट्रच गाजवला असे नाही तर राजस्थान, आंध्र प्रदेश, बिहार येथे प्रचंड मोठे मेळावे यशस्वी करून दाखवले. बिहार, आंध्र येथील अलोट गर्दीचा प्रतिसाद पाहून तर सारे चक्रावून गेले. प्रत्येक मराठी माणसाला माहिती आहे की मराठी माणसाने अटकेपार झेंडे लावले आहेत. दिल्लीचे स्वप्न महाराष्ट्राला कायमच पडत आलेले आहे. भुजबळांनी दिल्लीतही दिग्विजय साजरा केला. दिल्लीतील भुजबळांचा मेळावा बघून त्यांचे समर्थकच काय पण विरोधकही सुखावले असतील. कारण दिल्लीत एवढ्या मोठ्या प्रमाणावर शक्तिप्रदर्शन करणे महाराष्ट्राला फार क्वचितच शक्य झालेले आहे. या यशामागे जसे त्यांचे कष्ट आहेत तसेच त्यांचा स्वभावही आहे. दूरदृष्टी आहे. अनेक गोरगरिबांच्या आयुष्यात



त्यांनी आनंदाचे मळे फुलवले. अंधाऱ्या रात्री रानावनातील आदिवासींमध्ये जाऊन त्यांच्या सोबत राहून त्यांचे दु:ख भुजबळांनी समजावून घेतल्याच्या आठवणी त्यांचे जवळचे लोक सांगतात. समता परिषदेतून जसा त्यांनी संतांचा 'इतिहास' जागता केला तसेच त्यांनी महाराष्ट्राच्या 'भविष्यावरही' लक्ष केंद्रित केले. येवला, नाशिक शहराचा कायापालट, मुंबई-नाशिक रस्त्याचे चौपदरीकरण, अनेक दुर्गम गावे एकमेकांशी रस्त्याद्वारे जोडणी, नॉलेज सिटी, आयटी पार्क, मागासवर्गीयांना नोकऱ्या इत्यादी अनेक उपक्रम भुजबळांनी राबवले. देशभरात स्वत:ची ओळख निर्माण केली. जिवाला जीव देणारे सहकारी घडवले. दीनदुबळ्यांचा आवाज त्यांनी बुलंद केला.

भुजबळांना हे यश सहजासहजी मात्र मिळाले नाही. कधी परिस्थितीने तर कधी त्यांच्या पार्श्वभूमीने त्यांना यशापासून मागे रेटले. एकदा तर भुजबळांवर जीवघेणा हल्ला झाला. त्यांचा जणू पुनर्जन्मच झाला. एखाद्याने जिवाच्या भीतीने राजकारणच सोडून दिले असते, पण भुजबळ निर्भयपणे पाय रोवून उभे राहिले. पहिल्यापेक्षा जास्त आक्रमक झाले. भुजबळांनी आयुष्यात हार कधीच मानली नाही. त्यांच्यात एका समर्थ नेत्याचे गुण आहेत. नेतृत्व करण्याची धमक आहे. इतिहास घडवण्याची ताकद आहे, हे अवघ्या देशानेच मान्य केले. शरद पवारांसारखेच भुजबळांवरही राजकीय प्रहार झाले. ज्यांच्याबरोबर एका ताटात जेवले त्यांच्याशीच दोन हात करण्याची वेळ त्यांच्यावर आली. अनेक दु:खाचे प्रसंग भुजबळांनी पचवले, पण कधी चेहऱ्यावर मात्र दिसू दिले नाहीत. हताश होणे किंवा दु:ख उगाळत बसणे हा त्यांचा स्वभावच नाही. म्हणूनच भुजबळांचे समर्थक म्हणतात, नेता मिळावा तर भुजबळांसारखा आणि विरोधकही म्हणतात, प्रतिस्पर्धी मिळावा तर दमदार भुजबळांसारखा.

❏●❏

# सामाजिक समतेचा योद्धा

## आमदार सचिन अहिर
अध्यक्ष, मुंबई विभागीय राष्ट्रवादी काँग्रेस



महाराष्ट्र राज्याचे विद्यमान सार्वजनिक बांधकाम मंत्री नामदार श्री. छगनरावजी भुजबळ येत्या १५ ऑक्टोबर २००७ रोजी षष्ट्यब्दीत प्रवेश करीत आहेत. त्यानिमित्ताने भुजबळसाहेबांचा जीवनपट नजरेसमोर तरळत राहतो. या व्यक्तीच्या रक्तात जन्मजात बंडखोरी आहे. अन्यायाविषयी पराकोटीच्या तुच्छतेतूनच ही बंडखोरी निर्माण झाली आहे. हे बंड मूलतः सामाजिक आहे. राजनीती हे त्या बंडाचे अमोघ अस्त्र आहे. सामाजिक बंड यशस्वी करण्यासाठी भुजबळसाहेब एखाद्या निष्णात योद्ध्याप्रमाणे राजनीतीचे शस्त्र कुशलतेने वापरीत आहेत.

हे बंड आहे सामाजिक विषमतेविरुद्ध, सामाजिक समानतेसाठी. भारतवर्ष नावाची प्राचीन भूमी सामाजिक विषमतेच्या शापाने युगानुयुगे होरपळून निघाली आहे. मूठभर उच्चवर्णीयांनी प्रचंड बहुसंख्येने असलेल्या बहुजन समाजाला शतकानुशतके सामाजिक गुलामगिरीत लोटले आहे. त्यांच्या श्रमावर मूठभर परोपजीवी कुबेराचे ऐश्वर्य उपभोगीत आहेत. त्यांना अर्धपोटी, अर्धनग्न ठेवून हे सामाजिक लुटारू समाजाच्या साऱ्या धनसंपत्तीवर डल्ला मारीत आहेत. युगानुयुगे समाजाचा हा शोषणाधिष्ठित व्यवहार असाच निर्वेधपणे चालू राहिला आहे. आज भारताला स्वातंत्र्य प्राप्त होऊन सहा दशके उलटली. सामाजिक विषमता नष्ट करण्याच्या दृष्टीने काही प्रमाणात वैधानिक पावले उचलण्यात आली, तरी

*त्यातील कडूगोड अनुभवांतूनच त्यांचा समाजसेवकाचा पिंड पोसला गेला. ही प्रत्यक्ष अनुभूती आणि शाहू-फुले-आंबेडकरी विचारांचा प्रभाव यांच्या संगमातून सामाजिक बंडखोर छगनरावजी भुजबळ जन्मास आले.*



सामाजिक विषमतेचा हा जुनाट रोग काही नष्ट होत नाही. नामदार छगनरावजी भुजबळांनी याच सामाजिक विषमतेविरुद्ध बंडाचे निशाण उभारले आहे.

यापूर्वी सामाजिक विषमतेविरुद्ध बंडे झाली नाहीत, असे नाही. संतमहंतांनी, समाजधुरिणांनी सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी आवाज उठविला. त्यांच्या बंडांनी तात्पुरती जनजागृती झाली, पण कालौघाबरोबर ती शमली. पण बंडे थंडावली तरी समतेच्या विचारधारेतील अंगार मात्र शमला नाही. छगनरावजी भुजबळांसारख्या बाहुबली नेत्याने त्या विचारधारेची बांधीलकी मनोमन स्वीकारून त्यासाठी सर्वस्व झोकून दिले. आपल्या अगणित ध्येयनिष्ठ शिलेदारांना सोबत घेऊन त्यांनी महात्मा फुले सामाजिक समता परिषद नामक संघटना स्थापन केली. आज या संघटनेची व्याप्ती केवळ महाराष्ट्रापुरतीच सीमित नाही. तिचा पसारा महाराष्ट्राबाहेर दिल्ली, आंध्र, बिहार यांसारख्या राज्यांतही पसरला आहे.

महाराष्ट्राची भूमी ही ज्ञानोबा-तुकोबाची भूमी, शिवरायांची भूमी म्हणून ओळखली जाते, तशीच ती शाहू-फुले-आंबेडकरांची भूमी म्हणूनही ख्यातकीर्त आहे. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धापासून ते विसाव्या शतकाच्या प्रारंभकालापर्यंत या त्रिमूर्तीने सामाजिक समतेचे जे विचारधन महाराष्ट्राला नव्हे भारतवर्षालाच दिले आणि ते प्रत्यक्ष कृतीत आणण्यासाठी देह झिजविला, त्याने युगानुयुगे निद्रितावस्थेत असलेला बहुजन समाज जागृत झाला. त्यांच्या विचारांचे सामर्थ्य एवढे प्रचंड आहे की, त्याने सामाजिक प्रबोधनाची प्रचंड चळवळ विशेषत: महाराष्ट्रात सुरू केली. आज या चळवळीची धुरा नामदार छगनरावजी भुजबळ यांच्या समर्थ खांद्यावर आहे. ही चळवळ एक पवित्र जीवितकार्य म्हणून ते तन-मन-धन अर्पून चालवीत आहेत. शाहू-फुले-आंबेडकरी विचारांचे निष्ठावंत अनुयायी म्हणूनच त्यांनी हा वसा घेतलेला आहे.

नामदार छगनरावजी भुजबळ येत्या महिन्यात आपल्या जीवनाच्या साठाव्या वर्षात पदार्पण करीत असले तरी त्यांच्या सुजाण जीवनाची चाळिसावर वर्षे समाजकारणात, राजकारणात व्यतीत झाली आहेत. त्यातील कडूगोड अनुभवांतूनच त्यांचा समाजसेवकाचा पिंड पोसला गेला. ही प्रत्यक्ष अनुभूती आणि शाहू-फुले-आंबेडकरी विचारांचा प्रभाव यांच्या संगमातून सामाजिक बंडखोर छगनरावजी भुजबळ जन्मास आले. आज बहुजन समाजाचा झुंजार, निष्ठावंत



नेता हे आदरणीय पद त्यांना प्राप्त झाले, ते त्यांच्या अलौकिक कर्तृत्वाने. माझ्यासारख्या बहुजन समाजातील तरुणांना अतीव आकर्षण वाटते ते सामाजिक समतेच्या लढ्यातील झुंजार योद्धा छगनरावजी भुजबळ यांचे.

नामदार छगनरावजी भुजबळ यांचे व्यक्तिमत्त्व अष्टपैलू आहे. कोणा एका विशिष्ट क्षेत्रापुरते ते सीमित झालेले नाही. ऐन उमेदीत शिवप्रभूंच्या प्रेमाने, महाराष्ट्रधर्माच्या ओढीने ते शिवसेनेसारख्या संघटनेत गेले. तत्पूर्वी ते राष्ट्रीय काँग्रेसमध्ये क्रियाशील होते. शिवसेनेच्या स्थापनाकाळात शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या खांद्याला खांदा लावून जे कार्यकर्ते उभे राहिले, त्यात छगनरावजी भुजबळ आपल्या कर्तृत्वाने उठून दिसत. घणाघाती वक्तृत्वाने ते मराठी माणसाच्या व महाराष्ट्राच्या व्यापक हिताची भूमिका ठासून मांडीत. शिवसेनेची मुलुखमैदान तोफ म्हणूनच ते सर्वपरिचित होते. शिवसेनेतूनच ते प्रथम मुंबई महानगरपालिकेत व नंतर महाराष्ट्र विधान परिषदेत निवडून गेलेत. त्यांची मुंबई महापालिकेतील कारकीर्द खूपच गाजली. १९८५ व १९९० अशी दोन वर्षे त्यांनी मुंबईचे महापौरपद भूषविले. महाराष्ट्र विधान परिषदेत विरोधी पक्षनेते म्हणूनही त्यांनी आपल्या वक्तृत्वाने सभागृह गाजविले. तथापि, या कर्तबगार नेत्याची १९९० च्या दरम्यान शिवसेनेत घुसमट होऊ लागली. बहुजन समाजातील युवक हा शिवसेनेचा आधार असला, तरी जेव्हा मंडल आयोगाच्या शिफारसी स्वीकारण्याचा प्रश्न आला, तेव्हा शिवसेनेचे खरे उच्चवर्णीय स्वरूप उघड झाले. शिवसेनेतील बहुजन समाजातील हजारो कार्यकर्त्यांना शिवसेनेची ती भूमिका रुचली नाही. तरीही शिवसेनेतील एकूण दहशतीमुळे कोणीही कार्यकर्ता त्याविरुद्ध ब्र काढू शकला नाही. पण छगनरावजींचे रक्त मुळातच बंडखोरीचे. त्यांनी मंडल आयोगाच्या प्रश्नावरून शिवसेनेचा त्याग केला. अर्थात त्या वेळी माथेफिरू कार्यकर्त्यांकडून त्यांचाही 'खोपकर' होण्याची भीती होतीच. पण या निधड्या छातीच्या वीराने जिवाची बाजी लावून शिवसेनेला सोडचिठ्ठी देऊन उघड पाडले. आता शिवसेनेचा 'रिमोट कंट्रोल' शिथील झाल्यामुळे कोणीही शिवसेनेतून उघडपणे बाहेर पडतो आणि दुसऱ्या पक्षात प्रवेश करतो. पण भुजबळसाहेबांनी १९९१ मध्ये जेव्हा ते धाडस केले, तेव्हा त्यांनी मृत्यूशी करारनामाच जणू लिहून ठेवला होता.



नामदार छगनरावजी भुजबळ हे ध्येयनिष्ठ चळवळींमध्ये कितीही गुंतले असले, तरीही त्यांच्यातील जन्मजात रसिकता सदैव सतेज राहिली आहे. त्यांच्या कार्यकर्तृत्वाला जे धुमारे फुटले, त्यातूनच त्यांनी 'दैवत' व 'नवराबायको' या दोन मराठी चित्रपटांची निर्मिती केली. एवढेच नव्हे, तर 'दैवत' चित्रपटात त्यांनी स्वतः एक भूमिकाही केली. त्यांना कबड्डी, खो-खो, क्रिकेट इत्यादी खेळांचे खूप आकर्षण आहे; परंतु कार्यबाहुल्यामुळे त्यांना क्रीडाक्षेत्रासाठी वेळ देणे जमत नाही.

नामदार छगनरावजी भुजबळांचे अनन्यस्वरूपाचे काम म्हणजे त्यांनी स्थापन केलेली मुंबई एज्युकेशन ट्रस्ट ही शिक्षण संस्था. मुंबईच्या वांद्रे उपनगरात या शिक्षणसंस्थेच्या महाविद्यालयाची भव्य वास्तू उभी आहे. लवकरच महासत्ता म्हणून उदयास येणाऱ्या भारताची अर्थव्यवस्था सक्षमपणे विकसित करण्यासाठी विविध क्षेत्रांतील विशारदांची आवश्यकता विचारात घेऊन भुजबळसाहेबांनी दूरदृष्टीने हे महाविद्यालय सुरू केले आहे. येथे व्यवस्थापनशास्त्र, माहिती तंत्रज्ञान, संगणक विज्ञान, अभियांत्रिकी वगैरे विषयांतील विशारद पदव्या घेऊन बाहेर पडतात. आज या महाविद्यालयाचे स्नातक जगभर विविध उद्योगसंस्थांमधून मोठमोठ्या पदांवर कार्यरत आहेत. या संस्थेच्या महाविद्यालयात भारताच्या विविध राज्यांतील विद्यार्थीच नव्हेत, तर विदेशी विद्यार्थीही शिक्षण घेत आहेत.

नामदार छगनरावजी भुजबळ यांनी आपले गुरुजन छत्रपती शाहू महाराज, महात्मा जोतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाद्वारे समाजाला सज्ञान करण्याचे जे व्रत अंगीकारले, तेच ध्येयनिष्ठेने पुढे चालविले आहे. त्यांच्या जीवनकार्यापासून आमच्यासारख्या अगणित कार्यकर्त्यांना सदैव प्रेरणा मिळत राहील, ही अपेक्षा.

❏●❏

# गुणग्राहकता ओळखणारा नेता


## दत्तात्रय म्हैसकर

बांधकाम व्यावसायिक




कुठलीही संस्था सुरू करताना, मग ती सामाजिक, शैक्षणिक अथवा व्यावसायिक संस्था असो प्रत्येक माणसाला परिश्रम हे करावेच लागतात. त्याला काही पर्याय नसतो. अशा वेळेर्ला आपल्यातील गुणवत्ता ओळखून जो माणुस निरपेक्षपणे सहकार्य करतो तोच खरा माणूस अस माझ मत आहे. आय. आर. बी. ही संस्था सुरू करताना मलाही अनेक र्स्पधांना सामोरं जावं लागलं होतं.

आज आय. आर. बी.चा कारभार विस्तारलेला आहे. थोड्याफार प्रमाणात यश मिळालंदेखील आहे. यशाबाबत एक कॉन्ट्रक्टर म्हणून मी समाधानी आहे. परंतु या समाधानात पूर्वीचे दिवस, पूर्वीची माणसेसुद्धा चांगल्या प्रकारे आठवणीत आहेत. त्यावेळी ज्या काही मोजक्या लोकांनी मला साथ दिली त्यात प्रामुख्याने माननीय नामदार श्री. छगन भुजबळ हे आहेत.

तशी त्यांची व माझी सुरुवातीची ओळख होती. ते नगरसेवक होते व मी मुंबई महानगरपालिकेमध्ये ज्युनियर इंजिनीयर होतो. ही गोष्ट सत्तर/एकाहत्तरमधील. त्यांची माझी ओळख झाली ती एका कामाच्या संदर्भात. ते काम असे होते की, मी मुंबई महानगरपालिकेमधली नोकरी सोडून 'शाह कन्स्ट्रक्शन' या खाजगी फर्ममध्ये नोकरी करू लागलो होतो. माझ्यावर रस्तेबांधणीची जबाबदारी फर्मने टाकली होती. मुंबई महानगरपालिकेची तेव्हा रस्ताबांधणीसंदर्भात निविदा निघाली होती. आमच्या कंपनीने सदर निविदा भरली

*आपण केलेल्या याचिकेचा निकाल आपल्या बाजूने न लागता विरोधी बाजूने लागला व त्या विरोधी पक्षकाराला फोन करण्याचा खिलाडूपणा केवळ भुजबळसाहेबांकडेच मला पाहायला मिळाला.*



होती; परंतु जो निविदा दर आम्ही भरला होता व तेवढाच निविदा दर 'कामा' या कंपनीने भरला होता. ते रस्ताबांधणीचे कॉन्ट्रॅक्ट 'कामा' या कंपनीला मिळणार होते. ते काम आम्हालाच मिळावे म्हणून मी फर्मच्यावतीने भुजबळसाहेबांना भेटायला गेलो. त्या वेळी ते स्थायी समितीचे सदस्य होते. त्यांच्याबरोबर प्रभाकर पै, प्रेमकुमार शर्मा व अन्य सदस्यही होते. तेव्हाच्या स्थायीच्या अध्यक्षांचे नाव मला आठवत नाही. त्या वेळेससुद्धा आजच्यासारखीच भुजबळांच्या शब्दाला निर्विवाद किंमत होती. मी त्यांना भेटून आमच्या कामाचा अनुभव सांगून हे काम आम्हाला मिळाले तर आम्ही ते कसे चांगल्याप्रकारे करू शकतो हे त्यांना पटवून दिल्यावर त्यांनी ते काम आम्हाला दिले. ही त्यांची व माझी पहिली भेट. त्या वेळी त्यांची मी निर्णयक्षमता व माणसातील प्रामाणिकपणा ओळखण्याची हातोटी पाहिली. त्यानंतर आमचा या ना त्या कामा निमित्ताने वारंवार संबंध येतच राहिला. नंतर ते महापौर झाले. ते महापौर झाल्यानंतर मुंबई महानगरपालिकेमध्ये श्री. के. पद्मनाभय्या हे आयुक्त म्हणून येणार होते. तेव्हाची ही घटना. माननीय श्री. के. पद्मनाभय्या माझ्या पूर्वपरिचयाचे होते. ते मुंबई महानगरपालिकेमध्ये रुजू होणार होते. रुजू होण्यापूर्वी त्यांना मुंबई शहराची माहिती हवी होती. त्यांना माझी आठवण झाली. मुंबई शहराची माहिती देण्याच्या निमित्ताने मी त्यांना दुसऱ्या दिवशी चहापानासाठी रस्त्यावरील आमच्या चौकीतच निमंत्रित केले. भुजबळसाहेबांनी मी तेव्हा निमंत्रित केले. शिरस्त्याप्रमाणे आयुक्त व महापौर यांनी माझ्या कामाची संयुक्त पाहणी केली व समाधान व्यक्त केले.

चहापान करताना भुजबळसाहेबांच्या लक्षात आले की माझी व आयुक्त श्री. पद्मनाभय्यांची पूर्वाश्रमीची ओळख आहे. हे पाहून भुजबळसाहेबांना आनंद झाला. त्यांनी श्री. पद्मनाभय्या यांना माझ्या पुढ्यातच सांगितले की, म्हैस्कर मोठे झाले पाहिजेत व मला त्यांच्या कुवती व योग्यतेनुसार त्यांना दर्जेदार कॉन्ट्रक्टर झालेले पाहायचे आहे. पुढे त्यांचे शब्द खरे ठरले. परंतु त्यांच्या अपेक्षेप्रमाणे मी मोठा झालो की नाही हे मला माहीत नाही.

महापौर असताना त्यांचे मुंबईप्रेम सर्वांना आठवत असेल. 'स्वच्छ मुंबई-सुंदर मुंबई' अशी घोषणा त्यांनी दिली व ते घोषवाक्य प्रत्यक्षात उतरवण्यासाठी त्यांनी अहोरात्र प्रयत्न केले आहेत हे मी स्वतः पाहिले आहे. एकदा त्यांच्या



महापौर कारकीर्दीत चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांनी संप केला. कचरा उचलणारे कामगार संपावर. त्यामुळे कचऱ्याचे ढीग शहरात सर्वत्र साठलेले. शहराची स्वच्छता तर व्हायला हवी होती. किंबहुना ही त्यांची तळमळ होती. त्याप्रसंगी भुजबळसाहेबांनी अनेकांना बोलावले. मलाही बोलावून घेतले आणि सांगितले की, तुमच्याकडचे कामगार व यंत्रसामग्री मला कचरा उचलण्यासाठी हवी आहे. माझ्यासारख्या अनेकांना त्यांनी त्या वेळेला कामे नेमून दिली व शहरात कचरा साठला जाणार नाही याची जातीने काळजी घेतली. रात्री-अपरात्री त्यांनी या कामाची जातीने पाहणी केलेली मी पाहिली आहे. अशी कामाबद्दलची तळमळ असणारा राजकीय नेता मला त्यावेळी जवळून पाहता आला.

महापौरपदाचा योग्य आब-रुबाब राखून त्यांनी आपल्यातले समर्थ राजकीय नेतृत्व उज्ज्वल करायला सुरुवात केली. मी तेव्हापासून त्यांच्या राजकीय यशाची चढती कमान पाहात आलो आहे. त्यांनी नेहमी आपल्या भूमिकेला मध्यवर्ती ठेवले. त्या भूमिकेला न्याय देताना आत्मीयता, तळमळ आदी गुणांचा संगम त्यांच्या ठायी झालेला मला आढळला.

पुढे ते शिवसेनेतून काँग्रेसमध्ये गेले. त्यामागचे राजकीय कारण कोणतेही असेल; परंतु त्यांच्या प्रामाणिकपणाबद्दल शंका निर्माण झालेली नव्हती. त्याच तळमळीने, त्यांच्या लढाऊ पद्धतीने त्यांनी काँग्रेसमध्ये महसूलमंत्री, गृहनिर्माणमंत्री म्हणून आपला एक वेगळाच ठसा उमटविला. नंतर राष्ट्रवादी काँग्रेस या नवख्या पक्षाचे प्रदेशाध्यक्ष होऊन पक्षबांधणीचे काम त्यांनी केले. या पक्षबांधणीमध्ये भुजबळसाहेबांसारखा कुशल संघटक विरळाच आहेत.

विरोधी पक्षनेते असताना त्यांनी आमच्या आय. आर. बी.विरुद्ध जनहित याचिका दाखल केली होती. परंतु त्या वेळेलासुद्धा आमचा इतक्या वर्षांचा स्नेहसंबंध पाहता त्यांनी मला बोलावून सांगितले की, विरोधी पक्षनेता म्हणून मी माझी भूमिका पार पाडतोय; परंतु तुमचे काम योग्य असेल तर तुम्हालाच न्याय मिळेल. झालेदेखील तसेच. त्या याचिकेचा निकाल आमच्या बाजूने लागला व अभिनंदनाचा फोनदेखील त्यांनी मला केला. आपण केलेल्या याचिकेचा निकाल आपल्या बाजूने न लागता विरोधी बाजूने लागला व त्या विरोधी पक्षकाराला फोन करण्याचा खिलाडूपणा केवळ भुजबळसाहेबांकडेच मला पाहायला मिळाला.



माझ्यासारख्या अनेकांना जोडून लोकसंग्रह कसा करावा व तो कसा जपावा हे भुजबळसाहेबांकडून शिकण्यासारखे आहे. विविध क्षेत्रांतील विविध स्वभावाची माणसे त्यांनी अतिशय कौशल्याने सांभाळली आहेत. झंझावातासारखं काम करणाऱ्या माणसाचा मला सहवास मिळावा हे मी  माझे भाग्य समजतो.

मी एक कॉन्ट्रक्टर, एक उद्योजक म्हणून माझे व्यक्तिगत मत मांडताना कोठेही एकांगीपणे मांडत नाही. भुजबळ हे व्यक्तिमत्त्व राजकारणी आहे म्हणून मी त्यांच्या स्तुतीपर माझी मते मांडतो आहे असेही नाही. तसा राजकारणाशी माझा दुरान्वयेही संबंध नाही व तसा मी ठेवलादेखील नाही. तरी देखील राजकारणातील 'सक्षम नेतृत्व' म्हणून छगन भुजबळांचा येथे उल्लेख करणे आवश्यक आहे. आता तर राज्याच्या राजकारणातल्या सीमा ओलांडून भुजबळसाहेबांनी समता परिषदेमार्फत दिल्ली, बिहार, हैदराबाद येथील सभा जिंकल्या व स्थानिक राजकीय नेत्यांना भुवया उंचावायला लावून त्यांनी आपली कर्तबगारी दाखविली आहे. त्यांच्या या उत्तरोत्तर वाढणाऱ्या यशाच्या व्याप्तीला माझ्याकडून शुभेच्छा देताना एवढेच म्हणेन की, 'भुजबळसाहेब, तुमचे राजकीय नेतृत्व सक्षमपणे उभारून येऊ दे. तुमच्या महत्त्वाकांक्षा पूर्ण होऊ दे. तुम्हाला अखंड दीर्घायुरारोग्य लाभू दे.'

❑●❑

# दिल्लीलाही दखल घ्यावी लागेल

सुरेश हावरे
बांधकाम व्यावसायिक



पहिल्या भेटीतच 'आपली खूप जुनी ओळख आहे' असा अनुभव फार क्वचित येतो. भुजबळांच्या बाबतीत मला तो आला याची नोंद करणे आवश्यक आहे असे मला वाटते. आमच्या कंपनीचा पी.आर. आमचे बंधू स्व. सतीश हावरे यांच्याकडे होता. त्यांच्या अपघाती निधनानंतर ती जबाबदारी माझ्यावर आली. एका कार्यक्रमाचं निमंत्रण देण्यासाठी व सदिच्छा भेट घेण्यासाठी आमच्या एका मित्रासोबत मी भुजबळसाहेबांकडे गेलो होतो. त्या दिवशी त्यांच्या अंगात ताप होता; परंतु त्या तापातही ते आम्हाला भेटले. निमंत्रण स्वीकारले. सहज गप्पा-गोष्टी झाल्या. आपण खूप ओळखीच्या माणसाशी बोलतो आहोत असे वाटून गेले.

*आमच्यावर आमच्या बंधूच्या मृत्यूचा आघात झाल्यावर व्यवसायातल्या आमच्या हिमतीला फुंकर घालणारा कोणीतरी हवा होता व मला आमची उमेद वाढवणारे व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांनाच बोलवायचं ठरवलं.*

आमच्या नेरुळ येथील सेंच्युरियन मॉलच्या उद्‌घाटन समारंभाला भुजबळसाहेब प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. सतीशजींच्या निधनानंतरचा आमच्या कंपनीचा हा पहिलाच जाहीर कार्यक्रम होता. कार्यक्रमाचे संयोजन व आयोजन फार मोठ्या स्तरावरचे होते. एवढ्या मोठ्या प्रमाणात कार्यक्रम करू नये असे अनेकांनी सुचविले होते; परंतु असे करण्याने उदास मनांना एक प्रकारची उभारी मिळेल हा एक आशेचा किरण त्या कार्यक्रमाच्या आयोजनामागे होता. या कार्यक्रमाला कोणाला बोलवायचं असा प्रश्न होता. आपल्या राजकीय जीवनात सतत संघर्ष करून लढाई जिंकणारी व्यक्ती भुजबळसाहेबांशिवाय मला कुणीही आठवलं नाही.



आमच्यावर आमच्या बंधुंच्या मृत्यूचा आघात झाल्यावर व्यवसायातील आमची हिम्मत वाढवणारा कुणीतरी आम्हाला हवा होता. म्हणून मी आमची उमेदी वाढविण्यासाठी भुजबळसाहेबांनाच बोलवायचं ठरवलं व नेमके झालेही तसेच. 'एका फिनिक्स पक्ष्यासारखे राखेतून उड्डाण घेऊन पुन्हा आकाशाला गवसणी घालण्याचे कार्य हावरे कुटुंब आज करीत आहे व त्यांचा मला अभिमान आहे', या भुजबळसाहेबांच्या शब्दांनी आमच्या हावरे कुटुंबातील सर्व सदस्यांच्या मनावरील दुःखाचा भार पार कमी होऊन सर्वांच्या मनात एक उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. उदासीनतेची जागा उभारीने घेतली. त्या क्षणापासून हावरे कुटुंबाने कधी माघार घेतली नाही. मुंबई, नवी मुंबई व ठाणे येथे प्रकल्पांचा विस्तार गतीने करण्यात सगळे व्यस्त झाले. कुटुंबाला एक नवे परिमाण प्राप्त झाले.

ओ.बी.सीं.चे आंदोलन भुजबळसाहेबांनी छेडल्यावर पुन्हा त्यांनी मनाला स्पर्श केला. ओबीसी असण्याचे चटके आम्ही सहन केले असल्यामुळे हे आंदोलन माझ्या मनाला अधिक जवळचे वाटले. म्हणून पुन्हा एकदा भुजबळसाहेबांना भेटावेसे वाटले. म्हणून लगेच त्यांच्या भेटीला गेलो. सहज शुभेच्छा देण्याचा हेतू होता. भुजबळसाहेबांनाही अशा अनौपचारिक भेटण्याचे अप्रूप वाटले. या भेटीत आंदोलनाची आवश्यकता, व्यापकता, याबद्दल त्यांनी काही गोष्टींचे कथन केले; परंतु ते जे काही बोलले त्याचा प्रत्यय थोड्याच दिवसांत यायला लागला. ओबीसींचे आंदोलन दिल्लीत झाले. नंतर हैदराबादला झाले. एवढेच काय बिहारमध्येही झाले आणि या सर्व ठिकाणी नेतृत्वाचा झेंडा रोवणारे भुजबळसाहेबच होते. सीमोल्लंघन करणाऱ्या त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची ओळख साऱ्या देशाला पटली. दिल्लीलाही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची दखल घ्यावीशी वाटेल असा दिवस लवकरच येईल, अशी मला पूर्ण खात्री आहे.

सहज, साधे, सरळ व्यक्तिमत्त्व. आपल्या घरातील ज्येष्ठ व्यक्तीशी आपण बोलतो आहोत असे त्यांच्याशी बोलताना वाटावे असा घरगुती व कौटुंबिक स्वभाव.

त्यांचे सर्व संकल्प व मनोरथ पूर्ण होवोत हीच ईश्वरचरणी प्रार्थना!

❑●❑

# ओबीसींचा राष्ट्रीय स्तरावरील नेता




## डॉ. कैलास कमोद

अध्यक्ष, ओबीसी महामंडळ


अगदी अलीकडची म्हणजे जुलै २००७ ची गोष्ट. हैदराबादच्या विमानतळावर आठशे-हजार तरुण मुले जमा झाली होती. मुंबईहून विमानाने येणाऱ्या पाहुण्यांची प्रतीक्षा करताना ही मुले तेलुगू भाषेत घोषणा देत होती. त्या घोषणेचा हिंदी भाषेतील अर्थ होता, 'छगन भुजबळ आगे बढो, हम तुम्हारे साथ है।' तेलुगू भाषेत घोषणा देणाऱ्या त्या मुलांची भाषा तिथे उपस्थित असणाऱ्या आमच्यासारख्या मोजक्या पाच-दहा मराठी कार्यकर्त्यांना उमगत नव्हती, तर आमची हिंदी त्यांच्या डोक्यावरून जात होती. ज्यांना भाषेतूनही संवाद साधता येत नव्हते असे ते आंध्र प्रदेशातले तरुण छगन भुजबळ या महाराष्ट्रातल्या नेत्याच्या स्वागतासाठी जमले होते. असा कोणता धागा होता, ज्याने या तरुणांना भुजबळांकडे खेचले होते? हा धागा होता 'ओबीसी'. होय! ओबीसींचा एक लढाऊ नेता आज हैदराबादमध्ये येत आहे, त्याला साजेशी सलामी दिली पाहिजे, या जाणिवेतून हे तरुण भुजबळांच्या स्वागताला सज्ज होते. बी.सी. आणि ओ.बी.सी. चळवळ ही दक्षिण भारतात मुळातच अतिशय सजग आहे. आंध्र प्रदेश या ओबीसी चळवळीचे महत्त्वाचे केंद्र आहे. साहजिकच ओबीसींचा प्रश्न हाती घेऊन राष्ट्रीय पातळीवर दिल्लीमध्ये लढणाऱ्या या नेत्याबद्दल त्यांनी बरेच काही ऐकलेले होते. टीव्हीवर पाहिलेले होते. साहजिकच आपल्या राज्यातील ओबीसी चळवळीला राष्ट्रीय पातळीवर आधार या नेत्याकडूनच मिळू शकेल या

*लालूप्रसाद यादव, नितीशकुमार, जॉर्ज फर्नांडिस व रामविलास पासवान असे एकापेक्षा एक दिग्गज नेते भुजबळ यांच्या पाटण्यातील या अतिप्रचंड रॅलीने अवाक् झाले होते.*



विश्वासाने हे सर्व तरुण जमले होते. हैदराबादमध्ये झालेल्या त्या सभेसाठी आंध्र प्रदेशच्या विविध जिल्ह्यांतून आलेल्या कार्यकर्त्यांनी प्रचंड गर्दी केली होती. भुजबळांच्या अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेने दक्षिणेवर केलेली ती पहिली स्वारी प्रचंड यशस्वी ठरली होती.

हैदराबादच्या आधी केवळ चारच महिने म्हणजे मार्च २००७ मध्ये बिहारच्या पाटणा या राजधानीत इतिहास घडविला गेला. पाटण्याच्या विशाल अशा महात्मा गांधी मैदानावर तीन-चार लाख लोकांचा जमाव जमला होता, तो अखिल भारतीय महात्मा समता परिषदेचे अध्यक्ष श्री. छगन भुजबळ यांचे विचार ऐकण्यासाठी. कुशवाह, सेनी, मौर्य, शाक्य अशा विविध ओबीसी जाती-समूहांचे लोक बिहारच्या दूरवरच्या जिल्ह्या-जिल्ह्यांतून वाजतगाजत येत होते. श्री. लालूप्रसाद यादव, श्री. नितीशकुमार, श्री. जॉर्ज फर्नांडिस व श्री. रामविलास पासवान असे एकापेक्षा एक दिग्गज नेते श्री. भुजबळ यांच्या पाटण्यातील या अतिप्रचंड रॅलीने अवाक् झाले होते. न्यूज मीडिया आणि प्रेस या गर्दीचे कोडे सोडविण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारे विश्लेषण करू पाहत होते. या विश्लेषणामध्ये पुन्हा एक धागा समान होता, तो म्हणजे ओबीसींचा राष्ट्रीय स्तरावरील नेता म्हणून श्री. भुजबळ यांना मान्यता मिळाली होती. पाटण्यातील रॅलीला बिहारच्या अनेक मातब्बर नेत्यांनी अपशकुन करण्याचा प्रयत्न करूनसुद्धा रॅली प्रचंड यशस्वी झाली होती. राजनीती धुरंधर या रॅलीचा वेगवेगळ्या प्रतीचा अर्थ काढू पाहात होते. बिहारमधील दुसऱ्या फळीतील बहुतांश नेते भुजबळांचे नेतृत्व मान्य करून महात्मा फुले समता परिषदेच्या छत्राखाली जमू लागले होते.

पाटणा रॅलीपूर्वी बरोबर एक वर्ष आधी मार्च २००६ मध्ये दिल्लीच्या रामलीला मैदानावर लाखोंच्या जमावाची एक प्रचंड रॅली समता परिषदेने आणि आय.आय.एम.सारख्या केंद्रीय उच्चशिक्षण संस्थांमध्ये ओबीसींसाठी आरक्षण देण्याच्या प्रस्तावावर विचार सुरू केला आणि मनुष्यबळ विकासमंत्री श्री. अर्जुनसिंग यांनी तशी घोषणा करताच या प्रस्तावाला विरोध सुरू झाला. वस्तुतः हा विरोध अल्प असा होता. तथापि, मीडियाने त्याचे स्वरूप बऱ्यापैकी मोठे करून दाखविण्यास सुरुवात केली. साहजिकच या विरोधकांच्या विरोधात आणि आरक्षणाच्या समर्थनार्थ देशभर महात्मा फुले समता परिषदेने आंदोलन केले. या



आरक्षण समर्थन आंदोलनाचे नेतृत्व करताना शासनकर्त्या पक्षाच्या मंत्रिमंडळातील एक मंत्री असूनही भुजबळांनी दिल्लीच्या जंतरमंतरवर धरणे धरून ओबीसी वर्गाशी असलेली आपली बांधीलकी सिद्ध केली होती. देशभर पसरलेल्या इलेक्ट्रॉनिक मीडियाच्या माध्यमातून ही बातमी वेगवेगळ्या राज्यांमध्ये पोहोचली होती आणि ओबीसींना राष्ट्रीय स्तरावर एक नेता मिळतो आहे, त्याचा आपल्या चळवळीसाठी योग्य तो वापर करून घ्यावा या हेतूने जनता संघटित होत आहे.

राजस्थानमधील जेसलमेर, बारमेरसारख्या सीमान्त जिल्ह्यांतून जयपूरपर्यंत, हरयाणातील हिस्सारमध्ये, चंदिगडमध्ये ओबीसींच्या रॅलीज आयोजित कराव्या, अशी मागणी देशाच्या विविध भागांतून होत आहे.

मंडल आयोगाला शिवसेनेने विरोध केला म्हणून १९९२ साली त्या पक्षाचा त्याग करून मंडल आयोग महाराष्ट्रात लागू व्हावा म्हणून १९९३ साली महाराष्ट्रात जालना येथे प्रचंड समता मेळावा आयोजित करून तशी घोषणा तत्कालीन मुख्यमंत्री ना. शरद पवार यांच्याकडून करवून घेऊन ओबीसींचा नेता अशी सुरुवात महाराष्ट्रात करणाऱ्या भुजबळांना आता अखिल भारतीय स्तरावर ओबीसींच्या नेतृत्वाची धुरा हातात येत आहे; तेथेही ते निश्चितच यशस्वी होतील.

❒●❑



# स्वकर्तृत्वाची निर्मिती


## प्रा. डॉ. संजय गव्हाणे

अभ्यासक व संशोधक


*तेलगी प्रकरणाचा बाऊ करून एका विशिष्ट सामाजिक गटाने भुजबळ यांना राजकारणात पंख उघडताच येणार नाहीत अशी स्थिती केली तेव्हादेखील भुजबळांना शह देणे या कायम सत्तास्थानी असलेल्या समाजगटास शक्य झाले नाही.*

महात्मा जोतीराव फुले माझ्या अभ्यासाचा विषय तर माऊली सावित्रीबाई फुले माझ्या श्रद्धेचा विषय. भारतीय समाजाची जिना नसलेली इमारत, विषमतेने बाधित इमारत या द्वयांनी दुरुस्त करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या हयातीत यास पूर्ण यश मिळाले नाही. पण त्याच प्रेरणेने भारतीय संविधान निर्मिती झाली. जवळपास १५० वर्षांनंतर देखील ज्या व्यक्तीच्या विचारांची गरज समाजाला वाटते त्या फुले यांच्या जीवनकार्याचा अभ्यास करावा असे वाटते. पण एक विचार असाही येत होता की, या संदर्भात मी जे लिखाण करेन ते पुस्तकाकडून पुस्तकाकडे जाणारे असेल. मला तर पुस्तकाकडून माणसाकडे जाणारे लिखाण करावयाचे होते. त्यासाठी माझा शोध सुरू झाला तो त्या माणसाचा, जो आज महात्मा फुले यांना अभिप्रेत कार्याचा गाडा त्याच्या कुवतीनुसार पुढे रेटत आहे. या शोधाशोधीत मी पोहोचलो तो छगन भुजबळ या नावाजवळ.

महात्मा फुलेकालीन समाजरचना आज राहिलेली नाही. पण तत्कालीन समाजरचनेने निर्माण केलेले प्रश्न आज वेगळ्या स्वरूपात अस्तित्वात आहेत. समाजरचना आज अधिक गुंतागुंतीची झालेली आहे. महात्मा फुलेकालीन शोषण करणारा समाजगट कमकुवत झालेला आहे. पण शोषण थांबलेले नाही. नवा शोषण समाजगट अस्तित्वात आलेला आहे. महात्मा फुलेंच्या वेळी पेशवे व त्यांच्याच जातकुळीतील समाजगट सत्तेवर होता. आज 'सहकार', 'साखर कारखाने',



'शेतकऱ्याचा मुलगा' या बुरख्याखाली 'पेशवा' प्रवृत्तीच सत्तेवर आहे व त्यांचीच जातकुळी सर्व स्तरांवर सत्तेचा वापर करीत शोषण करीत आहे. अशा शोषण करणाऱ्यांची संख्या इतकी आहे की, त्यांना उघड विरोध करणे शक्य नाही, अशा शोषण व्यवस्थेचा अभ्यास करून निदान करणाऱ्या व्यक्तीच्या शोधात मी होतो. हा शोध माझा छगन भुजबळ यांच्या कार्याशी व व्यक्तिमत्त्वाशी थांबला. मी छगन भुजबळांचे नेतृत्व अभ्यासताना, त्यांना हे कसे शक्य झाले, हा प्रश्न सतत पडत होता. कारण आज राजकारणात पाय रोवण्यासाठी किमान वारसा लागतो. वडील नाही तर सासरा, काका, किमान साखर कारखान्याचा संचालक असा वारसा लागतो. तसा वारसा महाराष्ट्रातील सर्वच मंत्री पातळीवरच्या नेत्यांना आज तरी आहेत. यास अपवाद आहे ते फक्त श्री. छगन भुजबळ. भुजबळांचे बालपण, शिक्षण घेतानाची स्थिती अक्षरशः अंगावर काटे आणणारी होती.

लहान वयातच आई-वडिलांचे छत्र हरपले. अगदीच जेमतेम आर्थिक परिस्थिती असलेल्या अशिक्षित मावसआजीने सांभाळ केला. ती राहत असलेल्या चाळीत शिक्षण तर सोडा पण पिण्याच्या पाण्याचे नळ नाहीत, लाईट नाही, राहायला नीट घर नाही, दोन वेळ जेवणाची भ्रांत असलेली आजी दिवसभर भाजी विकून त्या पैशातून मीठमिरची आणि चाळीतीलच मारवाड्याच्या किराणा दुकानात दिवसभर खाली पडलेले धान्य एकत्र भरून घरी आणून निवडून मग दळून रात्री केव्हातरी स्वयंपाक होऊन जेवण मिळायचे. या स्थितीतही मावसआजीने भुजबळांना दाखल केले ते महापालिका शाळेत. अशा परिस्थितीत वाढलेले श्री. भुजबळ आज ज्या राजकीय पातळीवर आहेत ते पाहून आश्चर्य वाटते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल कुतूहल निर्माण करते. त्यांना प्रेरणा देणारे घटक अभ्यासण्यास उत्सुकता वाटते. त्यांच्या व्यक्तिमत्वातील गुणविशेष शोधण्यास भाग पाडते.

नेतृत्व करण्याचा श्री. भुजबळ यांच्या स्वभावाचा अगदी सुरुवातीपासूनचा भाग आहे. शाळेत असताना वर्गात ते मॉनिटर होते. इंजिनीअरिंगला असताना जी.एस. होते. सार्वजनिक जीवनाला सुरुवात केल्यानंतर चाळीतील गणेश मंडळाचे अध्यक्ष होते. शिक्षण घेत असताना उदारनिर्वाहासाठी ज्या भाजीमार्केटमध्ये भाजी विकायचे त्या मार्केटचे अध्यक्ष झाले. शिवसेनेच्या स्थापनेपासून पुढाकार घेत शाखाअध्यक्ष झाले.



मिळालेल्या संधीचे चीज करणे हा त्यांचा स्वभावविशेष नगरसेवक झाल्यानंतर त्यांनी स्वतःला त्यात झोकून दिले. सुंदर मुंबई करण्यासाठी ट्रॅफिक आयलँडस्, रस्त्यांचे सुशोभीकरण, मुंबईतील पिण्याच्या पाण्याचा प्रश्‍न, शिक्षणाचा प्रश्‍न, आरोग्याचा प्रश्‍न, मुंबईतील रहदारीचा प्रश्‍न अशी विकासाची कामे केलीत. हाच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा भाग नंतर ते मंत्री असताना, विरोधी पक्ष नेते असताना कामी आला. विरोधी पक्षनेते असताना सभागृहात व सभागृहाबाहेरची त्यांची भाषणे त्याची साक्ष आहे. भाषणात अभ्यास, भावनाप्रधानता याचे उत्तम मिश्रण ते करतात. सभागृहात भाषण करताना त्यांनी मुंबईतील सफाई कामगारांच्या पगाराचा प्रश्‍न, राहत्या घरांचा प्रश्‍न आणि त्यांच्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्‍न ही त्याची साक्ष आहे. समाजकारणात, राजकारणात नव्याने येऊ पाहणाऱ्या तरुणांसाठी भुजबळ या अर्थाने एक मॉडेल व्यक्तिमत्व आहे.

विचार विचारपूर्वक स्वीकारणारा व एकदा विचार स्वीकारल्यानंतरच्या त्या विचारासाठी स्वतःला झोकून देणारे व्यक्तिमत्त्व म्हणून देखील श्री. भुजबळ यांच्या व्यक्तिमत्वाचा भाग अभ्यासकांना अभ्यास करण्यास भाग पाडतो.

शिवसेनेत असताना मराठी माणसासाठी केलेली आंदोलने, बेळगाव लढ्यात अटक होण्याची भीती असताना त्यांनी केलेले वेशांतर, शिवसेनेला मुंबईच्या बाहेर विस्तारीत करून एक प्रबळ प्रादेशिक पक्ष करण्यासाठी त्यांनी केलेले श्रम, पुढे कमकुवत झालेल्या काँग्रेस पक्षाला महाराष्ट्रात मजबूत करण्यासाठी विरोधिपक्ष म्हणून केलेले काम, राष्ट्रवादीत असताना सत्तेची मक्तेदारी समजणाऱ्यांना त्यांच्या घोडदौडीमुळे भरलेली धडकी ही त्याची साक्ष आहे.

या प्रवासात सुरुवातीला मराठी माणूस व हिंदू समाज त्यांच्या विचाराचा केंद्रबिंदू होता. नंतर महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विचार, सामान्य माणसांचे हित त्यांच्या विचाराचा प्रमुख भाग झाला. दोन्ही विचारांना त्यांनी मनापासून स्वीकारले. त्या विचारांच्या मागे जनशक्ती उभी करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. मराठवाडा, विदर्भात आज जी शिवसेना दिसते ती भुजबळांमुळेच. तर महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेर बिहार, राजस्थान, आंध्र प्रदेश, हरियाणा, छत्तीसगड, झारखंड, उत्तरांचल, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश येथे महात्मा फुले समता परिषद दिसते तीदेखील छगन भुजबळ यांच्यामुळेच.



विचारांना अर्थ त्या विचारांना जनाधार असला तरच असतो. जनाधार असला तर विचार प्रभावी वाटतो. विचार कार्यान्वित होत असले किंवा करता येत असेल तर त्यास महत्त्व प्राप्त होते. विचारांच्या संदर्भात ही तात्त्विक बाजु श्री. भुजबळांनी जाणली. त्यानुसार कृती केली. परिणामतः लोकांनी त्यांना नेता म्हणून स्वीकारले.

छगन भुजबळ यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणखी एक महत्त्वाचा गुण म्हणजे जोखीम घेण्याची ताकद, राजकारण हे निसरडे क्षेत्र आहे. यात पाय रोवून उभे राहण्यासाठी सातत्याने 'जनाधार' असावा लागतो. पण राजकारणात सतत वरच्या पायरीवर पाय ठेवण्यासाठी जोखीम पत्करण्याची क्षमता लागते. भुजबळ यांच्या बाबतीत हा गुण मला विशेषत्वाने जाणवला. सुरुवातीला त्यांनी नोकरी सोडून राजकारणात भाग घेतला ही एक जोखीम. त्यातही सत्ताधारी पक्षाऐवजी शिवसेनेचा स्वीकार केला ही दुसरी जोखीम. निवडणुकीच्या राजकारणात कधी विजय तर कधी पराजय, या स्थितीत त्यांनी घेतलेली जोखीम. शिवसेनेत असताना बेळगावच्या प्रश्नावर वेषांतर करून आंदोलनात भाग घेण्याची जोखीम. शिवसेना सोडण्याची जोखीम, काँग्रेस पक्षाला उतरती कळा लागली तेव्हा त्यात जाण्याची जोखीम. काँग्रेस सोडून राष्ट्रवादीत जाण्याची जोखीम. या काळात 'टी बाळू' म्हणत थेट शिवसेनाप्रमुखांना त्यांच्या भाषेत उत्तर देण्याची जोखीम, विरोधी पक्ष म्हणून घेतलेल्या भूमिकेबद्दल त्यांच्या घरावर हल्ला झाला व त्यास घाबरून न जाता काम करत राहण्याची जोखीम पत्करली. अनेक आरोप प्रत्यारोपांना सामोरे जाताना त्यांनी दाखवलेले धैर्य, मध्यंतरीच्या काळात सत्तेची मक्तेदारी असणाऱ्या गटाने त्यांना हुसकावून लावण्याचा केलेला प्रयत्न व त्यास बळी न पडता त्याच पक्षात राहून दोन हात करण्याची त्यांनी दाखवलेली हिंमत व घेतलेली जोखीम अभ्यासायोग्य आहे. राजकीय वारसा नसणाऱ्या, पैशाचा अभाव असणाऱ्या तरुणांना जे राजकारणात येऊ इच्छितात त्यांच्यासाठी श्री. भुजबळांचा 'जोखीम घेण्याचा घटक' निश्चित प्रेरणादायी आहे.

शिवसेनेत एका चौकडीने त्यांचे पंख छाटण्यास सुरुवात केली होती. भुजबळांना हे सहन होणे शक्यच नव्हते म्हणून त्यांनी पक्ष बदलला. शिवसेना सोडताना त्यांनी विचारसरणीचा देखील गंभीरपणे विचार केला. शिवसेनेतील नेते महात्मा फुलेंच्या विचारांना हेतुतः डावलत आहेत. म. फुले यांना अभिप्रेत समाजातील



नेत्यांना शह देत आहेत हे त्यांच्या लक्षात आल्यानंतर म. फुले यांच्या व्यक्तिमत्त्वास, विचारास नाकारणाऱ्या पक्षात भुजबळ राहणे शक्यच नव्हते. त्यांनी शिवसेना तेव्हा सोडली, जेव्हा शिवसेनेची ताकद वाढलेली होती. मुंबईबाहेर सेनेचा प्रभाव निर्माण झाला होता. मराठवाडा-विदर्भात तिचा मोठा चाहता वर्ग निर्माण झाला होता. हा वर्ग निर्माण करण्यात त्यांचा मोठा वाटा होता, असे असताना त्यांनी शिवसेना सोडली. कारण म. फुले व त्यांच्या विचारांना डावलण्याचा विचार ते सहन करू शकले नाहीत.

दुसऱ्या वेळी त्यांनी काँग्रेसमधून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. हे त्यांचे पाऊल विचारपूर्वक होते. देशाच्या सर्वोच्च पदावर अर्थात पंतप्रधानपदावर परदेशी वंशाची नव्हे तर भारतीय वंशाचा व्यक्ती असावी ही श्री. शरद पवार यांनी घेतलेली भूमिका त्यांनी मान्य करून, दुभंगलेल्या काँग्रेसच्या वेळी महाराष्ट्रात मासबेस असलेल्या नेत्यांच्या बरोबर राहणे पसंत केले म्हणून ते राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये गेले. मात्र आता राष्ट्रवादीत कोंडी होऊ नये यासाठी त्यांनी अतिशय सावध पावले टाकावयास सुरुवात केली. साधारणतः मोठ्या प्रमाणात जनाधार (मासवेट) असलेल्या नेत्यास कोणत्याच पक्षातील चांडाळचौकडीस टाळता येत नाही हे त्यांच्या लक्षात आले होते. हा मासबेस विशिष्ट विचारांशी बांधलेला असावा, अडचणीच्या संदर्भात त्यांना सतत डावलले जात आहे असे त्यांना वाटत असले पाहिजे. तरच त्यांची संघटना बांधता येईल, असे भुजबळ यांना वाटले. या विचारांचा केंद्रबिंदू करून त्यांनी ओबीसींना एका झेंड्याखाली आणण्याचे ठरवले व त्यातून साकारली ती महात्मा फुले समता परिषद ही संघटना. ही संघटना आता प्रभावी झालेली आहे. तेलगी प्रकरणाचा बाऊ करून एका विशिष्ट सामाजिक गटाने भुजबळ यांना राजकारणात पंख उघडताच येणार नाहीत अशी स्थिती केली तेव्हादेखील भुजबळांना शह देणे या कायम सत्तास्थानी असलेल्या समाजगटास शक्य झाले नाही. कारण त्यांनी उभी केलेली म. फुले समता परिषद. महाराष्ट्रात व महाराष्ट्राच्या बाहेर आंध्र प्रदेश, राजस्थान, बिहार, दिल्ली, हरियाणा या राज्यांत या संघटनेची विस्तारत जाणारी संघटना व अनुयायांची वाढत जाणारी संख्या. या संघटनेमुळे भुजबळ यांनी राष्ट्रीय राजकारणात आपल्या अस्तित्वाची दखल घेण्यास राष्ट्रीय पक्षांना भाग पाडले तर महाराष्ट्राच्या राजकारणात आता



त्यांची अनिवार्यता निश्चित झालेली आहे. आज महाराष्ट्राच्या राजकारणात ओबीसींची दखल घेण्याइतकी संख्या त्यांच्यामागे आहे तर महाराष्ट्राबाहेरचा 'ओबीसी गट' त्यांच्याकडून मोठ्या अपेक्षा बाळगूण आहे. तेलगी प्रकरणानंतर 'भुजबळ संपले' असे म्हणणाऱ्यांना भुजबळ यांनी या पद्धतीने दिलेले उत्तर त्यांच्या बुद्धिमत्तेची चुणूक दाखवते. ज्याला आपण सोशल इंजिनीअरिंग म्हणतो ते आता त्यांना एकदम बरोबर जमलेले आहे. छगन भुजबळांना हे कसे जमले याचा अभ्यास ओबीसींतील तरुणांनी समाजसेवा करण्यासाठी करावा म्हणूनच मी संशोधन करून त्याची माझ्या प्रबंधात मांडणी केलेली आहे.

राष्ट्रीय पातळीवर काम करणाऱ्या नेत्यास एक महत्त्वाचे पथ्य पाळावे लागते, ते म्हणजे त्यांचा मतदारसंघ मजबूत करणे. याबाबतीत भुजबळ यांनी पूर्ण खबरदारी घेतलेली आहे. विकासाच्या बाबतीत कालचा येवला व आजचा येवला यात मोठी तफावत आहे. येवल्याचा विकास डोळ्यात भरण्यासारखा आहे. याचे श्रेय श्री. भुजबळांनाच जाते. शरद पवारांनी बारामतीत एकही सभा घेतली नाही तरी ते निर्वाचित होणारच. कारण त्यांचे तेथे काम आहे. आज तीच स्थिती थोड्याफार फरकाने भुजबळांची येवल्याच्या बाबतीत आहे. भक्कम मतदारसंघ निर्माण करून त्यांनी 'मतदार संघात' गुंतून ठेवण्याच्या पक्षांतर्गत विरोधकांना चांगलाच शह दिलेला आहे. राज्यस्तरावर त्याचमुळे आज ते वेळ देऊ शकतात. राज्यपातळीवर त्यांची व्यूहरचना खरोखरच नव्या कार्यकर्त्यांना पथदर्शक ठरणारी आहे.

म. फुले समता परिषदेच्या माध्यमातून त्यांनी ओबीसींना एका झेंड्याखाली आणले. भारतातील ओबीसींना त्यांच्या संख्येची व ताकदीची जाणीव करून दिली. बहुतेक राज्यांत परंपरागत वरच्या जातींनी जी सरंजामशाही निर्माण केली होती, कायम सत्तेची मक्तेदारी असणारा वर्ग निर्माण केला होता त्यास म. फुले समता परिषदेच्या माध्यमातून शह देणारा वर्ग निर्माण करण्याचे श्रेय श्री. भुजबळ यांनाच जाते.

लोकशाहीत संख्या महत्त्वाची असते. संख्या सत्ता प्राप्त करण्यासाठी पुरेशी असताना ओबीसींना संघटीत नसल्यामुळे ती मिळत नव्हती. ओबीसींतील ही उणीव त्यांना संघटित करून भरून काढली. राजकारणातील श्री. भुजबळांचा हा दूरदर्शीपणा निश्चितच अभ्यासकांना अभ्यास करण्यात भाग पाडणारा आहे.




त्यांचा अभ्यास करताना सुरुवातीला मी तटस्थ राहण्याचा प्रयत्न केला. पण त्यांचा म. फुले यांच्या विचारांना मूर्तरूप देण्याचा प्रयत्न अतिशय जवळून पाहिल्यानंतर माझ्यातील भुजबळ यांच्या संदर्भातील तटस्थता संपली. ते माझ्या श्रद्धेचा भाग झाले हे कबूल करताना आज मला बिलकुल वाईट वाटत नाही.

❒●❏

# मुलाखत

या पुस्तकात सुरुवातीचे केलेले ‘असे घडले असे लढले’
हे लेखन संदर्भावर आधारित आहे. मान्यवरांच्या लेखसंग्रहात
मान्यवरांनी भुजबळांबद्दल आपली मते मांडलेली आहेत.
मुलाखतीत मात्र छगन भुजबळांनी आपली मते,
आपले विचार प्रकट केलेले आहेत.



# भुजबळ, शाहू-फुले-आंबेडकर यांची विचारप्रणाली परिपूर्ण आहे

विलास पवार

मुलाखत/शब्दांकन

**राजकीय वाटचालीत तुम्हाला यश मिळालं असं वाटतं का? आजवरच्या राजकीय वाटचालीबाबत सांगाल का?**

राजकीय वाटचालीबद्दल असे काही म्हणणार नाही की मी फार मोठी अचिव्हमेंट केली. मुंबईचा महापौर होतो त्यावेळेला मुंबई शहरामध्ये काही सुधारणा घडवून आणण्यासाठी निश्चितपणे चांगलं काम माझ्या हातून झालं. उदा. मुंबईचे ट्रॅफिक आयलंड जे आहेत हे खाजगी लोकांना सांगून, उद्योगपतींना सांगून त्याचं सुशोभिकरण करून घेणे, हुतात्मा स्मारकाचं काम चांगल्या रितीने करून घेणे, मुंबईमध्ये मुंबई महानगर पालिकेमध्ये संपूर्ण कारभार मराठीत करणे, मुंबई महानगर पालिकेमध्ये संपूर्ण कारभार मराठीमध्ये करणं, मुंबई शहरामध्ये रस्त्यावरच्या पाट्या मराठीत लावणे. रस्त्यावरील रॅलींग सुधारणे इ. अनेक गोष्टी आहेत त्यात सुधारणा करून अंमलात आणण्याचा प्रयत्न केला. हुतूतू, खो-खो वगैरे हे जे खेळ आहेत त्यांना महापौर चषक म्हणून ऑल इंडियामध्ये सुरू करणं, किंवा मुंबईमध्ये पहिली मॅरॅथॉन जी आहे ती १९९१ सालामध्ये मुंबई महापौर म्हणून मी आयोजित केली होती. ती ४२ कि.मी.ची आणि त्याच्यासाठी उपराष्ट्रपती शंकरदयाळजी शर्मा हे खास बक्षिस वाटपासाठी आले होते. बेळगाव-कारवार आंदोलनात सहभागी झाले. नगरसेवकम्हणून अनेक लोकोपयोगी कामं करण्याचा प्रयत्न केला. त्याच्यानंतर आमदारम्हणून अनेक सुधारणा कामे माझ्याकडून



झाली. विधानसभेमध्ये विशेषतः ८५ ते ८९ च्या दरम्यान शिवसेनेचा एकमेव आमदार म्हणून खूप मोठा लढा चार-पाच वर्ष मी विधानसभेत दिला. त्याच्यानंतर काँग्रेसमध्ये आल्यानंतर मंत्री म्हणून सुद्धा काही गोष्टी सुधारणेचे निर्णय घेतले आहेत आणि ते अंमलात आणले. आज जे काही सात-बाराचे उतारे तात्काळ दिले जातात. त्याचबरोबर तिथे झालेले संगणकीकरण हे मी महसूल मंत्री असताना घेतलेले निर्णय आज अंमलात येत आहेत. अनेक जमिनीविषयक बाबींबाबत सुधारणा घडविण्याबाबतही निर्णय घेतले होते. गृहनिर्माणमंत्री असताना देखील अनेक सुधारणा घडवून आणण्याचा मी प्रयत्न केला. अनेक नवीन मुद्दे, सामाजिक निर्णय घेतले. त्यापैकी एक म्हणजे झोपडपट्टीवासी किंवा कुठलेही सरकारी घर घ्यावयाचे तर ते फक्त नवऱ्याच्या नावाने न देता नवरा आणि बायको दोघांच्या नावानेच दिले पाहिजे अशाप्रकारच्या सामाजिक सुधारणा त्याच्यामध्ये करण्याचा मी प्रयत्न केला. नंतर विरोधी पक्ष नेता झालो. विरोधी पक्ष नेता म्हणून तुम्हाला कल्पना आहे की शिवसेना बीजेपीचं जेव्हा सरकार आलं होतं तेव्हा वर्ष-दीड वर्ष शिवसेनेच्या विरुद्ध बोलायला सुद्धा लोकं घाबरत होते. अशावेळेला कोंडी फोडण्याचा मी प्रयत्न केला. त्यात यशस्वीही झालो. शिवसेना बीजेपीच्या सरकारबाबत जी काही मला शक्य होती ती माहिती मिळवायचं काम मी केलं. त्यातून त्यांच्यावर सभागृहात हल्ले करणे, त्यांच्यावर चुकीच्या निर्णयाबाबत टीका करणे इत्यादी विरोधी पक्ष नेता म्हणून मी काम करत होतो. या टिकेवरून सत्तारूड पक्ष इतका वैतागला की माझ्यावर प्राणघातक हल्ले करण्यापर्यंत त्यांची मजल गेली.

मी उपमुख्यमंत्री झाल्यावर गुन्हेगारांचा कणा मोडायचा प्रयत्न केला. मुंबई शहरातले गँगवॉर त्याचबरोबर सर्रास खंडणी मागितली जात होती. त्यामुळे लोक मुंबईत थाटामाटात लग्न करायला घाबरत होते. लोकं साधी मारुती घ्यायला घाबरत होते. दिवसाढवळ्या हॉटेलवाले, डॉक्टर्स, बिल्डर्स, सिनेमावाले यांचे खून पडत होते. तेव्हा ते आव्हान आम्ही पेललं आणि त्याच्यानंतर चार-सहा महिन्यामध्येच आमच्या सगळ्या पोलीस अधिकाऱ्यांच्या सहाय्यानं गुंडगिरीचा निःपात करण्यामध्ये निश्चितपणे यश मिळालं असा माझा दावा आहे आणि ती सत्य परिस्थिती आहे. हे करत असताना एखादा मोठा हिऱ्याचा व्यापारी जर



असेल त्यालासुद्धा आम्ही सोडलं नाही. एक मेसेज जो आहे तो लोकांमध्ये गेला की हे शासन जे आहे ते कुणाला सोडणार नाही. जर कुणी बेकायदेशीर काम केलं, जर माफियाबरोबर कुणी संपर्क ठेवला तर त्याची गय केली जाणार नाही. कितीही मोठे असाल किंवा कुणीही असाल हा जो एक मेसेज देण्याचे काम झालं त्यातून निश्चितपणे फार मोठा परिणाम साधला गेला. त्यावेळेला सुद्धा आमची शिवसेनेबरोबर जी फाईट आहे ती अर्थातच सुरू होती. माझ्याकडे पर्यटन खातेसुद्धा होते. गणपतीपुळे असेल किंवा तारकर्ली समुद्र किनारा असेल अशी अनेक ठिकाणं आहेत की जिथे वातानुकूलित कुटीर निर्माण करून पर्यटनासाठी आकर्षण वाढविले. दुसरं महत्त्वाचं म्हणजे असं की, जे मल्टीप्लेक्स आज आपल्याला दिसतात ते त्या वेळेला मी विरोध असुनसुद्धा रेटून नेलेले होते. आज जी मल्टिप्लेक्स थिएटर्स आपल्याला झालेली दिसतात त्याच्यामध्ये मी घेतलेल्या निर्णयाचा वाटा महत्त्वाचा आहे. डेक्कन ओडीसी ही लक्झरी ट्रेन म्हणजेच पॅलेस ऑन द व्हिल. तिच्या अगदी पहिल्या प्लॅनिंगपासून ते शेवटपर्यंत हे सगळं काम माझे आहे. म्हणजे त्यावेळच्या रेल्वेमंत्री असलेल्या ममता बॅनर्जी, त्याच्यानंतर नितीशकुमार यांच्याकडे जाऊन त्यांना ते समजावून सांगून फोन करून नंतर मुंबईमध्ये ज्येष्ठ लोकांची एक कमिटी स्थापन करून आतलं जे डिझाइन आहे ते करणाऱ्या लोकांचे जे मोठमोठे इंटिरीअर, डेकोरेटर्स, डिझायनर्स बोलवले गेले त्यातून त्यांचे एक टिमवर्क करण्यात आले. त्यावेळेला जे पूर्ण काम आहे ते माझ्या काळात झाले. त्याच्या उद्घाटनाच्या पंधरा दिवस अगोदर मी राजीनामा दिला हा माझ्या दुर्दैवाचा मुद्दा. आता मी सार्वजनिक बांधकाम मंत्री आहे. या खात्यात निधीअभावी अनेक रस्त्यांचे मोठे प्रकल्प रखडले आहेत. त्यासाठी निधी उपलब्ध करून योग्य ते अधिकार प्राप्त करून जास्तीत जास्त काम करण्याचा माझा प्रयत्न आहे. आता जे उदारमतवादी धोरण, जागतिकीकरण झालेलं आहे ते एवढ्या गतीनं पुढं चाललेले आहेत की ते आपल्याला निधी देतील. मग आपण काहीतरी करू अशी वाट पाहण्यासारखी वेळ राहिलेली नाही. आणि ते जर झालं नाही तर आपण मागे राहू. म्हणूनच खाजगीकरणाच्या माध्यमातून चौपदरी रस्ते निर्माण करून, मोठमोठी शहरे जोडणे, हे बीओटीच्या धोरणानुसार करणे चालू आहे. तशाच प्रकारे दिल्लीमध्ये असलेले 'महाराष्ट्र सदन' बांधले



जात आहे. आपल्याला महाराष्ट्रातल्या लोकांना दिल्लीत गेलो तर राहण्याची आज चांगली सोय राहिलेली नाही. जुनं महाराष्ट्र सदनात एक तर जागा मिळत नाही म्हणून त्याचं बांधकाम करायला बीओटी माध्यमातून सुरू केलेलं आहे. पहिल्यांदा एखाद्या खात्याची इमारत सार्वजनिक बांधकाम भवन निर्माण होत आहे आणि मग हायमाऊंट रेस्टहाऊस जे आहे, तेसुद्धा पाडून नवीन बनविण्याचं काम सुरू होत आहे. आरटीओ ऑफीस तयार करणे इत्यादी अनेक बीओटीच्या माध्यमातून मोठ्या संख्येने कामं आहेत ती आपण करायला सुरुवात केली आहे. या कामातून पैसा खर्च न होता जो पैसा शासनाला मिळतो आहे तो पैसा गावच्या रस्त्यांसाठी आपल्याला वापरता येतो. शेतकरी किंवा आरोग्य योजनांसाठी तो पैसा वापरला जातो. तिथे काय कुणी बीओटीमध्ये काम करणार नाही आहे आणि बीओटीमधून किंवा खासगीकरणामधून येणारा पैसा करोडोमध्ये येतो किंवा येऊ शकतात. त्यामुळे जास्तीत जास्त बीओटी प्रकल्पांद्वारे विकासकामे चालू केली आहेत.

**महापौर असताना तुम्ही कार्यालयात आल्या आल्या टेप केलेल्या तक्रारी कॅसेटच्या रूपात देवून कार्यवाही करत होतात. प्रशासनातल्या या नव्या शैलीबाबत सांगाल का?**

एखादी गोष्ट जर आपण चांगली म्हणून आत्मसात केली तर त्यावेळेला ती नवीन असते कदाचित. मी महापौर असताना कार्यालयात जा-ये करताना रस्त्यावरती ज्या गोष्टी पाहत असे. उदा. रस्त्यावर पडेलेला कचरा, पडलेले खड्डे, अनधिकृत बांधकाम। एखाद्या ठिकाणी गटारे वाहताहेत, अमुक केलं पाहिजे तमुक केलं पाहिजे एखादी योजना डोक्यात आलेली असेल, ते सर्व मी डेक्टाफोन जवळ ठेवत असे तो वापरून टेप करून ऑफिसमध्ये गेल्यावर माझ्या सचिवाला ती टेप देवून त्याची कार्यवाही व कारवाई करण्याचे आदेश मी देत असे. कधी कधी काही पत्रंसुद्धा टेप करून टाईपिंगसाठी देत असे. त्यामुळे माझा वेळ वाचला जावून कामाचा वेग वाढला जायचा.

**तुम्ही स्वत: तंत्रशिक्षण घेतलं आहे त्याचा उपयोग तुम्हाला महापौर,मंत्री असताना झाला का?**

महापौर असताना तिथल्या युनियनने संगणकीकरणाला विरोध केला. संगणक



नकोत त्याच्यामुळे लोक कमी होतील अशी भीती युनियनची होती. पण तसं झालं नाही. लोक कमी झाले नाहीत. संगणक आल्यामुळे काम सोपं झालं. संगणकीकरण महापालिकेत बऱ्यापैकी रूळलं आहे. अशाचप्रकारे रस्ता साफ करण्याच्या गाड्या आणल्या होत्या. युनियनने याला प्रचंड विरोध केला. काही दिवस त्या गाड्या बंद ठेवल्या. नंतर वापरात काढल्या. नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग आपल्याला उपयोग करून घ्यायलाच पाहिजे. जगामध्ये निरनिराळ्या गोष्टी येत असतील व त्याचा आपण उपयोग करून घेतला पाहिजे. नवीन मशिनरी वापरून चौपाट्या साफ करण्याचा आग्रह आम्ही धरलेला होता. मी युनियनच्या विरुद्ध किंवा लोकं कमी करण्याच्या मागे नाही.

व्यापारीकरण वाढते आहे. लोकसंख्या वाढते आहे. त्याप्रमाणे लोकांच्या गरजाही वाढताहेत. त्यामुळे जे जे तंत्रज्ञान उपलब्ध आहे त्या तंत्रज्ञानाचा उपयोग जो आहे निश्चितपणे झाला पाहिजे असं मला वाटतं. पोलीस खात्यामध्येसुद्धा आधुनिक तंत्रज्ञान वापरून कार्यपद्धतीत अनेक प्रकारच्या सुधारणा आणल्या होत्या. सर्व पोलीस स्टेशनांची संगणकाच्या माध्यमातून जोडणी करून तंत्रज्ञानाच्या माध्यमातून तालुका व जिल्हा पातळीवर नंतर मुंबई ही राजधानी ह्या सगळ्यांची संपर्क यंत्रणा तयार करण्याचं काम आपण केलेलं आहे.

**आजवरच्या राजकारणाच्या वाटचाली आपण समाधानी आहात का?**

राजकारणात आल्यामुळे लोकांची एक तर सेवा करता आली. गरीब लोकांची सेवा करता आली. समाजाची सेवा करता आली. आणि विशेष म्हणजे अन्यायग्रस्तांना न्यास देण्यास मदत झाली. त्यामुळे पिडीत अन्यायग्रस्त सर्वांना भेटता आले. आता जे काम हातात घेतलेलं आहे समता परिषदेचं ते या राजकारणातच लक्षात आले की याची समाजाला गरज आहे. त्यामुळे आपण कुठेतरी उपयोगी पडतो आहे याचं समाधान मला निश्चित आहे.

**आपण समता परिषदेबाबत सामाजिक गरज आहे असं म्हणालात ते शिवसेनेतून बाहेर पडल्यावर आपल्या लक्षात आलं का?**

नाही. इतर मागासवर्गियांच्याबाबत अन्याय होतो आहे त्यांना न्याय मिळाला पाहिजे हे माझं मत अगोदरपासून होतं. मी शिवसेनेत असतानासुद्धा ते होतं. किंबहुना शिवसेना या आरक्षणाच्या समर्थनाच्या बाजूने होती. त्यावेळेला मंडल



आयोग सादर केला गेला होता. विधी मंडळात आम्ही म्हणजे मी, मनोहर जोशी, वामनराव महाडिक, प्रमोद नवलकर इत्यादी आरक्षणाच्या समर्थनार्थ मत मांडायचो. नंतर शिवसेनेने आपली भूमिका बदलली. मी त्यावेळेला दुसऱ्यांदा महापौर झालो होतो. त्यावेळचा किस्सा मी सांगतो - नाशिकला बाळासाहेब ठाकरे माझ्या घरी उतरले होते. ते तिथे आरक्षणाच्या विरुद्ध पत्रकार परिषद घेत होते आणि मी मात्र आरक्षणाच्या समर्थनार्थ निघालेल्या रॅलीमध्ये सहभागी झालो होतो. प्रचंड विरोधाभास होता. पण माझ्या भूमिकेला साजेशीच कृती मी त्यावेळी केली होती.

**समता परिषदेने घेतलेल्या सामाजिक प्रश्नाच्या पुढाकारांबाबत थोडक्यात सांगा.**

इतर मागासवर्गीय संघटीत झाला पाहिजे. आपल्यावर होणारा अन्याय दूर झाला पाहिजे असं या वर्गातल्या अनेकांना वाटत होतं. मी त्यांना समता परिषदेच्या माध्यमातून एकत्र आणण्याचा प्रयत्न केला आणि त्याला प्रचंड यश आलं. लाखोच्या संख्येने लोकं एकत्र आली. मी काँग्रेसमध्ये त्यावेळेला होतो. शरद पवार हे आमचे नेते. या समता परिषदेमध्ये शरद पवारांनी लोकांनी केलेली मंडल आयोग लागू करण्याची मागणी मान्य करण्यासाठी प्रयत्न करण्याचे सांगितले. एवढंच नाहीतर मंडल आयोगाच्या आरक्षणाच्या शिफारशी नोकरी, शिक्षण यातच नाहीतर राजकारणातसुद्धा लागू करण्याची घोषणा केली. महात्मा फुले यांचा वाडा राष्ट्रीय स्मारक व्हावे ही मागणी समता परिषदेच्या अधिवेशनातच केली गेली. व त्याचा पाठपुरावा होत ते राष्ट्रीय स्मारक राष्ट्राला अर्पण करण्याचा कार्यक्रमसुद्धा पार पाडला होता. या कार्यक्रमाला राष्ट्रपती डॉ. शंकरदयाळ शर्मा उपस्थित होते. समता परिषदेच्या माध्यमातून अनेक सामाजिक मागण्या मांडल्या गेल्या व पूर्ण झाल्या. मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर याचं नाव देण्याची मागणी अशीच समता परिषदेनी केली होती. ज्या महात्मा फुलेंना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी गुरूस्थानी मानलं व त्यांचे आदर्श आचरणात आणले त्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचं नावं मराठवाडा विद्यापीठाला देण्याची घोषणासुद्धा समता परिषदेच्या अधिवेशनातच झाली. शरद पवारांनी ही घोषणा आश्वासन दिल्यानंतर दीड महिन्यातच आश्वासनपूर्तता करून केली होती.

समाजात इतर मागासवर्गीय आपल्या अधिकाराबाबत जागरूक नाहीत. आई-



वडील शिकलेले नाहीत त्यांना अधिकाराचा गंध नाही त्यामुळे आरक्षण आहे की नाही यासंदर्भात आपल्या हक्का संदर्भात माहिती नाही अशा वर्गातल्या तरुण वर्गाला याची जाणीव करून दिली ती समता परिषदेनं. आणि त्यामुळेच जी पत्रं येतात त्यामध्ये मेडिकलला ॲडमिशन मिळालं. इंजिनिअर झालो. हे तुमच्यामुळे झालं. असं वाचल्यानंतर सामाजिक काम करताना येणारा थकवा दूर होतो. आपण जे काही सामाजिक बांधिलकी मानून राजकारण करतो आहोत त्याचं समाधान निश्चितच मनाला वाटतं आहे.

**राजकारणात आपण समाधानी आहात, पण राजकारणात नसतो तर बरं झालं असतं असं कधी वाटलं का?**

असं वाटलं जेव्हा मिडियाने मला टारगेट केलं होतं तेलगी प्रकरणामध्ये माझे नाव घेऊन माझ्यावर नाहक आरोप केले गेले तेव्हा मात्र मला असं वाटलं होतं. ज्या तेलगीला मी अटक करून मोक्का लावला होता त्या प्रकरणात माझंच नाव गोवलं जावं हे वाईट वाटण्यासारखं झालं. तेलगी प्रकरण सात-आठ महिने चर्चेत होतं. पण जेव्हा माझ्यावर आरोप झाले त्यावेळेला सर्वजण तुटून पडले. हे का झाले याचा विचार केला असता शिवसेना-भाजप यांच्याविरुद्ध आवाज उघडला नसता. कामचुकार पोलीस अधिकाऱ्यांना सजा दिली नसती. सगळ्यांबद्दल सगळं गोड गोड बोललो असतो. तर कोणाची नाराजी माझ्याबाबत झाली नसती. खोट्या पद्धतीने वागून छुप्या पद्धतीने केला असता तर बरं झालं असतं. शिस्तीने वागून लोकांना दुखावलं म्हणून नाराज गट माझ्याविरूद् झाला आणि मग त्यांनी माझ्याविरुद्ध मोहीम चालू केली. या निष्कर्षापर्यंत मी पोहोचलो. या वेळेला मात्र वाटलं की आपण राजकारणात कशाला आलो. गुन्हा केला तर शिक्षा भोगली पाहिजे पण कारण काही नसताना व्यक्तिगत आरोप करून घ्यायचे हे राजकारणात होतं म्हणून असं वाटलं.

**तुम्हाला एकट्यालाच लक्ष्य करून तेलगी प्रकरणात हल्ला केला गेला याचं कारण काय?**

मला सांगा हल्ले जे होतात ते कोणावर होतात? सक्षम नेतृत्वावर होतात. ज्या नेत्यावर हल्ला केल्यामुळे पक्षाची हानी होवू शकेल अशा नेत्यावर हल्ला केला जातो. छोट्या-मोठ्यांवर कुणी हल्ला करत नाही. मी विरोधी पक्षनेता

असताना सेना-भाजपाच्या युती सरकारवर हल्ले केले ते केले नसते तर कदाचित ते पुढच्या निवडणुकीत सत्तेवरून गेले नसते.



**तेलगी प्रकरणामुळे तुमचं किती नुकसान झालं?**

राजकीय हल्ले होत असतात. ते पचवायला पाहिजे. नुकसान किती झाले यापेक्षा जर गुन्हा केला असता तर त्यांची शिक्षापण भोगली असती. या प्रकरणामुळे गुन्हेगार चोर म्हणून शिक्का मारण्याचा प्रयत्न झाला. आणि हा शिक्का छगन भुजबळला शतमरणापेक्षा पण जास्त क्लेशदायक वाटतो आहे. या प्रकरणामुळे माझ्या कुटुंबियांना माझ्या जवळच्या नातेवाईकांना त्याचा त्रास झाला. मला भीती कधीच कशाची वाटली नाही. पण अशाप्रकारे चारित्र्य हनन व्हावं हे मला कदापि सहन न होणारी गोष्ट आहे. हा हल्ला राजकीय प्रकरणाबाबत असता तर मला त्याचं काही दुःख नसतं. पण तो वैयक्तिक व कौटुंबिक स्तरावर आला याचं दुःख मला आहे. परंतु सत्य काय ते जनतेसमोर आलं व मला कोणताही कलंक लागला नाही यातच मला धन्यता वाटते आहे. सत्याच्या विजयानेच माझ्या विरोधकांचं तोंड बंद केलं आहे.

**महाराष्ट्रात आपण सक्षम नेते असताना अचानक समता परिषदेने राष्ट्रीय स्तरावर कार्य जोरात सुरू करून मोठमोठ्या सभा यशस्वी केल्यात हा चमत्कार कसा काय झाला?**

केंद्र सरकारच्या एकमुखी निर्णयाला विरोध होतो. ओबीसी कशाला म्हणतात हे ज्या लोकांना माहित नाही शिक्षणाअभावी अन्याय होतो आहे अशा लोकांसाठी काहीतरी करायला पाहिजे हे राष्ट्रीय स्तरावर चर्चेला यायला लागलं. मग ओबीसींसाठी काहीतरी करायच्या दृष्टीने दिल्लीत वेगवेगळ्या राज्यातल्या लोकांची बैठक झाली व या बैठकीत समता परिषदेचा बॅनर स्वीकारून त्याचं नेतृत्व मी करावं असं सुचविलं गेलं. आणि मग मी कामाला लागलो. आणि मग दिल्ली, बिहार, हैदराबाद येथे समता परिषदेच्या महासभा झाल्या. अतिशय मोठ्या संख्येने जनसमुदाय त्या सभांना आला. आपल्या न्याय्य हक्कासाठी हा समाज समता परिषदेच्या माध्यमातून एकवटला होता. कोणत्याही राष्ट्रीय पक्षाचा, सरकारचा पाठिंबा नसताना एवढा मोठा जनसमुदाय एकत्रित येणं हा राजकीय लोकांना चमत्कारच वाटला. परंतु हा चमत्कार शाहू-फुले-आंबेडकर यांच्या विचारांचा



आहे. आंध्र प्रदेश, हरियाणा, मध्य प्रदेश येथे समता परिषद जोमात काम करत आहे. छत्तीसगड, झारखंड येथे कार्यकर्ते निर्माण झाले आहेत. मी एकट्याने केलें आहे असा माझा दावा नाही. परंतु इतर मागासवर्गीय एकत्र येण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. आणि त्यामुळे देशभरात समता परिषदेचा विचार स्वीकारून मोठ्या सभा यशस्वी होत आहेत.

**आपण राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये आहात, समता परिषद राष्ट्रवादीच्या किती जवळ आहे?**

समता परिषद हे एक साधन आहे. त्यामुळे समता परिषदेचा इतर मागासवर्गीयांच्या कल्याणाच्या मागणीसाठी केंद्रातील नेत्यांची मदत झाली आहे. शरद पवार, लालू प्रसाद यादव, अर्जुनसिंग यांसारखे केंद्रीय मंत्री आहेत ते मदत करत असतात. दुसऱ्या पक्षाचेसुद्धा अनेक लोकं आहेत. बीजेपीचे, शिवसेनेचेसुद्धा लोकं आहेत. काही ठिकाणी सोशॅलिस्ट कार्यकर्तेसुद्धा समता परिषदेचं काम करतात. त्यामुळे राजकीय प्रणाली वेगवेगळ्या असूनसुद्धा ते एकत्र काम करतात. बिहारमध्ये, ओरिसामध्ये किंवा आंध्रमध्ये हरियाणामध्येसुद्धा तेच झालं. वेगवेगळ्या पक्षाचे लोक एकत्र येऊन समता परिषदेचे काम करत आहेत. त्यामुळे प्रत्यक्षात कोणता पक्ष ही समता परिषदेची ओळख नाही परंतु समतावादी विचार हा राष्ट्रवादीच्या जवळ आहे त्यामुळे समता परिषद राष्ट्रवादीच्या निश्चितपणे जवळ आहे.

**शिवसेना सोडल्यानंतरही तुम्ही आक्रमक आहात. प्रश्न आक्रमक पद्धतीने मांडून मिटतात कि सामंजस्याने तुमचं काय मत आहे?**

तसं त्याचं उत्तर देणं हे कठीण आहे. लोकं आक्रमक का होतात ? ज्यावेळेला सामंजस्य माध्यमातून न्याय मिळत नाही त्यावेळेला लोक आक्रमक होतात. सामंजस्याच्या माध्यमातून प्रयत्न करूनही झालं नाही तर लोकं थोडी शांत बसतात. वाट पाहतात. पुन्हा आक्रमक होतात. वाहन थांबविणे, रस्त्यावरून मोर्चे काढणे, याची कोणाला हौस नसते. बेळगाव कारवारला आम्ही आंदोलन करायला गेलो होतो. मराठी माणसांवर झालेला अन्याय मोडायला पाहिजे होता; परंतु चाळीस वर्ष लढूनही काही होतच नसेल तर काय करायला पाहिजे ? आता तुम्ही जे विचारलं की मी आक्रमक आहे तर शिवसेना-बीजेपी विरुद्ध

आक्रमक नसावं का? माझी ती भूमिकाच विरोधी पक्षनेता म्हणून होती. विरोधी पक्षनेता म्हणून मी त्यांच्याविरुद्ध आक्रमक न होता जर गोडीगुलाबीची भूमिका घेतली असती तर मी त्यांच्याविरुद्ध काही बोलूच शकलो नसतो. आता तीच परिस्थिती त्यांचीसुद्धा आहे. ते जर माझ्याविरुद्ध आक्रमक भूमिका घेणार नाहीत तर विरोधी पक्षनेत्याची भूमिका ते पार पाडत नाहीत असं होईल. तर त्याच्यामुळे भूमिका तुमची काय आहे ते पण महत्त्वाचं आहे. एक शिवसैनिक म्हणून भूमिका पार पाडली एक काँग्रेसचा नेता म्हणून भूमिका पार पाडली एक विरोधी पक्ष नेता म्हणून भूमिका पार पाडली आणि त्याच वेळेला एक मंत्री म्हणून भूमिका पार पाडत आहे. त्या त्या ठिकाणी बसल्यानंतर त्या त्या भूमिकेत जावं लागतं. विरोधी पक्षनेता म्हटल्यानंतर विरोध करणं, आक्रमण करणं हे काम आहे. आता मंत्री बनल्यानंतर कोणावर आक्रमण करायचं. तुम्हाला मंत्रीपद दिलं आहे ना मग काम कराना! त्यामुळे जिथे जास्तीत जास्त आपण लक्ष देवून काम करणे महत्त्वाचं आहे. तिथे आक्रमक होवून काय उपयोग? त्यामुळे स्वभाव कदाचित आक्रमक असेल पण राजकारण व जबाबदारी आक्रमक पद्धतीने कशी असणार?



**तरीसुद्धा तुमचा जो एकंदरीत स्वभाव आहे त्यात तुम्हाला कोणती भूमिका जवळची वाटते?**

अर्थातच विरोधी पक्षनेत्याची!

**विरोधी पक्षनेताम्हणून विरोधाला विरोध करण्यावरती तुमचा कितपत विश्वास आहे?**

नाही. विरोधाला विरोध नाही. परंतु शासनाचं काही चुकलं असेल तर मात्र त्याला विरोध झालाच पाहिजे. मी विरोधी पक्षनेता असताना सरकारच्या आर्थिक दिवाळखोरीबद्दल अनेक प्रश्न मांडले होते. अर्थसंकल्पावर बोलताना महाराष्ट्र कर्जाच्या सापळ्यामध्ये कसा सापडला जात आहे, सतरा-अठरा टक्क्याने कसं व्याज दिले जात आहे हे मी पुराव्यासकट मांडले. महाराष्ट्रातल्या वर्तमानपत्रांनी हे सर्व मोठ्या आणि बोल्ड चौकटीत छापलं. अर्थसंकल्पाच्या भाषणातून, जनतेचे इतर प्रश्न विधीमंडळात मांडून विरोधी पक्षनेत्याचं काम मी चोख केलं आहे. त्यामागे विरोधाला विरोध न करता विरोधी पक्षनेत्याच्या भूमिकेप्रमाणे मी वागलो. त्यावेळेस प्रसिद्धीसुद्धा मिळाली.



**तुमच्या राजकीय प्रवासात नाव घेण्यासारखं कोणी विरोधक आठवतोय का? ज्याने तुम्हाला विरोध करून लक्षात ठेवायला भाग पाडलं.**

माझे विरोधक जे आहेत ते खरोखर बरेच उमद्या स्वभावाचे आहेत असं मला वाटतं आणि त्यांच्याशी माझी दोस्ती आहेच. आज काही विरोधक अभ्यासू सुद्धा आहेत. आक्रमक सुद्धा आहेत. आणि ते त्यांची भूमिका चांगली पार पाडताहेत. आता त्याच्यांत अधिक चांगला कोण आणि वाईट कोण हे काही मी ठरवू शकत नाही.

**प्रगत महाराष्ट्रासाठी कोणती राजकीय प्रणाली असायला पाहिजे असं तुम्हाला वाटतं.**

अर्थातच शाहू-फुले-आंबेडकरांची वैचारिक प्रणाली. ती विचारप्रणाली परिपूर्ण आहे. ती सर्व देशात सर्व राज्यात स्वीकारली गेली पाहिजे असं माझं मत आहे. ही प्रणाली समाजातील शेवटच्या घटकापर्यंत अभ्यास करणारी आहे. महिलांना न्याय देणारी आहे, दलितांना न्याय देणारी आहे. मागासवर्गियांना न्याय देणारी आहे. त्यांच्या शिक्षणाचा आग्रह धरणारी आहे. शेतकऱ्यांना सुद्धा खडे बोल सुनावून काम करायला लावणारी आहे. त्यांना अंधश्रद्धेपासून कसं दूर राहायला पाहिजे आहे, नाविन्याचा कसा ध्यास घेतला गेला पाहिजे ही सगळी जी प्रणाली आहे ती शाहू-फुले-आंबेडकरांची विचारप्रणाली आहे. आणि तिचा मागोवा घेत आपण काम केले पाहिजे असं माझं मत आहे.

**समता परिषद फक्त माळी समाजासाठी आहे असा आरोप केला जातो त्याबाबत तुमचं काय उत्तर आहे?**

हा आरोप म्हणजे प्रतिगामी लोकांनी केलेला उपदव्याप आहे. ज्या वेळेला त्यांच्या लक्षात आले की समता परिषदेच्या माध्यमातून छगन भुजबळ मोठे काम करताहेत त्या वेळेला मागासवर्गीय समाजांना भुजबळांपासून दूर करण्यासाठी खेळलेली ही चाल आहे. छगन भुजबळांबरोबर फक्त माळी समाजाने यायचं बाकी कुणी नाही. त्यासाठी केलेला हा प्रयत्न आहे. मला कल्पना नव्हती इतकं समता परिषदेला यशसुद्धा मिळालं. पण आजसुद्धा सर्व समाजाचे लोक समता परिषदेत एकत्रितपणे काम करताहेत. मराठा समाज, ब्राह्मणसमाजाचे सुद्धा आहेत, दलित समाज आणि सर्व जातींबरोबर मुस्लिम समाजाचे सुद्धा समता



परिषदेचे कार्यकर्ते आहेत. आमचे जिल्हाप्रमुख, शाखाप्रमुख आहेत. ते काम करताहेत. इतरांच्या दिशाभूल करायची, दिशाहीन करायचं यासाठी आखलेला प्रतिगाम्यांचा नेहमीप्रमाणे एक डाव आहे.

**ज्यांना ज्यांना समता अभिप्रेत आहे त्या सगळ्यांचं संघटन समता परिषद करत आहे असं तुमचं मत आहे का?**

येस. ज्यांना ज्यांना म्हणून समता हवी आहे त्या सगळ्यांना काम करण्याची संधी या समता परिषदेमुळे देण्यात आली आहे. ठराविक जातीसमूह किंवा अन्य कोणासाठी ही समता परिषद नाही. त्यामुळे शाहू-फुले-आंबेडकर यांच्या विचारांना मानणारा सर्वजण या समता परिषदेचे आहेत.

**समता परिषद नेमकी काय आहे? थोडक्यात सांगा.**

समता परिषद म्हणजे  शाहू-फुले-आंबेडकरांच्या आदर्शावर काम करणारी संघटना. आणि आजच्या ह्या परिस्थितीमध्ये जिथे जिथे अन्याय आहे त्या अन्यायाच्या विरुद्ध बोलणे किंवा न्याय्य आहे तो मिळवून घेण्यासाठी प्रयत्न करणारी एक व्यासपीठ आहे. एक वेगळं व्यासपीठ ज्यांना या व्यासपिठावरून वेगवेगळ्या जातीचे लोक वेगवेगळ्या धर्माचे लोक वेगवेगळया पक्षाचे लोक एकत्र येऊन बोलू शकतात आणि तो विषय मांडू शकतात ही आहे समता परिषद.

**राजकारणात आपण यशस्वी झालात तसेच यश तुम्हाला शैक्षणिक क्षेत्रातसुद्धा मिळाले आहे त्याबाबत सांगा.**

लहानपणी जेव्हा मी माझगाव म्युन्सिपल शाळेमध्ये होतो तेव्हापासून मी हिंदी शिकण्याच्या वर्गाला जायचो. त्यावेळेला हिंदी सर्वांनी शिकावे म्हणून फार जोरदार प्रयत्न केले जायचे. आणि म्हणून मी स्वतः हिंदी तर शिकलो परंतु नंतर त्याच मुंबई हिंदी सभेच्या माध्यमातून दर रविवारी हिंदी शिकविण्याचे कामसुद्धा मी सुरू केले.  मुंबई हिंदी सभा या संस्थेतर्फे मोफत हिंदी शिकविण्याचे वर्ग दर रविवारी महाराष्ट्रात चालविले जातात. त्या संस्थेचा कुलपती म्हणून मी काम करतो आहे. पुढे राजकारणात पडल्यानंतर असं वाटलं की आपणही एखादी शिक्षण संस्था काढावी. अशा अनेकांनी शिक्षण संस्था काढलेल्या आहेत. मग आपणही शिक्षण संस्था काढावी असं मला वाटलं. त्यासाठी मी महानगर पालिकेकडून भूखंड खरेदी करून मिळवला. दिड कोटीच्या दरम्यान त्यावेळेला



मला तो भूखंड पडला. अर्थात ही गोष्ट ८७-८८ सालामधली असावी. त्यावेळेला त्या जागेला किंमत नव्हती. त्यावेळेला मी भूखंड मिळविला. तिथे मी कॉलेज बांधण्याचं काम सुरू केलं. आणि हळू हळू त्या कॉलेजला देणगीच्या माध्यमातून शैक्षणिक ठेवीच्या रूपाने निधी गोळा करून बांधकामासाठी वापरून एमआयटी कॉलेज आकाराला आणलं. आता ते नावारूपाला आलेलं कॉलेज आहे. शैक्षणिक क्षेत्रामध्ये त्याचं चांगलं नाव आहे. नाशिकलासुद्धा आपण काही करायला पाहिजे या विचारातून नाशिकलासुद्धा भुजबळ नॉलेज सिटी असं कॉलेज उभं राहिलेलं आहे. आणि माझा हा आग्रह राहिला आहे की अनेक शाळा-कॉलेजेस जे आपण काढू त्याच्यामध्ये ते वन ऑफ द बेस्ट असले पाहिजेत. माझा हा आग्रह आहे तो कायम राहिलेला आहे. आणि त्यामुळे आज सुद्धा त्या कॉलेजमध्ये येण्यासाठी, ॲडमिशनसाठी फार मोठी चढाओढ असते. आमच्या कॉलेजची मुले प्रत्येक वर्षी मेरीटमध्ये सतत येत असतात. आणि ९९ ते १०० टक्के रिझल्ट लागत असतो. मॅनेजमेंट कॉलेज असेल किंवा फार्मसी असे अनेक वेगवेगळे कॉलेजेस आम्ही चालवत आहोत याचा आनंद वाटतो. आम्ही मुंबईमध्ये फाईव्ह स्टार हॉटेल बांधली नाही पण एक फाईव्ह स्टार कॉलेज बांधले. तो आनंद वेगळाच असतो. ती शैक्षणिक संस्था अनेक अंगाने बहरत आहे याचं समाधान मला भरपूर आहे.

**आगामी काही योजना? काही महत्त्वकांक्षा आहेत का?**

राजकारणात महत्त्वकांक्षा ठेवायला हवीच. पण त्याचबरोबर त्या जोमाने काम करायला हवंय. आगामी योजना म्हणाल तर समता परिषदेचा विचार सर्व देशभर पसरवायचा आहे एवढंच आता सांगू शकतो. आगामी योजना आगामी काळच ठरवू शकेल. महत्त्वकांक्षा पूर्ण करण्याचं त्यावेळेलाच ठरवता येणे शक्य होईल.

❑●❑